इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक – ४७ ■ वर्ष – ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

चांगला पाऊस होण्यासाठी हा मंत्र
प्रत्येक दिवशी २७ वेळा २७ दिवस जप करावा.

ॐ नमो ह्रम्ल्व्र्यूं मेघकुमाराणं
ॐ ह्रीं श्रीं नमो स्म्ल्व्र्यूं ।
मेघकुमारिणां मम क्षेत्रे
सुवृष्टिं कुरु कुरु ह्रीं संवौषट् ।।

– श्री जगतगुरु कुंथुसागर महाराज

बुधवार,ता.१७ जून २०२६ | निज ज्येष्ठ शुक्ल ३ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

फ्रान्समध्ये शिखर परिषदेत मोदी-ट्रम्प भेट

पंतप्रधान मोदी स्लोव्हाकियाच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित

नवी दिल्ली,ता.१६–
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युरोपातील महत्त्वाच्या देशांपैकी एक असलेल्या स्लोव्हाकियाचा दौरा केला. स्लोव्हाकियाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या देशाला भेट देणारे नरेंद्र मोदी हे पहिले भारतीय पंतप्रधान ठरले आहेत.

या ऐतिहासिक भेटीदरम्यान (पान २ वर)

पॅरीस,ता.१६–
फ्रान्समध्ये आयोजित ५२ व्या जी– ७ शिखर परिषदेचे मंगळवारी उद्घाटन झाले. जगातील प्रमुख अर्थव्यवस्था जागतिक आव्हानांवर चर्चा करण्यासाठी एकत्र आल्या आहेत. या परिषदेदरम्यान भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची एक भेट झाली असून, तिन आंतरराष्ट्रीय कूटनीतीत मोठे लक्ष वेधले आहे.

यावेळी दोन्ही नेत्यांनी एकमेकांचे जोरदार स्वागत केले आणि द्विपक्षीय चर्चेत व्यापार, गुंतवणूक, संरक्षण सहकार्य तसेच जागतिक सुरक्षा या विषयांवर विचारविनिमय केला. ही भेट सुमारे १६ महिन्यांनंतर झालेली प्रत्यक्ष चर्चा मानली जात असून रणनीतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. पंतप्रधान मोदी सध्या फ्रान्समधील एव्हियन–लेस–बेन्स येथे सुरू असलेल्या जी–७ परिषदेत सहभागी झाले आहेत, जिथे ते विविध देशांच्या प्रमुख नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका देखील घेणार आहेत. भारत या वेळीही जी–७ मध्ये अतिथी देश म्हणून सहभागी होत असून, त्याची वाढती जागतिक भूमिका अधोरेखित होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या व्यापार करारावाबतही चर्चा पुढे नेण्यावर भर देण्यात आला. तसेच अलीकडील जागतिक सुरक्षा घडामोडी आणि इंडो–पॅसिफिक क्षेत्रातील स्थितेवरही दोन्ही नेत्यांनी विचारांची देवाणघेवाण केली. (पान २ वर)



मनी लॉंड्रिंग प्रकरण मुंबई,दिल्लीत ईडीचे छापे

नवी दिल्ली,ता.१६ –
अंमलबजावणी संचनालयाने (ईडी) येस बँक कर्ज घोटाळा आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणासंदर्भात मुंबई, खंडाळा आणि नवी दिल्लीतील १७ ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम राबवली.

या छाप्यांमध्ये मे. सुरक्षा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड (सारसीएल), मे. सुरक्षा रियल्टी लिमिटेड आणि मे. ख्याती रियल्टर्स प्रा. लि. यांच्यासह त्यांचे प्रवर्तक, संचालक आणि कर्मचारी यांच्या कार्यालयांना लक्ष्य करण्यात आले. (पान २ वर)

जमीन मोजणीचे नवे नियम

कौटुंबिक वाटणीची मोजणी २०० रुपयात,९० दिवसात प्रक्रिया पूर्ण होणार

मुंबई,ता.१६–
राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि जमीनधारकांसाठी राज्य सरकाने एक अत्यंत दिलासादायक आणि मोठा निर्णय घेतला आहे. जमीन मोजणीच्या प्रक्रियेत होणारा उशीर आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासनाने मोजणीचे नवे दर आणि कडक नियम जारी केले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता कुटुंबात झालेल्या जमिनीच्या वाटणीची मोजणी प्रति पोटहिस्सा अवघ्या २०० रुपयांत केली जाणार आहे. या नवीन नियमांनुसार, नियमित मोजणी ९० दिवसांत तर द्रुतगती (फास्ट ट्रॅक)

मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं आहे. यामुळे मोजणीसाठी महिनेन्महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जमीन मोजणीचे नवे सुधारित दरपत्रकामध्ये राज्य सरकारने ग्रामीण आणि शहरी भागासाठी जमिनीच्या क्षेत्रफळानुसार खालीलप्रमाणे नवीन शुल्क निश्चित केले आहे. (पान २ वर)

सरकारी आणि निमशासकीय संस्थांना सवलत

या नवीन धोरणात विविध संस्थांना मोजणी दरात विशेष सवलत देण्यात आली आहे. निमशासकीय संस्थांना मोजणी दरामध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल, तर पूर्णतः शासकीय मालकीच्या जमिनींच्या मोजणीसाठी ७५ टक्के सवलत लागू राहील. या ऐतिहासिक निर्णयामुळे महसूल विभागाच्या कारभारात पारदर्शकता येईल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

अलगल ब्लूम,सायनोबॅक्टेरियामुळे कृष्णा नदीच्या पाण्याचा रंग बदलला

कराड,ता.१६(प्रतिनिधी)–
गेल्या काही दिवसांपासून कृष्णा नदीच्या पाण्याचा रंग हिरवट झाल्याने नदीकाठच्या गावांमध्ये चिंता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या तपासणीत नदीतील पाण्याच्या रंगबदलामागे 'अल्गल ब्लूम' (शेवाळ्याची असामान्य वाढ) आणि 'सायनोबॅक्टेरिया'ची वाढ कारणीभूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी नदीच्या पाण्याबाबत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

नदीच्या विविध ठिकाणांहून पाण्याचे नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली होती.

दूषित पाणी पिणे, नदीत अंघोळ टाळा

प्राप्त अहवालानुसार, नदीतील पाण्याचा हिरवा रंग हा कोणत्याही रासायनिक गळतीमुळे नसून नैसर्गिक जैविक प्रक्रियेमुळे निर्माण झाला आहे. मात्र, या प्रक्रियेमुळे पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम झाला असून त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माहितीनुसार, नदीतील शेवाळ्याचे वाढते प्रमाण, शेतीमधून वाहून येणारे पाणी, सांडपाण्याचे मिश्रण (पान २ वर)

भारतात टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी

नवी दिल्ली,ता.१६–
केंद्र सरकारने मेसेजिंग प्लॅटफॉर्म टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. नीट (यूजी) २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) ने वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट (यूजी) २०२६ च्या पुनर्परीक्षेपूर्वी केंद्र सरकारने टेलिग्रामवर घातलेल्या (पान २ वर)

प्रीस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप मिळणार नाही

नवी दिल्ली,ता.१६–
मध्य प्रदेशात कफ सिरपमुळे २२ चिमुरड्यांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठी शिवाय आता कोणत्याही औषध दुकानात कफ सिरप मिळणार नाही. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने औषध नियमावलीतील 'शेड्यूल के' मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. या अंतर्गत कफ सिरपला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकण्याची असलेली सवलत

केंद्राचा निर्णय

आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

मात्र, खोकल्यासाठी वापरल्या जाणाऱ्या चघळण्याच्या गोळ्या किंवा टॅब्लेट्स (पान २ वर)

दहा लाखाचे भेसळयुक्त खत जप्त

- दोघांवर गुन्हा दाखल
- तुकाराम मुंडेंच्या आदेशानुसार कारवाई

पंढरपूर,ता.१६(प्रतिनिधी)–
सध्या राज्यात शेतकऱ्यांची दिशाभूल करून भेसळयुक्त रासायनिक खतांची निर्मिती व विक्री केल्याप्रकरणी मंगळवेढा पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्याकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात सुमारे १० लाख ४६ हजार ७८० रुपयांच्या खतसाठ्याचा समावेश असल्याचे समजले आहे.

याबाबत माहिती अशी, मोहोळ तालुक्यातील कुरुल येथील शेतकरी हरिदास भिमराव बोंगे (वय ३३) यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवेढा तालुक्यातील पाटखळ येथील प्रहार उद्योग समूह व कृषी केंद्र या दुकान व गोदामाचे मालक सतीश मनोहर भोसले यांनी भेसळयुक्त रासायनिक खतांचा साठा करून त्याची विक्री केली. तसेच अवधूत ॲग्रो इंडस्ट्रीज इंडिया प्रा. लि., सातारा या कंपनीचे संचालक रविराज शंकर कणसे यांनी ही भेसळयुक्त खते तयार करून संबंधित कृषी केंद्राला विक्री केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तपासादरम्यान संबंधित कंपनीकडून विक्री परवान्यात नमूद असलेल्या आयात स्त्रोतांची कागदपत्रे व बिले सादर करण्यास सांगण्यात आले होते. मात्र कंपनीच्या संचालकांनी आवश्यक बिले सादर करण्यास असमर्थता (पान २ वर)

कुपवाडमध्ये हळद मिलला भीषण आग

हमालांच्यामुळे मोठी हानी टळली

कुपवाड,ता.१६(प्रतिनिधी)
कुपवाड औद्योगिक वसाहतीतील काननवाडी रोडवरील पटेल हळद मिलला मंगळवारी मध्यरात्री भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीमुळे मिलमधील हळद व अन्य मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अग्निशमन दलाच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले.

आगीची माहिती मिळताच सांगली–मिरज–कुपवाड महापालिकेच्या तसेच औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन दलाच्या दोन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. आगीमुळे संपूर्ण परिसर धुराच्या विळख्यात सापडला होता. दाट धुरांड्याचा सामना करत अग्निशमन जवानांनी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आणि काही तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात (पान २ वर)

सोने प्रति तोळा	चांदी प्रति किलो
१४८९०० रु.	२५०००० रु.

अंडी ७०० रुपये शेकडा

हास्यतुषार –सुरेंद्र दास

पाणी वापरण्यात कपात करा नाहीतर कपातच पाणी मिळेल !

औद्योगिक कंपन्यांमधील चोरी

दोघे जेरबंद;२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)
शिरोली आणि परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांमधून महागडे कार्बाईड इन्सर्ट व अन्य तांत्रिक साहित्य चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे २५ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शिरोली एमआयडीसी आणि गांधीनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये विजय विलास गोसावी (वय २९) व राहुल शिवाजी गोसावी (वय ३४,दोघे रा.रुकडीवाडी,ता. हातकणंगले) यांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरोली एमआयडीसीतील स्काय टेक्नॉव्हिजन आणि एस. व्ही. इंजिनिअरिंग सोल्यूशन या कंपन्यांमधून कार्बाईड इन्सर्ट, ड्रिल्स, टूल्स, डीव्हीआर तसेच वाय–फाय उपकरणांची चोरी झाली होती. या घटनांचा तपास सुरू असताना एलसीबीच्या पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, चोरीचा माल विक्रीसाठी मालवाहू वाहनातून पुणे–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील किणी परिसरातून नेला जात आहे.

त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयित वाहन अडविले. वाहनाची झडती घेतली असता विविध कंपन्यांचे कार्बाईड इन्सर्ट, ड्रिल्स, एंडमिल आणि मोबाईल फोन आढळून आले. चौकशीत आरोपींनी इतर साथीदारांच्या मदतीने चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या ११ लाख ७४ हजार ५१२ रुपयांच्या (पान २ वर)

दहशत गुन्हेगारी मॉड्यूलचा पर्दाफाश

सात प्रमुख आरोपींना अटक

नवी दिल्ली,ता.१६–
दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल आणि ईस्टर्न रेंजच्या संयुक्त पथकाने पाकिस्तान–समर्थित एका मोठ्या आंतरराष्ट्रीय दहशत गुन्हेगारी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत ७ प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली असून, दिल्ली–एनसीआरमध्ये होऊ शकणारे अनेक संभाव्य दहशतवादी हल्ले वेळीच रोखल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या नेटवर्कचे संचालन पाकिस्तानमध्ये बसलेला गँगस्टर–टर्न्ड–टेररिस्ट शहजाद भट्टी आणि त्याचा सहकारी अजमल गुज्जर करत होते. हे मॉड्यूल सोशल मीडिया आणि एन्क्रिप्टेड ॲप्सच्या माध्यमातून भारतातील युवकांना रिक्रूट करून त्यांना शस्त्रे, (पान २ वर)

तारण मालमत्तेचे जादा मुल्यांकन

बँकेची तीन कोटीची फसवणूक

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)–
बँकेला कर्जासाठी तारण म्हणून दिलेल्या मालमत्तेचे जादाचे मूल्यांकन दाखवून बँकेची तब्बल तीन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सांगली ग्रामीण पोलिसांनी संशयित रमेश विठ्ठल सूर्यवंशी (रा. हिंगणगादे, ता.खानापूर) आणि विजयकुमार बी. पाटील (शारंग अपार्टमेंट, विश्रामबाग सांगली) या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणी युनियन बँकेच्या अंकली शाखेचे व्यवस्थापक हेमंतकुमार यशवंत शिंदे यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. कर्जदार संशयित रमेश सूर्यवंशी याने मशीनरी खरेदीसाठी एक कोटी रुपयांचे कर्ज बँकेच्या अंकली शाखेतून मंजूर करून घेतले होते. त्याचबरोबर खेळते भागभांडवल म्हणून दोन कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट घेतलेला होता. यासाठी बँकेला तारण म्हणून देण्यात आलेल्या मालमत्तेचे मूल्यांकन सुमारे ७ कोटी १२ लाख रुपये (पान २ वर)

(पान १ वरून)

टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी

तात्पुरत्या बंदीचे स्वागत केले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने निर्देश जारी करून भारतातील टेलिग्राम सेवा २२ जून २०२६ पर्यंत तात्पुरत्या

स्वरूपात बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. २१ जून रोजी होणाऱ्या नीट (यूजी) २०२६ पुनर्परीक्षेची निष्पक्षता आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. एनटीएच्या मते, परीक्षेशी संबंधित प्रश्नपत्रिका, अफवा आणि बनावट माहितीचा प्रसार रोखण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल. परीक्षा प्रक्रियेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखणे हे संस्थेचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे एनटीएने स्पष्ट केले आहे. पुनर्परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना एनटीएने आवाहन केले आहे की, त्यांनी केवळ अधिकृत संकेतस्थळे आणि अधिकृत माहितीच्या माध्यमांवरच विश्वास ठेवावा.कोणत्याही अपुष्ट माहिती किंवा अफवांपासून दूर राहावे, असेही संस्थेने म्हटले आहे. एनटीएने जारी केलेल्या निवेदनानुसार, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६९अ अंतर्गत टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्यात आली असून ती २२ जून २०२६ पर्यंत लागू राहणार आहे.याशिवाय, एका स्वतंत्र आदेशानुसार टेलिग्रामला भारतात आधी पाठवलेल्या संदेशांमध्ये संपादन (एडिट) करण्याची सुविधा ३० जून २०२६ पर्यंत बंद ठेवावी लागणार आहे. राष्ट्रीय परीक्षांनंतर बनावट प्रश्नपत्रिका गळतीचे पुरावे तयार करण्यासाठी या सुविधेचा गैरवापर केला जात असल्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. या दोन्ही उपाययोजनांचा उद्देश सार्वजनिक सुव्यवस्था कायम राखणे आणि नीट (यूजी) २०२६ पुनर्परीक्षेतील विद्यार्थ्यांची फसवणूक करण्यासाठी टेलिग्रामचा वापर करणाऱ्या संघटित टोळ्यांवर आळा घालणे हा असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित

स्लोव्हाकियाने पंतप्रधान मोदी यांना आपल्या सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस (प्रथम श्रेणी)' या पुरस्काराने गौरविले. तसेच या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी आणि स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्यात संरक्षण, व्यापार तसेच इतर विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्याबाबत द्विपक्षीय चर्चा झाली. स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांनी पंतप्रधान मोदी यांना 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस (प्रथम श्रेणी)' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान केला. 'ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस (प्रथम श्रेणी)' हा स्लोव्हाकियाचा सर्वोच्च राजकीय सन्मान असून तो परदेशी मान्यवरांना दिला जातो. स्लोव्हाकियाशी मैत्रीपूर्ण संबंध दृढ करण्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल तसेच देशाच्या परराष्ट्र धोरणात्मक हितसंबंधांना आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेला पाठिंबा दिल्याबद्दल हा सन्मान प्रदान केला जातो.

एखाद्या परदेशी राष्ट्राकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेला हा ३३ वा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे. या भेटीदरम्यान भारत आणि स्लोव्हाकियाने आपले संबंध व्यापक भागीदारीच्या स्तरावर नेण्याचा तसेच द्विपक्षीय व्यापार आणि संरक्षण सहकार्य अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.याशिवाय, स्थलांतर, डिजिटल तंत्रज्ञान, संरक्षण आणि इतर विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये ११ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. द्विपक्षीय चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्लोव्हाकियाचे पंतप्रधान रॉबर्ट फिको यांना भारत भेटीचे निमंत्रणही दिले.

मुंबई, दिल्लीत ईडीचे छापे

ईडीच्या माहितीनुसार, मुंबई विभागीय शाखेच्या पथकांनी केलेल्या या छाप्यात येस बँकेच्या एका माजी कर्मचाऱ्याच्या कार्यालयाचीही झडती घेण्यात आली.हे प्रकरण २०१६-१७ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षादरम्यान मे. मॅक्स्टार मार्केटिंग प्रा. लि. आणि इतर कंपन्यांना येस बँकेच्या कर्जाचे फसवणुकीने हस्तांतरण करण्याशी संबंधित आहे. ईडीच्या या कारवाईचा मुख्य उद्देश मनी लॉंड्रिंगशी संबंधित पुरावे गोळा करणे हा आहे. असा आरोप आहे की मालमत्ता पुनर्रचना कंपन्यांनी (एआरसी) येस बँकेसोबत संगनमत केले. या कंपन्यांनी तणावग्रस्त मालमत्ता फसवणुकीने मिळवण्यासाठी चक्रीय व्यवहारांमध्ये सहभाग घेतला. इतकेच नव्हे तर, लिलावात काढल्या जाणाऱ्या मालमत्तांचे अवमूल्यन करण्यासाठी, एनसीएलटी प्रक्रियेतील कर्जदारांच्या मतदानाच्या अधिकारांवर प्रभाव टाकण्यासाठी आणि सीआयआरपी प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम करण्यासाठी खोटे दावे करण्यात आले. ईडी या सर्व बाबींची सखोल चौकशी करत आहे.

बँकेची तीन कोटीची फसवणूक

होत असल्याचा अहवाल दुसरा संशयित विजयकुमार पाटील याने दिलेला होता. प्रत्यक्षात मात्र संबंधित तारण मालमत्तेचे मूल्यांकन हे सव्वा कोटी रुपयांपेक्षा अधिक होऊ शकत नव्हते. तारण मालमत्तेचे मूल्यांकन कमी असतानाही जाणीवपूर्वक खोटा मूल्यांकन दाखला देऊन बँकेची फसवणूक करण्यात आल्याचे प्रथम दर्शनी स्पष्ट होत असल्याने सांगली ग्रामीण पोलीसांनी दोघांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केलेला आहे.

गुन्हेगारी मॉड्यूलचा पर्दाफाश

ड्रग्ज आणि पैशांच्या आमिषाने फसवत होते. स्पेशल सेलचे पथक या नेटवर्कवर दीर्घकाळ नजर ठेवून होते. त्यानंतर गेल्या मे महिन्यात मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई सुरू करण्यात आली. पहिली अटक गाझियाबादच्या लोनी येथील मोहित याची करण्यात आली. त्याच्याकडून बेकायदेशीर पिस्तूल आणि संशयास्पद चॅट्स जप्त करण्यात आले. पुढील चौकशीत संपूर्ण नेटवर्क उघड झाले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अनास त्यागी, मोहित योगी, दीपक अग्रोला, आरिफ, करणवीर सिंग, जतन आणि साबिर यांचा समावेश आहे.

मोदी-ट्रम्प भेट

ट्रम्प आणि मोदी यांची ही संभाव्य द्विपक्षीय बैठक बुधवार रोजी होण्याची शक्यता असून, अलीकडील भू-राजकीय तणावांच्या पार्श्वभूमीवर ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. फ्रान्समध्ये आयोजित या परिषदेत कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, युनायटेड किंगडम आणि अमेरिका सहभागी आहेत, तर युरोपियन युनियन देखील यात सहभागी झाले आहेत.

इराणला ३०० दशलक्ष डॉलर्स देणार नाही- ट्रम्प

वॉशिंग्टन,ता.१६-

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले की, इराणने यापुढे कधीही अण्वस्त्रे विकसित न करण्यास सहमती दर्शवली आहे. ट्रम्प यांनी इराणसोबत नव्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली असून, या करारामुळे दोन्ही देशांतील भविष्यातील संबंधांसाठी नवा मार्ग खुला होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शांतता करारात बदलयात अमेरिका इराणला ३०० दशलक्ष डॉलर्स देणार असल्याच्या वृत्ताचे ट्रम्प यांनी जोरदार खंडन केले.

इराणने अण्वस्त्रे न बाळगण्यास सहमती दर्शवली आहे. तसेच अमेरिका इराणला ३०० दशलक्ष डॉलर्स देत असल्याची बातमी ही डेमोक्रॅट्सनी पसरवलेली खोटी माहिती आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या प्रशासनाने इराणला अण्वस्त्रे विकसित करता येणार नाहीत याची खात्री केली आहे. नव्या कराराअंतर्गत इराणवरील निर्बंध हटविणे हे अणू कार्यक्रमाच्या तपासणीसाठी तो किती सहकार्य करतो यावर अवलंबून असेल. याशिवाय, इराणला प्रादेशिक सुरक्षेसंदर्भातील आपली आश्वासनेही पूर्ण करावी लागतील.अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनीही ट्रम्प यांच्या या उपक्रमाचे समर्थन केले. त्यांनी म्हटले की, ट्रम्प यांचे शांततेसाठीचे प्रयत्न यशस्वी ठरले आहेत. इराणला अण्वस्त्रसज्ज राष्ट्र बनण्यापासून रोखणे हेच या करारातचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. व्हान्स यांनी स्पष्ट केले की, इराणने आपला संवर्धित युरेनियमचा साठा नष्ट करणे आणि कठोर आंतरराष्ट्रीय तपासणी स्वीकारणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्याला निर्बंधांमध्ये सवलत दिली जाईल.

अमेरिकन अधिकाऱ्यांच्या मते, हा करार पूर्णपणे इराणच्या वर्तनावर अवलंबून आहे. इराणने आपल्या अणुस्थळांची तपासणी करण्यास परवानगी दिली आणि कट्टरतावादाला प्रोत्साहन देणे थांबवले, तरच त्याला जागतिक अर्थव्यवस्थेत अधिक व्यापक सहभागाची संधी मिळेल.हा करार या आठवड्याच्या अखेरीस जिनेव्हा येथे अधिकृतपणे स्वाक्षरीसाठी सादर केला जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेत स्विट्झर्लंड, पाकिस्तान आणि कतार हे देशही सहकार्य करत आहेत. ट्रम्प यांनी या दस्तऐवजाला अत्यंत प्रभावी करार असे संबोधले असून, स्वाक्षरीनंतर तो सार्वजनिक करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

दहा लाखाचे भेसळयुक्त खत जप्त

(पान १ वरून)

दर्शविल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या प्राथमिक तपासानुसार, भेसळयुक्त खतांच्या उत्पादन व विक्रीमुळे शासनाची तसेच शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा आरोप असून, या प्रकराणाचा पुढील तपास मंगळवेढा पोलिस करत आहेत.

सध्या राज्यात शेतकऱ्यांना कृषी दुकानात उपलब्ध असलेल्या खतामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ व रासायनिक उपयोग होत असल्याने शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने उगवलेल्या पिकामध्ये विश्वासाने टाकलेल्या खतामुळे हातचे आलेले पीकाचे रासायनिक आणि भेसळयुक्त खतामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तालुका आणि जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन ग्रामीण भागासह तालुका पातळीवर असलेल्या सर्व कृषी केंद्र दुकानात धाड टाकून तपासणी करावी अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

भूसुरूंगाच्या स्फोटात चार जवान जखमी

श्रीनगर,ता.१६-

जम्मू-काश्मिरमधील राजौरी जिल्ह्यात मंगळवारी सैन्याच्या नियमित गस्तीदरम्यान एका भूसुरुंगाचा अचानक स्फोट झाला.या स्फोटात एका ज्युनिअर कमिशन्ड ऑफिसरसह (जेसीओ) भारतीय लष्कराचे चार जवान जखमी झाले.

ही घटना राजौरी जिल्ह्यातील नौशेरा सेक्टरमधील कलाल येथे घडली. सैन्याचे एक पथक सीमेवर नियमित गस्त घालत असताना चुकून एक भूसुरुंग सक्रिय झाला आणि जोरदार स्फोट झाला.स्फोटाचा आवाज ऐकताच सीमारेषेवर तैनात असलेले अन्य सुरक्षा जवान तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि बचावकार्य सुरू केले.या दुर्घटनेत जखमी झालेल्या जेसीओसह तिन्ही जवानांना तात्काळ प्राथमिक उपचार देऊन लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

सीमेपलीकडून होणारी दहशतवादी घुसखोरी रोखण्यासाठी अग्रभागी भागांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने भूसुरुंग पेरले जातात. मात्र, अनेकदा मुसळधार पाऊस आणि भूस्खलन यामुळे हे भूसुरुंग मूळ जागेवरून वाहून जाऊन इतर ठिकाणी पोहोचतात. प्राथमिक तपासानुसार, हा अपघात अशाच प्रकारे वाहून आलेल्या भूसुरुंगावर चुकून पाय पडल्यामुळे घडल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

कृष्णा नदीच्या पाण्याचा रंग बदलला

(पान १ वरून)

आणि सध्या नदीतील कमी झालेला प्रवाह या कारणांमुळे अत्यंत ब्लूमची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी पाण्यातील फॉस्फेट आणि नायट्रोजनचे प्रमाण वाढले असून पाण्याची गुणवत्ता घसरली आहे.

अशा प्रकारचे दूषित पाणी पिल्यास डायरिया, जुलाब, कावीळ यांसारखे जलजन्य आजार होण्याचा धोका असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी नदीचे पाणी पिण्यासाठी वापरू नये, जनावरांनाही हे पाणी पिण्यास देऊ नये आणि नदीत अंघोळ करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप, विहिरी, नळपाणी योजना किंवा इतर सुरक्षित व शुद्ध पाण्याच्या स्रोतांचा वापर करण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि जनावरे यांना नदीच्या पाण्यापासून दूर ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, नदीच्या पाण्याची पुढील तपासणी आणि आवश्यक उपाययोजना सुरू असल्याची माहिती देण्यात आली. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

२५ लाखाचा मुद्देमाल जप्त

(पान १ वरून)

२ हजार ६९८ कार्बाईड इन्सर्ट चोरीचा गुन्हा, ४ लाख ५८ हजार ४३५ रुपयाच्या १ हजार २८० कार्बाईड इन्सर्ट व १२ ड्रिल्स चोरीचा दुसरा गुन्हा तसेच गांधीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ४ लाख ३ हजार ७७६ रुपयांच्या ६५५ कार्बाईड इन्सर्ट चोरीचा तिसरा गुन्हा उघड झाला आहे. या कारवाईत एकूण २५ लाख ३६ हजार ७२३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चोरीच्या साखळीमागील इतर संशयितांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कफ सिरप मिळणार नाही

(पान १ वरून)

पूर्वीप्रमाणेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय उपलब्ध राहतील. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सरकारने या संदर्भात मसुदा जारी करून हरकती मागवल्या होत्या, ज्यावर आता अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे. आता सर्दी-खोकला झाला म्हणून औषधांच्या दुकानात जाऊन थेट 'कफ सिरप' विकत घेता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपच्या विक्रीबाबत अत्यंत कडक पाऊल उचलले आहे. यापुढे डॉक्टरांच्या लेखी चिठ्ठीशिवाय कोणत्याही औषध दुकानात कफ सिरप मिळणार नाही. मध्य प्रदेशात दूषित कफ सिरपमुळे २२ चिमुरड्यांचा मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने औषध नियमावलीतील 'शेड्यूल के' मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. या अंतर्गत कफ सिरपला डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकण्याची असलेली सवलत आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

कुपवाडमध्ये हळद मिलला भीषण आग

(पान १ वरून)

आणली. दरम्यान, हमाल बांधव आणि कामगारांनीही धाडस दाखवत आगीतून मार्ग काढला. जीवाची पर्वा न करता त्यांनी मिलमधील उर्वरित हळदीचा साठा आणि इतर माल सुरक्षित स्थळी हलविला. त्यामुळे संभाव्य मोठे नुकसान टळण्यास मदत झाली.शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात असला तरी आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अग्निशमन विभाग आणि संबंधित यंत्रणांकडून घटनेची चौकशी सुरू असून नुकसानीचा अचूक आकडा तपासानंतर समोर येणार आहे.सुदैवाने या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

हळद मिलला आग लागल्यानंतर साहित्य अन्यत्र हलविताना तसेच आग विझविताना घेतलेले छायाचित्र.

जमीन मोजणीचे नवे नियम

(पान १ वरून)

कौटुंबिक वाटणी मोजणी- कोर्ट वाटप किंवा आपसातील संमतीने होणाऱ्या कौटुंबिक जमिनीच्या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा अवघे २०० रुपये शुल्क आकारले जाईल. **ग्रामीण भाग मोजणी दर-** हेक्टरपर्यंतच्या जमिनीसाठी नियमित मोजणी फी २,००० रुपये, तर ३० दिवसांत मोजणी करून देणाऱ्या दुतगती मोजणीसाठी ८,००० रुपये शुल्क असेल. **शहरी भाग मोजणी दर-** १ हेक्टरपर्यंतच्या जमिनीसाठी नियमित मोजणी फी ३,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. **गुंठेवारी मोजणी-** महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत येणाऱ्या भूखंडांच्या मोजणीसाठी नियमित दरापेक्षा दीडपट शुल्क आकारले जाईल.मोजणीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास काय? - **अर्जदार गैरहजर राहिल्यास दंड :** निश्चित केलेल्या मोजणीच्या दिवशी जर अर्जदार स्वतः शेतावर गैरहजर राहिला, तर त्याला पुनर्भेट शुल्क म्हणून मूळ फीच्या ५० टक्के किंवा कमाल १०,००० रुपयांपर्यंत दंड भरावा लागेल. **भूमापक (अधिकारी) गैरहजर राहिल्यास सवलत :** जर निश्चित तारखेला संबंधित सरकारी भूमापक किंवा अधिकारी अनुपस्थित राहिला, तर मात्र अर्जदाराला कोणतेही अतिरिक्त पुनर्भेट शुल्क द्यावे लागणार नाही. **उच्चतपासणी फी-** कनिष्ठ भूमापकाने केलेल्या मोजणीवर काही आक्षेप असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पुन्हा तपासणी करण्यासाठी मूळ शुल्काच्या ३ ते ५ पट अधिक फी भरावी लागेल.

विकसित भारत-जीरामजी योजनेची अंमलबजावणी होणार

मुंबई,ता.१६-

राज्यात केंद्र पुरस्कृत विकसित भारत-जी राम जी योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ या कायद्याशी सुसंगत अशा तरतुदी करण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयामुळे ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शाश्वत उपजीविका संधींचा विस्तार तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार असून विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे. केंद्र सरकारच्या विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अर्थात 'विकसित भारत-जी राम जी' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करता येणार आहे. त्यासाठी विकसित भारत रोजगार आणि आजीविका हमी मिशन (ग्रामीण) कायदा, २०२५ मधील कलम ३० नुसार महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुसंगत सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील कलम ३-अ (१) अंतर्गत राज्यात ही योजना राबविण्यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास आणि त्यानुसार खर्चासही मान्यता मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या कायद्यातील आवश्यक सुधारणांना व त्याबाबतच अध्यादेश काढण्यासाठी राज्यपाल महोदयांना मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

घरातून दागिने लंपास

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

मिरज तालुक्यातील नावरसवाडी येथील एका घरातून चोरट्याने दोन तोळे सोन्याच्या दागिन्यासह चांदीचा ऐवज लंपास केला आहे. याप्रकरणी विजय विश्वास फाळके यांनी सांगली ग्रामीण पोलिसात फिर्याद दिली आहे. नावरसवाडी येथे राहणारे विजय फाळके हे झोपी गेल्यानंतर सोमवारी पहाटे दोन चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करीत ऐवज लंपास केले.

ठाकरेंचे सहा खासदार चार्टर्ड विमानाने दिल्लीत

मुंबई,ता.१६-

उद्धव ठाकरे यांची शिवसेना फुटीच्या उंबरठ्यावर असून एकनाथ शिंदे यांच्याकडून ऑपरेशन टायगर सुरू करण्यात आल्याच्या चर्चांनंतर गोल्या आहेत. उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या बैठकीला नऊ पैकी फक्त चारच खासदार उपस्थित असल्याने या चर्चांना आणखीनच बळ मिळाल्याचे सांगितले जाते. त्यातच आता ठाकरेंचे सहा खासदार चार्टर्ड विमानाने दिल्लीत दाखल झाले आहेत. त्याचवेळी एकनाथ शिंदेही दिल्लीकडे रवाना झाले असून बुधवारी सकाळी ते या खासदारांची भेट घेणार असल्याची माहिती आहे.

नांदेड विमानतळावरून संध्याकाळी ७.३० वाजता चार्टर्ड विमान दिल्लीकडे रवाना झाल्याची माहिती आहे. परभणीचे खासदार संजय जाधव, हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर आणि यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख यांच्यासह सहा खासदार त्यामध्ये असल्याची माहिती आहे. हे सर्व खासदार हे नॉट रिचेबल असल्याचे सांगितले जात आहे.

ठाकरेंचे एकूण नऊ खासदार असून त्यापैकी सहा खासदार नॉट रिचेबल असून ते बुधवारी लोकसभा अध्यक्षांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यावेळी ते आपल्या पाठिंब्याचे पत्रही देणार असल्याची माहिती आहे.

९ नद्यांवरील उपसा बंदी ३ दिवसांसाठी शिथिल

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

इरिगेशन फेडरेशन व लाभधारक शेतकरी यांच्या सोबत दि. १५ जून रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार इरिगेशन फेडरेशन व लाभधारक शेतकरी यांनी दूधगंगा धरण वगळता इतर सर्व धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा असल्याने शेतीकरिता एक सिंचन आवर्तन देण्याची मागणी केली असल्याने दूधगंगा नदी वगळता सर्व नद्यांवरील उपसाबंदी १७ ते १९ जून पर्यंत शिथिल करण्यात आली असल्याची माहिती कोल्हापूर पाटबंधारे विभागाने दिली.

दि. २० जून रोजी धरणांतील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पुढील आदेश निर्गमित करण्यात येणार आहेत. धरणांतील व प्रकल्पातील मर्यादित पाणीसाठ्याचा विचार करुन बिगर सिंचन पाणी वापरकर्त्यांकडून सांडपाणी/औद्योगिक वापरातील पाणी,थेट नदीत सोडून पाणीसाठा दूषित कर नये. प्रदूषित पाणी वाहून जाण्यासाठी अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध नसल्याने सर्व संबंधितांनी याची दक्षता घेऊन पाणीनाश टाळावा, असे आवाहन पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे.

|| भावपूर्ण श्रध्दांजली ||

श्री. संजयजी राधेश्यामजी ओझा

आमचे परमप्रिय, मातृभुमी स्वीटमार्टचे मालक श्री. संजयजी राधेश्यामजी ओझा यांचे सोमवार, दि. १५/०६/२०२६ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना...!

वासुदेव बांगड * दिनानाथ होगाडे * नंदकुमार कौंडाडे
संजय सातपुते * हेमंत कबाडे * रवि सावंत
विजय कवठे * फिरोज बागवान * सुधीर बिडकर
अजित करडे (सर) * महावीर बंब * चंद्रकांत मिठारी

ऋणानुबंध परिवार 1978

भावपूर्ण श्रध्दांजली!

करणी प्रोसेसचे मालक, आपल्या सर्वांना आदरणीय असणारे पितृतूल्य श्री. गोपालदासजी राठी (पापाजी) यांचे मंगळवार, दि. १६/०६/२०२६ रोजी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

श्री. गोपालदासजी राठी

* सर्व स्टाफ, कर्मचारी परिवार *

करणी ग्रुप

|| पाचवे पुण्यस्मरण ||



स्व. श्री. सितारामजी महाजन

आमचे आदरणीय पिताश्री स्व. श्री. सितारामजी महाजन यांच्या पाचव्या पुण्यस्मरणनिमित्त भावपूर्ण आदरांजली!

सुनिल सिताराम महाजन * विनय सिताराम महाजन

महाजन परिवार, इचलकरंजी.

शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी

दर वाढल्याने पालकवर्गाच्या खिशाला कात्री

इचलकरंजी ता.१६–
येथील महापालिकेच्या शाळांसह शहरातील अन्य शाळांमध्ये सोमवारी नवागतांचे उत्साहात स्वागत झाले. आता नवीन शैक्षणिक वर्षाच्या शैक्षणिक साहित्याच्या खरेदीसाठी विद्यार्थ्यांसह पालकवर्गाची लगबग वाढली आहे. शैक्षणिक किमतीत ५ ते २५ टक्के तर गणवेशाच्या किमतीमध्ये २५ ते ५० टक्के पर्यंत वाढ झाल्याने त्याचा फटका पालक वर्गाच्या खिशाला लागत आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाला सोमवार १५ जून पासून सुरुवात झाली. शाळा सुरू होण्यापूर्वी तसेच शाळा सुरू झाल्यानंतर शहरातील पुस्तक विक्रेते,स्टेशनरी दुकाने व गणवेश विक्री केंद्रामध्ये पालक विद्यार्थ्यांची गर्दी वाढू लागली आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेने यंदा शैक्षणिक साहित्यामध्ये तसेच गणवेशाच्या किमतीत वाढ झालेली दिसून येते. गतवर्षीच्या तुलनेत वह्या,पाठ पुस्तके, स्कूल बॅग ,कंपास व इतर शैक्षणिक साहित्याच्या किमतीमध्ये पाच ते पंचवीस टक्के पर्यंत वाढ झाली आहे, तर गणवेश निर्मितीचा खर्च वाढल्याने गणवेशाच्या किमतीमध्ये २५ ते ५० टक्के पर्यंत वाढ झालेली दिसते. त्यामुळे यंदा वाढलेल्या महागाईमुळे पालकांच्या खिशाला कात्री लागणार आहे.तर मध्यमवर्गीय आणि कामगार कुटुंबावर शैक्षणिक खर्चाचा अधिक आर्थिक ताण वाढल्याचे चित्र दिसत आहे.

स्टेशनरी दुकानात शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी केलेली गर्दी (छाया–मयूर चिंदे)

शहर परिसरात नवीन पाठ पुस्तकासह निम्म्या किमतीपेक्षा जादा किमतीमध्ये जुनी पाठपुस्तके विक्रीची दुकाने सुरू झाले आहेत. त्यामध्ये पालक वर्गासह विद्यार्थी पुस्तक खरेदीसाठी गर्दी करत असल्याचे चित्र दिसत आहे.

हिसडा मारून वृध्देच्या गळयातील गंठण लंपास

इचलकरंजी,ता.१६ –
फिरण्यासाठी गेलेल्या वृद्धेच्या गळ्यातील सोन्याचे गंठन अज्ञात चोरट्याने हिसकावून नेल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. लक्ष्मी दगडू लोटके (वय ६७, रा. बंडगर माळ) असे वृद्ध महिलेचे नाव असून तिच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे अंदाजे ८० हजार किमतीचे गंठन लंपास केले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, लक्ष्मी लोटके या सकाळी फिरण्यासाठी बंडगर माळ ते राजर्षी छत्रपती शाहू पुतळा मार्गावर चालत जात होत्या. सकाळी साडे सहाच्या सुमारास पंचवटी चित्रमंदिर समोरील स्वामी समर्थ मंदिराजवळ एका चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १५ ग्रॅम वजनाचे, सुमारे ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठन बळजबरीने हिसकावून नेले, असे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

पालक शिक्षक संघ, इचलकरंजी
MISSION e ADMISSION 2026
MHT-CET नंतरची इंजिनिअरींग प्रवेश प्रक्रिया माहिती शिबीर
प्रमुख व्याख्याते - प्रा.डॉ.अनिलकुमार गुप्ता • प्रा.डॉ.अजित पाटील
• बुधवार 17 जून 2026 दुपारी 2.00 वा.
• मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, इचलकरंजी.
Cut off पुस्तिकेचे उपस्थित विद्यार्थ्यांना वितरण
उमेशचंद गढी (9372214467) • राजेंद्र निंबाळकर (9823227218)
प्रा. एस. जे. पाटील (9850785615) • प्रा. व्ही. ए. देवकारे (9372214467)
MHT-CET मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

विनम्र अभिवादन
आष्टा नगरीचे भाग्यविधाते आमचे दैवत, माजी आमदार, स्व. विलासरावजी शिंदे (साहेब) यांना पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन!
मा.आ.स्व. विलासरावजी शिंदे साहेब
प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी
राजाराम शिक्षण संस्था, आष्टा
तालुका - वाळवा, जिल्हा - सांगली
* टिप :- स्व.मा.आ. विलासराव शिंदे यांना अभिवादन करण्यासाठी सकाळी ९.३० ते १२.३० या वेळेत शक्तीस्थळ (आष्टा) येथे उपस्थित रहावे.

॥ हार्दिक शुभेच्छा ॥

मा.श्री. सतिश उर्फ बंडू मुळीक
आमचे परममित्र, इचलकरंजी महानगरपालिकेचे प्रथम स्थायी समिती सभापती, मा.श्री. सतिश उर्फ बंडू मुळीक यांचा उद्या गुरूवार, दि. १८/०६/२०२६ रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
गणपती कट्टा परिवार, इचलकरंजी

सतीश मुळीक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

इचलकरंजी, ता.१६ – इचलकरंजी महानगरपालिकेचे स्थायी समितीचे प्रथम सभापती सतीश मुळीक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुवार,ता.१८ जून रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हुनमान मंदिर कार्यालय जवाहरनगर येथे विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत.यामध्ये एसटी पास वाटप,पेन्शन हयातीचा दाखला,आधारकार्ड अपडेट करणे,रक्त तपासणी,आरोग्य तपासणी,रक्तदान शिबीर,स्मार्ट सोलर योजना,आयुष्यमान भारत कार्ड,वृक्षारोपण,शालेय साहित्य व टाळ वाटप आदि कार्यक्रम होणार आहेत.

त्याचबरोबर प्रभाग ५ मधील सफाई कर्मचारी,विद्युत कर्मचारी,आशा सेविका यांचा सत्कार आमदार डॉ. राहूल आवाडे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमाचा जास्ती जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

घरात घुसून एकास मारहाण

कोल्हापूर ता.१६(प्रतिनिधी)–
पत्नीला त्रास देत असल्याच्या संशयातून नितीन विजय सारडा (वय ५२, रा. शिवाजी पार्क, कोल्हापूर) यांना संबंधित महिलेच्या पतीने शिवाजी पार्क येथील घरात घुसून मारहाण केली. हा प्रकार रविवारी (दि. १४) रात्री साडेनऊच्या सुमारास घडला.

याबाबत सारडा यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी हल्लेखोर श्रीपाद पाटील आणि एका अनोळखी युवकावर गुन्हा दाखल केला.

CREDAI ICHALKARANJI
सेवा, संस्कार आणि समाज बांधणीची अखंड प्रेरणा....
क्रेडाई इचलकरंजी चे संस्थापक अध्यक्ष व आमचे मार्गदर्शक, इचलकरंजी चे सुप्रसिद्ध उद्योगपती मा. श्री.
नितिनजी रामकिशोरजी धूत
यांची
कोल्हापूर जिल्हा माहेश्वरी समाजाच्या
जिल्हाध्यक्ष पदी निवड
झालेबद्दल
हार्दिक हार्दिक अभिनंदन

आपल्या पुढील वाटचालीस
मन:पूर्वक शुभेच्छा !
आपले यश हे समाजाच्या प्रगतीचे नवे पर्व ठरो !
आपले नेतृत्व, दूरदृष्टी आणि समाजसेवेची भावना यामुळे माहेश्वरी समाज निश्चिंतच नवी उंची गाठेल, हीच शुभेच्छा...!
शुभेच्छुक
रणजीत लायकर, सय्यद गफारी, मयुर शहा, तानाजी हराळे, जहीर सौदागर, पवन डाळ्या, राजेंद्र खंडेराजुरी, राजु पाटील, सुहास आकिवाटे, मितेश बलवान, फिरोज शिकलगार, साजिद बेडकाळे, श्रेणिक शहा

आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करणारा
नवा भारत!

नरेंद्र मोदी प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री

₹३८,४०० कोटींच्या संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांच्या विक्रमी निर्यातीमुळे वाढला भारताचा गौरव.
५,५००+ हून अधिक संरक्षण साहित्य आयात यादीतून वगळले; स्वदेशी संरक्षण उद्योग क्षेत्राला मिळाली चालना.
१२ वर्षे विश्वासाची, विकासाची, जन-कल्याणाची
भारत सरकार

एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री
सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री

महासत्ता

सुविचार :- कारण सांगणारी लोक यशस्वी होत नाहीत. आणि यशस्वी होणारी लोक कारण सांगत नाहीत.

■ संपादकीय ■

आणखी एक ऑपरेशन

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'ऑपरेशन टायगर' राबवण्याच्या निमित्ताने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील सात खासदार फोडण्याचा तथाकथित डाव रचल्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या खासदारांची जी बैठक बोलावली होती, त्यावरून उलट सुलट चर्चा सुरू झाली आहे. या बैठकीला सर्व नऊ खासदार उपस्थित नव्हते. काही खासदारांनी आपल्या अनुपस्थितीची योग्य कारणे दिली असली, तरी काही खासदार नॉट रिचेबल होते. अशा प्रकारच्या बातम्या येत,असताना शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी पाच खासदार प्रत्यक्ष उपस्थित आणि चार खासदार ऑनलाईन उपस्थित होते, असे म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी घेतलेल्या या बैठकीचे जे तपशील माध्यमांमध्ये येऊ लागले आहेत ते पाहता राज्यात कोणते ना कोणते राजकीय ऑपरेशन सुरू आहे असेच संकेत मिळत आहेत. कारण या बैठकीमध्ये उपस्थित खासदारांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीमध्ये ज्यांना जायचे आहे त्यांनी जावे असे विधान केले आहे. 'उडाले ते कावळे, बाकीचे मावळे' हे उद्धव ठाकरे यांचे नेहमीचेच विधान आहे. पण अशा प्रकारे सातत्याने कावळे उडून जात असताना किती मावळे बाकी राहिले आहेत हेसुद्धा आता उद्धव ठाकरे यांना पहावे लागणार आहे. एकीकडे शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांनी आता देशाचे नेतृत्व करावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली असताना या दोन्ही पक्षांची राज्यातील स्थितीच कमकुवत होत आहे हे वास्तवही त्यांना स्वीकारावे लागणार आहे. काही वर्षांपूर्वी जेव्हा एकनाथ शिंदे यांनी ५० पेक्षा जास्त आमदारांसह स्वतंत्र गट स्थापन करून नंतर संपूर्ण शिवसेनेवरच दावा सांगितला, तेव्हा उद्धव ठाकरे यांच्याबाबत राज्यात राजकीय सहानुभूती निर्माण झाली होती. लोकसभा निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने चांगली कामगिरीही केली होती. पण अधूनमधून या राजकीय ऑपरेशनच्या चर्चा समोर येत असतात. शिवसेनेचे नेतृत्व करणारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सतत पायाला भिंगरी लावून राज्यात फिरत असतात. केवळ सरकारी कार्यक्रम नव्हे, तर पक्षसंघटनेच्या कार्यक्रमांमध्येही ते भाग घेऊन पक्षसंघटन कसे वाढेल याकडे लक्ष देत असतात. पण दुर्दैवाने तशा प्रकारची संघटनात्मक तीव्रता उद्धव ठाकरे किंवा त्यांच्या इतर सहकाऱ्यांकडे नाही. आजारपणामुळे उद्धव ठाकरे यांना राज्याचा दौरा करणे शक्य नसले तरी, त्यांचे उत्तराधिकारी आदित्य ठाकरे आणि शिवसेनेतील इतर पदाधिकारी राज्याचा कानाकोपरा पिंजून काढून संघटन बळकट करू शकतात, एखाद्या मोठ्या आंदोलनाची घोषणा करून ठसा उमटवू शकतात. पण तसे कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. गेल्या काही कालावधीमध्ये महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसने काही मोठी आंदोलने केली, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे रोहित पवार सातत्याने भूमिका घेऊन आंदोलने करताना दिसतात. पण अशा प्रकारच्या आंदोलनांना पाठिंबा देण्याव्यतिरिक्त शिवसेनेकडून स्वतःचे असे कोणतेही आंदोलन होत नाही, हेसुद्धा या निमित्ताने अधोरेखित होत आहे. पण पक्ष संघटनेला एखादा ठोस कार्यक्रम दिल्याशिवाय आणि पक्षाचे प्रमुख नेत्यांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे नेतृत्व केल्याशिवाय पक्ष संघटना जिवंत राहत नाही आणि बळकटही होत नाही हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडून सातत्याने आमच्याकडून कोणतेही ऑपरेशन टायगर वगैरे सुरू नाही असे सांगण्यात येत असले तरी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील आणखी काही नेते आपल्याकडे येत असतील तर त्यांना ते हवेच आहेत. ज्याप्रकारे तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर फुटीर गटाने त्रिपुरातील एका पक्षामध्ये सामील होऊन मोदी सरकारला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली, त्या प्रकारे केंद्रातील सरकारचा पाठिंबा वाढविण्यासाठी स्वतः एकनाथ शिंदेसुद्धा उत्सुक आहेत. कारण त्यामुळे त्यांची प्रतिमासुद्धा दिल्लीच्या राजकारणात आणखी उठून दिसणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे सत्ताधारी पक्षासोबत असण्याचे फायदे राज्यातील बहुतेक राजकीय नेत्यांना ठाऊक आहेत. जरी मातोश्रीवरील बैठकीनंतर संजय राऊत यांनी ऑपरेशन टायगर वगैरे काही अस्तित्वात नाही, उलट आम्ही ऑपरेशन लांडगा लवकरच राबवणार आहोत अशा प्रकारची घोषणा केली असली तरी आमदार, खासदार आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना जोडून धरण्यासाठी शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांना पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आगामी कालावधीमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. पक्ष संघटना बळकट करण्याचे ऑपरेशन त्यांना राबवावे लागणार आहे.

न्हाऊदे युद्धबंदीचे घोडे

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील वाढती बेरोजगारी, महागाई, जनमताचा दबाव आणि सिनेटमधील वाढता विरोध लक्षात घेऊन युद्धबंदीची घोषणा केली आहे. ही युद्धबंदी खरी मानायची की केवळ राजकीय डावपेच ते काळच ठरवेल.

निवडणुकीत विजय मिळवून व्हाईट हाऊसमध्ये पोहोचल्यानंतर युद्धे थांबविण्याचे आश्वासन देणारे ट्रम्प स्वतःच इराणविरोधातील युद्ध मोहिमेत इस्रायलच्या बाजूने उभे राहिले. तीन महिने उलटून गेले तरी संघर्ष पूर्णपणे थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. युद्ध सुरू करणे सोपे असते; परंतु ते थांबविणे कठीण असते हेच यावरून दिसून येते म्हणूनच युद्धबंदी ही तारेवरची कसरत असते, असे म्हटले जाते. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेतील वाढती बेरोजगारी, महागाई, जनमताचा दबाव आणि सिनेटमधील वाढता विरोध लक्षात घेऊन युद्धबंदीची घोषणा केली खरी; परंतु शांतता कराराच्या अंतिम टप्प्याबाबत संभ्रम कायम असल्याने युद्धबंदी खरी की खोटी, असा संशय निर्माण होतो. ट्रम्प यांच्याबद्दल असा आरोप केला जातो की, ते बोलतात एक आणि करतात दुसरेच! यामुळे अमेरिकेच्या इतिहासातील सर्वाधिक वादग्रस्त आणि अविश्वासार्ह राष्ट्राध्यक्षांपैकी एक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. ट्रम्प युद्धबंदीची घोषणा करतात; पण इराण त्याला फारसे महत्त्व देत नाही. इराणचा अणु कार्यक्रम, संबंधित युरेनियमचा साठा, अमेरिकेकडून निर्बंध सवलत आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाज वाहतुकीची सुरक्षा या प्रमुख मुद्यांबाबत इराणने सावध भूमिका घेतली आहे. इस्लामाबाद सामंजस्य करारातील तपशिलाबाबत तर्क वितर्क टाळण्याचे आवाहन इराणचे पराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी केले आहे. या संघर्षामुळे जागतिक ऊर्जाबाजार, तेल वाहतूक आणि मध्य पूर्वेतील सुरक्षा व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि अनेक देशात महागाई वाढली. ट्रम्प यांनी युद्धविरामाची घोषणा करताच शेअरबाजारात तेजीचा सूर पकडला. ब्रेंट क्रूड तेलाचे दर

८७ डॉलर प्रती बॅरलपर्यंत घसरले. युद्धाच्या तणावात ब्रेंट कच्च्या तेलाचे दर ११० डॉलरपर्यंत वाढले होते. सध्या तेलाच्या दरात दिलासा मिळाला आहे. युद्धकाळात तेलाच्या चढ्या दरामुळे अमेरिका, युरोप, आशिया,आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि लॅटिन अमेरिकेतील अर्थव्यवस्थांवर विपरीत परिणाम झाला होता.जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या होत्या तसेच आर्थिक अनिश्चितता वाढली होती. अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष कमी होण्याची चिन्हे दिसताच शेअर बाजारात तेजी आली, कच्च्या तेलाच्या किमती काही प्रमाणात घटल्या. अमेरिकन कॉंग्रेस आणि संरक्षण विभागाच्या अहवालानुसार युद्धामुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि लष्करी नुकसान झाले. युद्ध जिंकण्याचा दावा करणाऱ्या ट्रम्प प्रशासनाला प्रत्यक्षात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराच्या मसुद्यात अणु कार्यक्रम, तेलबंदी, गोठवलेली मालमत्ता आणि होर्मुझची सामुद्रधुनी या मुद्यांवर एकमत झाल्याचे एका वरिष्ठ इराणी अधिकाऱ्याने म्हटले आहे. त्यानुसार इराण अणुशस्त्रे विकसित करणार नाही किंवा इतर कोणत्याही देशाकडून ती घेणार नाही. इराण होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी खुली करणार आहे. त्या बदल्यात अमेरिका इराणी बंदरावरील आपली नौदल नाकेबंदी उठवेल आणि इराणच्या तेल निर्यातीवरील निर्बंधही तात्पुरते शिथिल करेल. अंतिम करारावर एक मसुदा आधीच तयार करण्यात आला आहे मात्र, त्याच्या अटी आणि त्यांच्या स्वीकारार्हते बद्दल बरीच अनिश्चितता आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील करारावर चर्चा सुरू असून त्यावर लवकरच स्वाक्षरी होईल, असा ट्रम्प यांचा दावा आहे. मसुद्यानुसार,अमेरिका

दैनंदिनी

इराणची २५ अब्ज डॉलर्स किंमतीची जप्त केलेली मालमत्ता परत करेल. अमेरिका आपल्या मित्र राष्ट्रांसोबत इराणच्या पुनर्विकास आणि विकासासाठी एक योजना तयार करण्याचे काम करेल. अंतिम करार होईपर्यंत इराण आपल्या सध्याच्या अणु कार्यक्रमात कोणतेही मोठे बदल करणार नाही. युरेनियमचे संवर्धन करणार नाही अथवा नवीन अणु सुविधांचा विस्तार करणार नाही. लेबनॉनसह सर्व प्रादेशिक आघाड्यांवरील लष्करी संघर्ष तात्काळ आणि कायमस्वरूपी संपुष्टात आणला जाईल. इस्रायलच्या सततच्या लष्करी कारवाया आणि विरोधानंतरही अमेरिकेने मसुद्यात लेबनॉनसह सर्व आघाड्यांवर युद्धविराम करणाऱ्या इराणच्या अटीला सहमती दर्शवली आहे. अमेरिका ३० दिवसांच्या आत नौदल नाकेबंदी पूर्णपणे हटवणार आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ३० दिवसांच्या आत पुन्हा खुली केली जाईल. ही सामुद्रधुनी इराणी नियामक चौकटीनुसार कार्यरत राहील आणि त्यातून जाणाऱ्या जहाजांकडून टोलऐवजी सेवा शुल्क आकारण्याची इराणला मुभा असेल. जप्त केलेल्या मालमत्तेच्या परतफेडीसाठी ६० दिवसांचा वाटाघाटीचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. इराणला आपला शांततापूर्ण नागरी अणुऊर्जा कार्यक्रम सुरू ठेवण्याची परवानगी दिली जाईल. कराराच्या तरतुदींची अंमलबजावणी आणि पालनावर देखरेख ठेवण्यासाठी एक समर्पित यंत्रणा स्थापन केली जाईल आणि अंतिम करार संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या ठरावाद्वारे अधिकृतपणे लागू केला जाईल.

तहानलेले दिवस : संकट पावसाचे की नियोजनाचे?

महाराष्ट्रात जून महिना अर्धा संपला आहे, पण पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. गेल्या वर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यानंतरही यंदा राज्यातील अनेक भागांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पुण्यापासून मराठवाड्यापर्यंत, विदर्भापासून कोकणाच्या उंबरठ्यापर्यंत आणि मुंबईसारख्या महानगरालाही टँकरच्या सावटाखाली जगावे लागत आहे. ही केवळ नैसर्गिक आपत्ती नाही; ती आपल्या जलव्यवस्थापनातील त्रुटींचेही प्रतिबिंब आहे.

राज्य सरकारने पुढील तीन महिने पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. सिंचनासाठीचे आवर्तन बंद करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना आणि जलसंपदा विभागाला तातडीच्या उपाययोजनांचे आदेश दिले आहेत. हे निर्णय आवश्यक असले तरी ते संकटावरचे तात्पुरते मलम आहेत. मूळ प्रश्न असा आहे की, मागील वर्षी धरणे भरून वाहिली असताना आज ही वेळ का आली?

राज्यातील विविध भागांतील आकडे चिंताजनक आहेत. पुण्यात दिवसाआड पाणीपुरवठ्याची वेळ आली आहे. मराठवाड्यातील जायकवाडीसह अनेक धरणांतील साठा घटत चालला आहे. विदर्भातील नद्या कोरड्या पडत आहेत. कोल्हापूरसारख्या पावसाळी जिल्ह्यातही पिण्याच्या पाण्यासाठी शेतीचा पुरवठा बंद करावा लागत आहे. मुंबई आणि उपनगरांमध्ये टँकरची संख्या वाढत आहे. या चित्रातून राज्याच्या जलसुरक्षेतील कमकुवतपणा स्पष्ट दिसतो.

प्रश्न केवळ कमी पावसाचा नाही. पाणी साठविण्याची, जिरविण्याची आणि पुनर्वापराची यंत्रणा किती प्रभावी आहे, याचाही आहे. पाणी अडवा-पाणी जिरवा, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च झाले. परंतु आजही हजारो गावे टँकरवर अवलंबून असतील तर त्या योजनांचे दीर्घकालीन परिणाम कितपत साध्य झाले, याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन होणे आवश्यक आहे. निधी खर्च झाला म्हणजे उद्दिष्ट साध्य झाले, असे मानता येत नाही.

दुसरीकडे, पाणीचोरी आणि गळती ही मोठी समस्या आहे. अनेक शहरांमध्ये ३० ते ४० टक्के पाणी वितरण व्यवस्थेतच वाया जाते. धरणे, कालवे आणि नद्यांमधून होणारा बेकायदा उपसा आजही सुरू आहे. प्रशासनाने विशेष मोहिमा राबविण्याचे आदेश दिले असले तरी त्या सातत्याने आणि कठोरपणे राबविल्या गेल्या पाहिजेत. पाणी हा संसाधनांचा प्रश्न नसून शिस्तीचा प्रश्नही आहे.

या संकटाचे सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागावर होत आहेत. पाण्यासाठी महिलांची पायपीट, गावांतील वाद, स्थलांतर, पशुधनाचा प्रश्न आणि पिकांचे नुकसान ही परिस्थिती केवळ आर्थिक नाही तर सामाजिक संकट निर्माण करणारी आहे. जलविद्युत प्रकल्पांवरील परिणाम, उद्योगधंद्यांमधील अडथळे आणि पर्यावरणीय हानी बाबूळे राज्याच्या विकासावरही त्याचा परिणाम होणार आहे.तज्ज्ञांनी सुचविलेले उपाय केवळ सूचना म्हणून न राहता धोरणाचा भाग बनले पाहिजेत. ठिबक आणि सूक्ष्म सिंचनाचा व्यापक वापर, कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, शहरांतील सांडपाण्याचा पुनर्वापर, उद्योगांमध्ये सर्किट कूलिंग, घरांमध्ये पाणी बचतीची उपकरणे आणि भूजल पुनर्भरण यावर भर द्यावा लागेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, जलव्यवस्थापनात लोकसहभाग वाढवावा लागेल. जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांनी सुचविल्याप्रमाणे समाजाधारित पाणी व्यवस्थापन हाच दीर्घकालीन उपाय आहे.

आजची टंचाई ही भविष्यातील आणखी गंभीर संकटाची पूर्वसूचना आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित होत आहे. त्यामुळे केवळ पावसाची वाट पाहून चालणार नाही. पाणी साठवणे, जिरवणे आणि जपून वापरणे ही जीवनशैली बनवावी लागेल. अन्यथा दरवर्षी पावसाळ्याच्या उंबरठ्यावर उभे राहून आपण हाच प्रश्न विचारत राहू धरणे भरली होती, मग पाणी गेले कुठे?

पाण्याचे संकट हे केवळ शासनाचे नाही, तर संपूर्ण समाजाचे आहे. आज घेतलेले शाश्वत निर्णयच उद्याच्या तहानलेल्या पिढीला दिलासा देऊ शकतील. महाराष्ट्राला आता तात्पुरत्या उपायांपेक्षा जलसुरक्षेच्या दीर्घकालीन आराखड्याची गरज आहे. अन्यथा तहानलेले दिवस ही केवळ आजची बातमी राहणार नाही, तर उद्याचे वास्तव बनेल.

■ मच्छिंद्र ऐनापुरे,जत



जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होतील का ?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सामाजिक माध्यमाद्वारे अमेरिका आणि इराण यांच्यात १४ सूत्री शांतता करार झाल्याची घोषणा केली.त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या १०७ दिवसांपासून चालू असलेले युद्ध संपणार असल्याचे अंततः स्पष्ट झाले.

१९ जूनला स्विझर्लंडमधील जिनिव्हा शहरात ट्रम्प यांच्या उपस्थितीत या शांतता करारावर स्वाक्षरी करण्यात येणार आहे. त्यानंतर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद यावर अंतिम मोहोर उमटवेल आणि त्यानंतर या युद्धाची अधिकृत समाप्ती होईल. मागील साडेतीन महिन्यांहून अधिक काळ सुरु असलेल्या युद्धात भारताचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी युद्धाचे पडसाद भारतातही मोठ्या प्रमाणात उमटले आहेत. महागाईने जनता होरपळली आहे. इंधनाच्या दरात आठवडा आठवड्याने वाढ होत गेली.घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्यावर कमालीचे निर्बंध आणण्यात आले ज्याचा सर्वात मोठा फटका हॉटेल व्यावसायिकांना बसला आहे. महागाईने सामान्य जनतेचे अक्षरशः कंबरडे मोडले. इंधनाचे दर वाढल्यावर त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या दरावर होतो. अन्नधान्य,कपडे, जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला यांसह प्रवासाचे दरही गेल्या ३ महिन्यांत गगनाला भिडले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णतः कोलमडून गेले आहे. अशा परिस्थिती झालेली युद्धबंदी समस्त जगाला दिलासा देणारी आहे, त्यामुळे आतातरी इंधनासह जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी होणार का ? दैनंदिन जीवन सुखकर होणार का ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडला आहे.

■ सौ.मोक्षदा घाणेकर

वाचकांचा पत्रव्यवहार

सांगलीतील विश्रामबाग भुयारी मार्गाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

विश्रामबाग (सांगली) येथील भुयारी मार्गात दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्क्रियतेमुळे हा प्रश्न वर्षानुवर्षे कायम असून संबंधित यंत्रणा जबाबदारी झटकत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

उड्डाणपुलाच्या मंजुरीवेळी भुयारी मार्गातील पाणी उपसण्याची जबाबदारी महापालिका व सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वीकारली होती. रेल्वे प्रशासनाच्या अटींनुसारही ही जबाबदारी मान्य करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात प्रत्येक पावसाळ्यात भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणात पाणी साचते आणि मार्ग वाहतुकीसाठी बंद करावा लागतो. त्यामुळे विद्याविहार, पोलीस लाईन, विद्यानगर, वारणाली वसाहत, जिल्हा परिषद कॉलनी आणि गंगानगर परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग महिला-पुरुष आणि विद्यार्थ्यांना याचा अधिक फटका बसत आहे.

भुयारी मार्ग बंद झाल्यानंतर नागरिकांना एक ते दोन किलोमीटर अतिरिक्त अंतर पार करून उड्डाणपुलावरून ये-जा करावी लागते. त्यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या गंभीर प्रश्नाकडे महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच लोकप्रतिनिधींकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी भुयारी मार्गातील पाणी तत्काळ उपसता येईल अशी सक्षम व स्वयंचलित पंपिंग व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. आमदार, खासदार आणि संबंधित प्रभागातील लोकप्रतिनिधींनी या प्रश्नात लक्ष घालून नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करावी.

■ शशिकांत गायकवाड

मराठी विषयाची उपेक्षा,तासिकाच कमी

सर्व माध्यमांच्या शाळांना सरकार मराठी विषयाची सक्ती करत असताना नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करताना मात्र याच विषयाला आठवड्याच्या तासिकाच कमी केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.येत्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी,सहावी नवीन अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे.नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे.या अनुषंगाने इयत्ता तिसरी ते आठवीसाठी विषयवार तासिका विभागणी व वेळेचे नियोजन यात कमतरता दिसून येत आहे.

तिसरी ते आठवीसाठी विषयावर विभागणी व शालेय वेळापत्रक निश्चित करताना त्यात भाषा विषयांच्याच तासिका कमी झाल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.तासिकांची संख्या कमी करून चार करण्यात आली आहे.एकीकडे द्हावीच्या निकालात मराठीत अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढले असताना मराठी विषयाच्या तासिका कमी करणे हे संयुक्तिक वाटत नाही.पूर्वीच्या अभ्यासक्रमात आठवड्याला असणाऱ्या भाषा विषयाच्या तासिका प्रमाणेच याही धोरणात तासिका असतील तरच मराठीला न्याय मिळेल असे वाटते.अन्यथा आपणच आपल्या भाषेची उपेक्षा करीत आहोत.

■ शशिकांत जाधव

अण्णा हजारे यांच्या कार्याचा गौरव!

ज्येष्ठ समाजसेवक,माजी सैनिक अण्णासाहेब हजारे यांच्या कार्याचा गौरव म्हणून भारतीय संरक्षण मंत्रालय, व भारतीय सैन्यदलाच्या वतीने टी-५५ हा रणगाडा राळेगणसिद्धी गावाला कायमस्वरुपी भेट देण्यात आला. खरोखर अण्णासाहेब हजारे यांच्या अद्वितीय कार्याचा हा गौरव आहे.

राज्यातील असा मान मिळविणारे राळेगणसिद्धी हे पहिले गाव ठरले आहे. त्यामुळे राळेगणसिद्धीच्या वैभवात आणखी भर पडली आहे. हा रणगाडा भारतीय सैन्यदलाचे व शौर्याचे, बलिदानाचे प्रतिक आहे. १८६५ ते १९७१ च्या युद्धात या रणगाड्याने महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. राळेगणसिद्धी येथे देशभरातून असंख्य पर्यटक येतात. हा रणगाडा पाहून युवकांना भारतीय सैन्यदलात जाण्याची यामुळे नक्कीच प्रेरणा मिळेल

■ संतोष शिंदे

दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)



बुधवार,ता.१७.६.२०२६,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे, ग्रीष्म ऋतो, ज्येष्ठ मासे,शुक्ल पक्षे,तृतीया तिथी,२१.४० नंतर चतुर्थी तिथी,पुनर्वसु नक्षत्र,१३.३८ नंतर पुष्य नक्षत्र,मिथुन रास, ८.१४ नंतर कर्क रास,ध्रुव योग,२०.५२ नंतर,व्याघात योग,तैतिल करण ११.१३ नंतर, गरज करण २१.४० पर्यंत,दिनमान १३.००,सुर्योदय ६.०३, सुर्यास्त १९.०३ (कोल्हापूरचे) राहू काळ दुपारी १२ ते १.३० पर्यंत, रंभाव्रत,उत्तम दिवस सर्व कामास शुभ,ओटी भरणेस,स्थावर कामे,दुपारी २ नंतर सोने खरेदी, दग्ध २१.४० पर्यंत, मु.मोहरम मास आरंभ,हिजरीसन १४४८ प्रारंभ. **ज्योःकेशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

मिथून- व्यावसायिकदृष्ट्या आवक-जावक वाढेल. सध्या नोकरदार वर्गाला कामात उत्साह वाटणार नाही, आर्थिकदृष्ट्या खर्च कसा कमी होईल ते पाहावे लागेल.

कर्क- आर्थिक बचत कशी होईल ते पाहा. कुटुंबातील सदस्यांचा आदर करा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा. मानसिक, शारीरिक स्वास्थ्य जपा.

सिंह- पाहुणांच्या आगमनाने तुम्हाला आर्थिक लाभ होऊ शकतो. तुमच्या ज्ञानलालसेपोटी नवीन मित्र जोडाल.समाजातही वेगवेगळ्या लोकांशी भेटीगाठी होतील. वेळेचा सदुपयोग करा.

कन्या-राजकीय क्षेत्रात शुभेच्छा मिळतील. घरगुती वातावरण आनंदी राहील. भावंडांना मदत कराल. धार्मिक गोष्टींची आवड राहील. मानसिक समाधान लाभेल. आरोग्य उत्तम राहील.

तुळ- नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत चांगले प्रस्ताव येतील. आर्थिक चिंता वाटणार नाही. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. संततिसौख्य लाभेल. मानसिक समाधान लाभेल.

वृश्चिक- व्यावसायिकदृष्ट्या लाभ होईल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. कोणतेही काम करताना कुटुंबाला विश्वासात घ्या. प्रकृती चांगली राहील.

धनु-नोकरदार वर्गाने कामाकडे दुर्लक्ष करू नये. खर्च कमी कसा होईल ते पाहा. घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहा. आध्यात्मिक गोष्टींत गुंतून राहा. मानसिकता जपा.

मकर-व्यवसायात गुंतवणूक करणे टाळा. आर्थिक व्यवहार जपून करा. कुटुंबातील सदस्यांना समजून घ्या. आरोग्य जपा.वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

कुंभ-. मानसिक समाधान लाभेल. उपासना फलदूय होईल. आरोग्य उत्तम राहील.तुमच्या कलात्मक क्षमतेमुळे अनेक लोकांची कौतुकाची थाप मिळेल आणि बक्षिसही मिळेल.

मीन- मित्र-मैत्रिणींशी मनमोकळेपणाने बोलाल. संततीचे कौतुक कराल. धार्मिक गोष्टींमध्ये गुंतून राहाल. आहाराचे पथ्यपाणी सांभाळा.कामानिमित्त प्रवास घडेल.

✻ राशीभविष्य

मेष- नोकरदार वर्गाला चांगले प्रस्ताव येतील. आर्थिकदृष्ट्या परिस्थितीत बदल होईल. राजकीय क्षेत्रात तुमचे वर्चस्व राहील. संततिसौख्य लाभेल.

वृषभ- व्यावसायिकदृष्ट्या प्रगती होईल. नोकरदार वर्गाला कामाचे स्वरूप कळेल. चांगली बातमी ऐकायला मिळेल.आर्थिक लाभ होईल. कौटुंबिक जीवन सुखाचे राहील.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं. २३७३७४५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

कर्नाटकात सरकारी शाळांचे भवितव्य टांगणीला

दर्जा खालावल्याने परिस्थिती ओढवली:गरीब विद्यार्थ्यांकरीताच सरकारी शाळा

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

कर्नाटक शासनाने सरकारी शाळेतील शिक्षणातील दर्जाला नाही तर विद्यार्थ्यांच्या इतर योजनांकडे लक्ष देऊन शाळेचा दर्जा कमी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. त्यामुळे सरकारी शाळेवरील संकट गडद होत असून वर्षाकाठी कर्नाटक राज्यात शेकडो सरकारी शाळा विद्यार्थ्यांविना बंद पडत आहेत.ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत खाजगी शाळांचे जाळे गडद होत आहे. दर्जा आणि जाहिरातबाजीत खाजगी शाळा पुढे जात असल्याने सरकारी शाळा बंद पडत आहेत.

सरकारी शाळा बंद पडणे गरीब विद्यार्थ्यांच्या दृष्टीने धक्कादायक असून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे अवघड होण्याची परिस्थितीची शक्यता आहे.कर्नाटक राज्यातील सरकारी शाळांच्या अहवालाप्रमाणे प्रत्येक वर्षात अनेक शाळा बंद पडल्या आहेत. त्यामुळे सरकारी शाळेचे भवितव्य कठीण बनले आहे. पालकांतून शाळेच्या दर्जाची पाहणी केली जात आहे. शिक्षणाबरोबर आपल्या पाल्याने कला, क्रीडा आणि शारीरिक तंदुरूस्तीही तरबेज असावे, अशी पालकांची मनोभावे इच्छा आहे.मात्र याच बाबीकडे सरकार दुर्लक्ष करीत असून शिक्षणापेक्षा इतर बाबींकडे लक्ष देत असल्याने सरकारी शाळांचा दर्जा खालावत चालला आहे. याचा परिणाम विद्यार्थी कमी होण्याकडे होत चालला आहे.सरकारी शाळेकडील ओढा कमी होऊन खासगी शाळेकडे पालकांचा ओढा वाढत आहे. सरकारी शाळेत मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा खालावत चालला आहे. अनेक शिक्षक विषयानुसार शिकविण्यात कमी पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पहिल्या वर्गापासून ज्या शिक्षणाची गरज आहे. त्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहेत. पाया मजबूत नसल्याने आज ७ वीच्या वर्गातील अनेक मुलांना आपली नांवे दोन भाषेतही लिहिणे कठीण होवून बसले आहे. शिक्षकांचा शाळेपेक्षा इतर कामात जादा वेळ जात असल्याने शाळेकडे दुर्लक्ष होत आहे.

सरकारी शाळेतील शिक्षकांची मुले खाजगी शाळेत

अनेक सरकारी शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना स्वतःच्याच शिकवणीवर विश्वास नसावा, त्यामुळे अनेक सरकारी शाळेतील शिक्षक आपली मुले खाजगी शाळेत शिकविण्यासाठी घालतात. जर शिक्षकांची मुले खाजगी शाळेकडे चालली तर इतर मुलांना सरकारी शाळेकडे जाण्यास सांगणार कोण असा प्रश्न उपस्थित होत असून या कारणामुळे आज फक्त गरिबांची मुलेच सरकारी शाळेत दिसत आहेत. त्यामुळे किमान गरिबांच्या मुलांसाठी तरी सरकारी शाळांची गरज भासत असून शासनाच्या ढोळेझाक प्रकारामुळेच सरकारी शाळांचे भवितव्य कठीण होत चालले आहे.

पालकांचे लक्ष महत्वाचे...

सरकारी शाळा बंद पडत असल्या तरी ज्यांना सरकारी शाळेची गरज आहे, त्या पालकांनी सरकारी शाळाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ज्या त्या वेळी शाळेकडे लक्ष देवून मुलांच्या प्रगतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. शिक्षकांना वेळच्या वेळी सुचना देणे गरजेचे आहे. वरिष्ठाकडे तक्रार करणे गरजेचे आहे. तरच शाळेचे भवितव्य टिकले जाईल.

शाळा सुधारणा कमिटी नावालाच...

अनेक शाळेत शाळा सुधारणा कमिटी केली जाते. मात्र ही कमिटी सुधारणा ऐवजी तेथे थाट दाखविण्यातच जास्त लक्ष देते. राजकिय नेतेमंडळींना हाताशी धरून दिखावूपणा करण्यातच यांना धन्यता वाटते. एखादा कार्यक्रम करून जाहिरातबाजी म्हणजे शाळा सुधारली असाच प्रकार या लोकांचा होत असून विद्यार्थ्यांच्या समस्याकडे लक्ष दिले जात नसल्याने अनेक पालक या कमिटीपासूनही दूर राहत असल्याचे दिसत आहे.

व्हनाळी शाळेत नवोदित विद्यार्थ्यांचे मिरवणुकीने स्वागत

साके,ता.१६(वातहर)-

व्हनाळी (ता.कागल) येथील विद्यामंदिर प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या नवोदित विद्यार्थ्यांचे भव्य मिरवणुकीने स्वागत करण्यात आले.

सजवलेल्या गाडीत बसून, लेझीम पथक,मिरवणुकीने स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांना गणवेश वाटप, पुस्तक वाटप , खाऊ वाटप करण्यात आले. नूतन उपसरपंच इंदुबाई दंडवते यांनी शैक्षणिक साहित्य वाटप केले. निरीक्षक प्रसाद भूतकर, यांनी मुलांचे स्वागत केले. सरपंच दिलीप कडवे,दिनकर वाडकर, एम.बी.जाधव यांनी मनोगते व्यक्त केली.

प्रास्ताविक भिकाजी संकपाळ यांनी केले.यावेळी पं.स.सदस्य दत्तात्रय दंडवते, दिपक हातकर,रविंद्र पाटील, ओंकार कौंदाडे, राजू सुतार, राकेश कांबळे, पोपट वाडकर, जगदीश वाडकर, सखाराम पोवार, पालक व सर्व शिक्षक स्टाफ उपस्थित होते. सूत्रसंचालन एम.आर. गुरव यांनी केले. आभार मुख्याध्यापक बाळासो खामकर यांनी मानले.

अर्जुननगरः येथील एम.डी.विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना शिक्षक.

दोशी विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

अर्जुननगर येथील मोहनलाल दोशी विद्यालयात शैक्षणिक सन २०२६-२७ मधील नवप्रवेशित विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला.

यावेळी शाळा प्रमुख म्हणून मुख्याध्यापिका एस.एम.गोडबोले यांनी प्रास्ताविकातून शाळेचा विविध क्षेत्रातील यशाचा वारसा व नावलौकिक सांगून सर्वांना शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.नवागत विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात तसेच औक्षण करून आगमन झाले.तसेच मान्यवरांच्या हस्ते,गणवेश,पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.एस.एस मगदूम यांनी सर्वांना नशामुक्त राहण्याबाबत शपथ दिली.सूत्रसंचालन डी.बी.बेनाडे यांनी केले.यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक आर.डी.पाटील, आर.एस.भोसले, एस.बी.यादव, व्ही.आर.पाटील, ए.व्ही.शिरगुप्पे यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.कार्यक्रमाला जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह, यांच्यासह सर्व संचालकांचे प्रोत्साहन लाभले.

आदित्य मगदूम यांना पीएचडी प्रदान

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

सुळगावचे सुपुत्र आदित्य बाळासाहेब मगदूम यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडून वनस्पतीशास्त्र विषयावरील संशोधनासाठी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

संशोधन कार्यादरम्यान त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध नामांकित संशोधन नियतकालिकांमध्ये एकूण १५ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांच्या उल्लेखनीय संशोधन योगदानाबद्दल त्यांना प्रा.डी.सी कॉपर यंग शास्त्रज्ञ२०२५ हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.या प्रबंधाचे बाह्य परीक्षक म्हणून प्रा. हरिप्रसाद पी. यांनी काम पाहिले. तर पीएच.डी. मौखिक परीक्षा समितीचे अध्यक्ष व विभागप्रमुख म्हणून प्रा.एन.बी.गायकवाड यांनी जबाबदारी पार पाडली.या संशोधनासाठी त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ.एम.एस.निंबाळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यापूर्वी त्यांचे शोधनिबंध वायली, नेचर यासारख्या जगभरात नावाजलेल्या प्रकाशनात प्रकाशित झाले आहेत.

मातृभाषेतील शिक्षणामुळे संस्कारांची रुजवणूक होते

शोभाताई फराकटे; बोरवडे शाळेत नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात

बिद्री,ता.१६(प्रतिनिधी)-

धावत्या युगात माणसाला सुयोग्य संस्कारांच्या अभावामुळे सामाजिक समस्यांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे. यासाठी शालेय वयातच मुलांमध्ये चांगल्या संस्कारांची पेरणी करणे आवश्यक आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने अशा चांगल्या संस्कारांची बालमनात रुजवणूक होते, असे प्रतिपादन जि.प.सदस्या शोभाताई फराकटे यांनी केले.

प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव प्रसंगी आयोजित कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना शोभाताई फराकटे व अन्य मान्यवर.

बोरवडे (ता.कागल) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत नवागतांचा प्रवेशोत्सव आयोजित केला होता. याप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक कृष्णात पाटील हे होते. यावेळी नवोदितांचे वाद्यवृंदांच्या गजरात, फुलांच्या वर्षावात आणि गोडधोड पदार्थ देवून स्वागत करण्यात आले.

यावेळी उपसरपंच दत्तात्रय पाटील, ग्रा.पं.सदस्या जयश्री फराकटे, स्वप्निल फराकटे, संभाजी फराकटे, केदार फराकटे, शा.व्य.समिती अध्यक्षा सीमा साठे, उपाध्यक्ष संदिप वारके, राजेंद्र साठे, माजी मुख्याध्यापक जयसिंग पाटील, अध्यापक नारायण वारके, शशिकांत रानमाळे, महेश गुरव, प्रशांत शिंदे, पांडुरंग नन्नवरे, वर्षा नन्नवरे, दिपाली गुरव,स्मिता परीट, प्रतिभा पाटील यांच्यासह पालक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.आभार नारायण वारके यांनी मानले.

मुरगूडात बैलगाडी मिरवणूकीने नवागतांचे स्वागत

मुरगूड,ता.१६(प्रतिनिधी)-

मुरगुड येथील शिवाजी विद्या मंदिर शाळा नं. २ येथे नगराध्यक्षा सौ.सुहासिनीदेवी पाटील यांच्या उपस्थितीत मुलांना फेटे बांधून तर मुलींना प्रिन्सेस मुकुट घालून तसेच नवागतांचे बैलगाडी मिरवणूकीने स्वागत करण्यात आले.

मुरगुड नगरीच्या नगराध्यक्षा सुहासिनीदेवी पाटील व शाळा कमिटी उपाध्यक्षा वर्षा भोसले यांच्या हस्ते शाळेची घंटा वाजवून नव्या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ झाला.यावेळी अंबाबाई मंदिरापासुन शिवाजी रोड मार्गे एसटी स्टँड मार्गे शिवाजी विद्यामंदिर शाळेपर्यंत मुलांना बैलगाडी मध्ये बसवून लेझीम-कैताळाच्या गजरात त्यांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी चिमुकल्यांच्या उत्साहाला आनंदाचे उधाण आले होते.

बैलगाडीतून नवागतांचे स्वागत करताना पाणी पुरवठा सभापती सत्यजितसिंह पाटील, मुख्या.प्रविण अंगज व इतर मान्यवर.

यावेळी पाणीपुरवठा सभापती सत्यजितसिंह पाटील म्हणाले, सामान्य जनतेच्या सरकारी शाळा या सर्वसामान्य जनतेच्या हक्काच्या शाळा आहेत.येथील संस्कार आयुष्याची शिदोरी आहे.या प्राथमिक शाळा टिकल्या पाहिजेत. शाळेत पहिल्याच दिवशी दाखलपात्र विद्यार्थी २६ होते परंतु शाळेच्या गुणवत्तेमुळे ३२ मुले पहिल्याच दिवशी दाखल झाली आहेत.

सर्व पाल्यांचे स्वागत शाळा कमिटी अध्यक्ष विजय मेंडके, उपाध्यक्ष वर्षा भोसले, मुख्याध्यापक प्रवीण अंगज यांनी केले. यावेळी मुलांचे स्वागत पुजा बोटे, गणेश वंडकर,मानसिंग गोधडे व शाळा कमिटी सदस्य यांनी गुलाब पुष्प व अंकलपी, पाटी, पुस्तके देऊन करण्यात आले.

निपाणी येथे माजी खास.आण्णासाहेब जोल्ले यांना निवेदन देताना आप्पाचीवाडीतील युवक.

आप्पाचीवाडीत हायटेक शौचालय निर्मितीची जोल्ले दाम्पत्याकडे मागणी

कोगनोळी,ता.१६(प्रतिनिधी)-

श्री क्षेत्र आप्पाचीवाडी (ता. निपाणी) येथे श्री हालसिद्धनाथ देवाच्या दर्शनासाठी लाखो भाविक नेहमी येत असतात. या ठिकाणी भाविकांसाठी शौचालय व स्वच्छतागृहाची सोय व्हावी यासाठी अनेक वर्षे गावातील तरुणांनी ग्रामपंचायतीकडे मागणी केली होती. पण त्याची पूर्तता न झाल्याने सोमवारी सकाळी शेकडो तरुणांनी एकत्रित येऊन कामाला सुरुवात केली.

यावेळी ग्रामपंचायत प्रशासन व आमदार शशिकला जोल्ले यांना निवेदन देण्यात आले.माजी खास.आण्णासाहेब जोल्ले यांनी निवेदन स्वीकारुन तात्काळ निधीची व्यवस्था करुन कामास सुरुवात करण्याची ग्वाही दिली.गावासाठी व देवासाठी तरुणांनी एकत्र येऊन आण्णासाहेब जोल्ले यांची हालसिद्धनाथ साखर कारखान्यावर भेट घेऊन आपली भूमिका सांगितली. तात्काळ जोल्ले यांनी निधी मंजूर करुन कामाला सुरुवात करणार असल्याचे सांगितले. यामुळे श्री हालसिद्धनाथ देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक-भक्तांची चांगली सोय होणार असल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे.

बिरदेव मंदिर योग वर्गाचा द्वितीय वर्धापन दिन उत्साहात

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

पतंजली योग समिती निपाणी संचलित बिरदेव मंदिर योग वर्ग, यरनाळ रोड, निपाणी यांच्यावतीने द्वितीय वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते ॐ प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.त्यानंतर योगशिक्षक अनिल श्रीखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

यावेळी पतंजली योग परिवाराच्यावतीने त्यांच्या योगसेवेबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले उत्तर कर्नाटक प्रभारी किरण मनोळकर यांनी 'अष्टांग योग आणि योगाचे जीवनातील महत्त्व' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी योगामुळे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य कसे सुदृढ होते याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विविध योगासने सादर करून उपस्थितांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला निपाणी परिसरातील योगशिक्षक व योगसाधकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.यामध्ये जे.डी.शिंदे,दशरथ कुंभार,विनायक शिप्पूरे, प्रशांत रामनकट्टी, दत्तात्रेय जोत्रे, कावेरी मिरजे, आशा तिळवे, शोभा वडगावे, सुप्रिया भुसारी, दत्ता पाटील, वासुदेव पेंटर, सहदेव ऐवाळे, संजय वाडकर, आनंद संकपाळ, यांच्यासह अनेक योगप्रेमी सहभागी झाले होते.

प्रलंबित मागण्या मान्य न केल्यास ११ जुलैपासून उपोषण

ह्युमन राईट्स केअर ऑर्गनायझेशन संघटनेचा इशारा

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)-

नागरिकांच्या ११ प्रलंबित मागण्यांसाठी ह्युमन राईट्स केअर ऑर्गनायझेशन संघटनेच्या वतीने १५ जुलै २०२६ पासून निपाणी तहसील कार्यालया समोर अनिश्चितकालीन उपोषण सत्याग्रह करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत तहसीलदार व आयुक्त व पोलिस प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, मागील अनेक दिवसांपासून विविध मागण्यांचे निवेदन संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. परंतु प्रत्यक्ष कार्यवाही झाली नाही. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत.त्यामुळे संस्थेने ता.१५ जुलै २०२६ पर्यंत मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्यास, ता.१५ जुलैपासून निपाणी तहसीलदार कार्यालयासमोर अनिश्चितकालीन उपोषण सत्याग्रह सुरू करण्याचा इशारा दिला आहे. यासाठी परवानगीचे पत्रही दिले आहे. प्रमुख ११ मागण्यांमध्ये निपाणीतील सर्व सरकारी कार्यालयात कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी व बे-जा नोंदणी सक्तीची करावी, निपाणी शहर गांजा मुक्त करावे, बेकायदेशीर दत्त, खुले, नाट्यगृहामुळे नागरिकांना होणारा त्रास थांबवून जबाबदारांवर कारवाई करावी, म.गांधी सरकारी रुग्णालयात तज्ञ डॉक्टर नेमून त्याला तालुका स्तरावर दर्जा द्यावा, शिंदे नगर, बालाजी नगर व हुडको कॉलनीच्या नागरी समस्या सोडवाव्यात,सारस्वतीतील पुरसभेची जमीन उद्यान व जिमसाठी राखीव ठेवावी, देवचंद कॉलेज रोड लगतच्या सर्वे नंबर १९० व १८१ मध्ये नागरिकांच्या सोयी सुविधा द्याव्यात, इतर प्रलंबित स्थानिक समस्या.या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, गृहमंत्री, डीजीपी कर्नाटक आदींना माहितीसाठी पाठविण्यात आली आहे.

निपाणीः सीपीआय तळवार यांना निवेदन देताना संघटनेचे सदस्य.

सदर निवेदनावर सचिन पोवार, ज्ञानेश्वर चव्हाण,अविनाश माने, संतोष मावरकर, विशाल कांबळे, योगेश कांबळे, युवराज शेटके, योगेश पोतदार, ए.आय.हलगले, मोहन पाटील,अशोक खांडेकर, संतोष कुर्ले,मोहम्मदशफी कुवठोडी आदींच्या सह्या आहेत.

कोगनोळी येथे रस्त्याची पाहणी करताना किरण राजपूत, ठेकेदार भंडारकर, पंकज पाटील व इतर मान्यवर.

कोगनोळी येथील काशीद गल्ली, बाजारपेठ रस्त्याला मंजुरी

कोगनोळी,ता.१६(प्रतिनिधी)-

येथील काशीद गल्ली व बाजारपेठ परिसरातील रस्त्याच्या कामास मंजुरी मिळाली असून कोगनोळी ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे यश आले आहे. मंत्री सतीश जारकीहोळी यांच्या निधीतून हा रस्ता साकारला जाणार असून लवकरच प्रत्यक्ष या कामाला प्रारंभ होणार आहे.

या रस्त्याच्या कामासाठी मंत्री सतीश जारकीहोळी, माजी मंत्री वीरकुमार पाटील, माजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. मंजूर कामाची पाहणी करण्यासाठी जारकीहोळी यांचे स्वीय सहाय्यक किरण राजपूत व ठेकेदार भंडारकर यांनी भेट दिली.याप्रसंगी बोलताना पंकज पाटील म्हणाले, पहिल्या टप्प्यात काशीद गल्ली व बाजारपेठ परिसरातील रस्त्याचे काम करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात राबळ गल्ली व साळी-कोष्टी गल्ली येथील रस्त्याची कामे हाती घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. रस्त्याच्या मंजुरीमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.यावेळी माजी ग्रामपंचायत अध्यक्ष ज्ञानेश्वर डांगरे, माजी ग्रामपंचायत सदस्य दिलीप पाटील, दादासो माणगावे, जहांगीर कमते, रोहित माणकापूरे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुलांच्या दर्जेदार शिक्षणासाठी शिक्षकांनी जबाबदारीने काम करावे

मंत्री हसन मुश्रीफ; पिंपळगाव खुर्दमध्ये नवागतांचा प्रवेशोत्सव उत्साहात

कागल,ता.१६(प्रतिनिधी)

राजर्षी छ.शाहू महाराजांच्या काळात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत होते. अलीकडच्या काळात 'शिक्षणाचा हक्क' कायदा निर्माण झाला आहे. त्यामुळे शिक्षण हा विद्यार्थ्यांचा हक्क बनलेला आहे. आपल्या प्रांगणामध्ये येणाऱ्या मुलांचे शिक्षण चांगले व दर्जेदार झाले पाहिजे याचा ध्यास घ्या. आई-वडिलांना आपल्या मुलांचे शिक्षण चांगले होत आहे, याची खात्री झाली पाहिजे. हे काम शिक्षकांनी जबाबदारीने करावे, असे आवाहन मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

पिंपळगाव खुर्द (ता.कागल)येथे मंत्री हसन मुश्रीफ यांनी शाळेची घंटा वाजवली. 'केंद्रशाळा विद्यामंदिर पिंपळगाव खुर्द' येथे हालगी, ढोल, लेझीम-कैताळाच्या निनादात नवागतांचा प्रवेशोत्सव साजरा झाला. श्री.मुश्रीफ यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांची सायकल ढकलत त्याला वाजत- गाजत शाळेत आणले. चिमुकल्यांच्या उत्साहाला आनंदाचे उधाण आले होते.यावेळी ते बोलत होते.

पिंपळगाव खुर्द (ता.कागल) येथे नव्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या दिवसाची शाळेची घंटा वाजवताना मंत्री हसन मुश्रीफ सोबत इतर मान्यवर.

मंत्री श्री.मुश्रीफ पुढे म्हणाले, सरकारी शाळा सर्वसामान्य जनतेच्या हक्काच्या शाळा आहेत. सरकारी शाळांना ज्ञानदानाची अखंड परंपरा आहे. प्राथमिक शिक्षणामध्ये पटसंख्या कमी होऊ लागली आहे. त्याचे खरे कारण आहे की, पालकांना आपली मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये जावीत व इंग्रजी फडफड बोलता आले पाहिजे, असे वाटू लागले आहे. त्याला आय.टी., कॉम्प्युटर, इंजिनिअरिंग, एमपीएससी व यूपीएससीमध्ये आपली मुले यशस्वी झाली पाहिजेत, यासाठी आत्ता पालक कितीही पैसे मोजायला तयार आहेत.श्री. मुश्रीफ शाळेच्या प्रवेशद्वारावजव पोहोचताच ढोल, हलगी, कैताळांचा निनाद सुरू झाला. मिरवणूक शाळेच्या इमारतीकडे जात असताना त्यांचे लक्ष सायकल चालवत आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांकडे गेले. त्यांनी स्वतः पुढे होत त्या दिव्यांग विद्यार्थ्यांची सायकल ढकलत नेली. त्यांच्या या कृतीला ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

सरकारी प्राथमिक शाळामधील पटसंख्या गळती थांबवायची असेल तर मी शिक्षकांना विनंती करेन की, इंग्रजी, शास्त्र आणि गणित हे विषय चांगले करून घ्यावे लागतील. सेमी इंग्रजी सुरू करावे लागेल. या राज्याचा शिक्षण मंत्री म्हणून काम करीत असताना मी भरपूर प्रयत्न केले आहेत. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षक विभागाचे मी मनःपूर्वक कौतुक आणि अभिनंदन करेन. गेल्या दोन वर्षापासून पटसंख्या गळतीचे प्रमाण कमी झाले आहे. पालक आपल्या मुलांचा प्रवेश गावातीलच प्राथमिक शाळेमध्ये घ्यायला लागले आहेत.

यावेळी कागल तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन अशोकराव नवाळे, कागल तालुका खरेदी विक्री संघाचे व्हा.चेअरमन महेश चौगुले, गटशिक्षणाधिकारी सौ. सारिका कासोटे, सरपंच सौ.शितल नवाळे, आसिफ शेख, अशोक वठारे, भिकाजी आकुर्डे, जी.डी.कांबळे,मुख्याध्यापिका सौ. सुनीता चव्हाण, संदीप भुरले, संदीप माने, मनीषा सूर्यवंशी,करसिद्ध भानुसे यांच्यासह इतर मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

❋ खरेदी विक्री ❋

रो बंगलो– १ बीएचके व २ बीएचके विकणे आहे. तारदाळ रोड, आझादनगर, बिलाल मस्जीदसमोर, इचलकरंजी. फोन– ९३२५३०५९२

विकणे आहे. सर्व सोयीनियुक्त ३ बीएचके रो हाऊस विकणे. सनसिटी यद्वार फाटा. फोन– ९८२२८६०२३४, ७८४१८८०००९

रोज कपडे वाळत घालण्याचे हॅंगिंग स्टॅन्ड, डासांची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी, राहूल एंटरप्राईजेस. ७५०७७१६६६४, ७७५८९३४१६५

३ मजली इमारत ६ – १ बीएचके फ्लॅटसहीत सर्व सोयीनियुक्त विकणे आहे. संपर्क– ९४२०९६४७९९

विकणे आहे. कुरूंदवाड–शिरढोण रोडटच ११ किंवा २२ गुंठे जमीन विकणे आहे. संपर्क– ९८२२२३२६०५

६५० स्क्वे. फूट ते २००० स्क्वे. फूट रिकामा प्लॉट विकणे आहे. खोतवाडी, संगमनगर, जे.के. नगर, तारदाळ. संपर्क–७२१९३४७६८९

जागा विकणे आहे. ४४९७६ स्क्वे. फूट औद्योगिक झोन, ३० फूटी रस्ता. संपर्क–९८२२३४७६८९

जुने व नवीन पॉवरलूम देवू व घेवू तसेच फवारा कांप्रिमशिन डक्टींग घेवू व देवू. संपर्क–८३१७२९१००८

शिरदवाड पेट्रोल पंपच्या मागे ३४.२५ बाय ४० (चौरस फूट९३७०) चा बिगरशेती (उत्तरेस ३० फूट रस्ता असलेला) टीपी मंजूर लेआऊट मधील प्लॉट नं.१३ विकणे आहे. संपर्क– ९४२३९८४६१३

सावली हॉसिंग सोसायटी, शहापूर येथे अंदाजे प्रत्येकी ५०० स्क्वे. फूटाचे आरसीसी ३ ब्लॉक एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहे. संपर्क– ९८९०२०६८६७

कबनूर येथे दिड गुंठा जागेमध्ये (५८ बाय २६) १६ मागाचे रिकामे आरसीसी शेड चालू स्थितीतील १२ मागासह विकणे आहे. (१ बीएचके रहाणेच्या सुविधेसह) मो. ८७८८०३३७९२

जैन फार्म हाऊस, कॉंडोझ येथे दर्जेदार व योग्य दरात नारळ विक्रीस उपलब्ध आहे. मो. ९४२४४९६२६०.

रामलिंग रोड, कुंथुगिरी कमान शेजारी, प्राईम लोकेशन, रोडटच पाणी व लाईट सर्व सोईनीयुक्त ५ गुंठे प्लॉट विकणे आहे. मो. ८६००५८७३९४.

१५०० स्क्वे.फूट कबनूर गावठाण मधील दगड, विट बांधकाम पत्राचे साधे घर अर्जंट विकणे आहे. मो. ८३२९२५९३९७.

टाटा ४०७ पिकअप २०१६ मॉडेल टेम्पो विकणे आहे. पेपर क्लीअर. मो. ९५५२८७८२५५.

सुंदर बागेजवळ मध्यवर्ती ठिकाण पीएनजी ज्वेलर्स जवळच १२०० ते १५०० स्क्वे. फूटाचे प्लॉट शोरूमसाठी भाडयाने देणे/विकणे. संपर्क–९८६०५८९९४, ८४५४४००००७

❋ विवाह विषयक ❋

वर पाहिजे– सुंदर गरीब वधु वय ३१ शिक्षण १२ वी मुलगी घुमती खानावळ चालवते. प्रति महा २००००/– मुलीचे लग्न झालेले नाही तरीही घटस्फोटीत, विधूर चालेल. जात, शिक्षणाची अट नाही. त्वरीत विवाह करणे आहे. संपर्क– ७२१९३१९५४३

❋ बोअर विषयक ❋

श्री सिध्देश्वर बोअरवेल आमचेकडे ४।।'' व ६।।'' बोअरवेल योग्य दरात मारुन मिळेल. सांगली नाका, इचलकरंजी. मो. ८५५४९८४५६३, ७७७५९३७५७२.

❋ नोकरी विषयक ❋

पाहिजेत यद्वार येथील नामांकित कंपनीसाठी Quality Inspector (ITI/DME/BE,**अनुभव १–२ वर्षे**) **तसेच** CNC/VMC/HMC & Siliding Head **मशिनसाठी अनुभवी** Operator **व** Supervisor **पाहिजेत. संपर्क– ९७६४७०१०१**

Uegently Required in Compressor Sale with experience of 2-3 years. Eligibility- Dipolma holder in Mechanical/Electrical. Fresher can also apply. At GMT ENTERPRISES, Yadrav, Ichalkaranji. Contact- 9922939136

श्री. जिनेंद्र ज्वेलर्स– भरती/ सुवर्णसंधी. सेल्स पर्सन– ५ जागा, महिला/पुरूष कॉम्प्युटर ऑपरेटर– २ जागा, पात्रता–१२ वी पास किंवा बी.कॉम कामप्युटरचे बेसिक ज्ञान आणि संवाद कौशल्य समक्ष भेटा. श्री. जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवाल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१, ९३२२९११५४६

MBA and BBA Students- 3 Months Paid Internship Opportunity for BBA/MBA Students (All Departments) Apply- Yashraj Deshmukha. 9518782037

सांगली जिल्ह्यात हावेस्टा फूड प्रॉडक्ट दुचाकीवरून फिरून विक्री करण्यासाठी त्वरीत महिला पाहिजेत. संपर्क–७६६६८१४१४८, ९९७५३९१७३९

लेडीज कलेक्शन– कापड दुकानात कामगार पाहिजे. शिकावू/गरजू मुली/लेडीज. संपर्क– जनता चौक, इचलकरंजी. ७७७३९९७६३४, ९८६०८०७३८६

इचलकरंजीतील नामांकित कपडयाच्या शोरूम व गारमेंटसाठी महिला–पुरूष पाहिजे. शोरूम सेल्स–२ जागा. (महिला/पुरूष) सकाळी–१० ते ८/१२ ते ९.३०. गारमेंटसाठी–डाटा एंट्री–१ जागा, अकाऊंटसाठी–१ जागा. अनुभवी/ फ्रेशर चालतील. आकर्षक पगार. संपर्क–९९२१३८९५६७/ ९०९०३८९६९६

नर्सिंग स्टाफ/कंपोंडर पाहिजेत. भेटा– मानस क्लिनिक ॲन्ड नर्सिंग होम, कागवाडे मळा, अग्रसेन भवन रोड, इचलकरंजी. फोन–०२३०– २४३००१५

ड्रायव्हींग कामासाठी सुशिक्षित व्यक्ती पाहिजे. ७०६६८५७३४०

ऑफिस कामासाठी दिवाणजी पाहिजे. ७०६६८५७३४०

घरी बसून ऑनलाईन कामाची सुवर्णसंधी. नोकरदार, गृहीणी, विद्यार्थी व इतर सर्वांसाठी मोबाईलवरून, ऑफिसमधून काम करा. संपर्क–७०२०५३७७०७

सापफसाई कामासाठी लॉजिंगमध्ये पार्टटाईम/फूल टाईम लेडीज/जेंटस कामगार पाहिजे. ओम एक्झीक्युटिव्ह. संपर्क– राधाकृष्ण चौक, एचडीएफसी बॅंकेसमोर, इचलकरंजी. ७६६६२९१२१८

जांभळी येथील मोटके डेअरी फार्म या नामांकित कंपनीसाठी दूध व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी सेल्समन नेमणे आहे. संपर्क– ९८२२२९९९४८

मेडिकलसाठी फार्मासिस्ट/नॉन फार्मासिस्ट पाहिजे. स्पंदन मेडिकल, वखार भाग, इचलकरंजी. ८४२९४२६६८५

कपड्याच्या दुकानात अनुभवी जेंटस कामगार पाहिजेत. आकर्षक पगार+कमिशन रोड. संपर्क– ८३९०५३४१४३

वाईन शॉपसाठी कामगार पाहिजेत. कामाची वेळ–१५.३० ते ९.३०. संपर्क–सहारा वाईन शॉप, जयसिंगपूर. फोन–८८८८७२८८३३, ९४२२०४९२३६

पॅकिंगसाठी लेडीज पाहिजे. कामासाठी मुलगा पाहिजे गारमेंटचे शिलाईचे काम घरी देवू. संपर्क– ८२०८०७७९३४, ९४०४२६८२५४

दूध व दुग्धजन्य पदार्थ डिलेव्हरीसाठी कोरोची व जवळील मुले पाहिजेत. संपर्क– ८४३२९९१७१९, ७८४१०८६२८९

वॉचमन पाहिजे. फक्त दिवसपाळीसाठी बांधकामावर पाणी मारण्यासाठी वॉचमन पाहिजे. पत्ता– लिंबू चौक. मो. ९०४९२९०७८६

विवाह संस्थेच्या ऑफिस कामासाठी पदवीधर लेडीज पाहिजे. संपर्क–९८२३४२५४०४, शहापूर.

अर्जंट सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. ८ तास ड्युटी. सर्व सुविधा उपलब्ध. खोतवाडी, यद्वार करीता. संपर्क–९६०४६३९१०३

मेकॅनिक पाहिजेत. टू व्हीलर गाडयांच्या शोरूमकरीता मेकॅनिक पाहिजेत. अनुभवी किंवा शिकाऊ चालेल व वॉशिंगकरीता कामगार पाहिजेत. संपर्क–बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

इलेक्ट्रॉनिक दुकानात कामाकरिता सेल्समन/कामगार पाहिजेत. शिकाऊ किंवा अनुभवी मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स आवळे मैदानजवळ, इचलकरंजी. ९८९०५४७७०८

बेकरी शॉपीमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क – बालाजी बेकरी, एएससी कॉलेज जवळ. मो. ९९६००२८२८९, ७२७६१२७११११.

नामांकित कपंनीसाठी हेल्पर व वेल्डर पाहिजेत. आकर्षक पगार पीएफ+ईएसआयसी सुविधा. संपर्क–८८५५९०४५५५, ७०८३८२६६२६, शहापूर.

कामासाठी मुले पाहिजे आहेत. वय–५ ते २७ उंचावरची मिनी नको. कामाची वेळ– दु. ३.३० ते ७. ८००० हजार पगार. भेटण्याची वेळ सायं. ६ ते ८. संपर्क– ९१५६४९१२८१

स्ट्रिट लाईट रिपेअरीसाठी अनुभवी व शिकाऊ वायरमन व हेल्पर पाहिजे. काम सकाळी ९ ते सायं. ६. पगार– ९००० ते २०००० अनुभवानुसार ईएसआयसी+पीएफ लागू. संपर्क–९८५०८१६६९८

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. आकर्षक पगार, फिक्स दिवसपाळी, रात्रीपाळी माणगाव, तारदाळ, इचलकरंजी. परिसर. संपर्क–९३२६६३३४४५, ९६८९५६४००४

कामगार पाहिजेत साडी दुकानामध्ये काम करणेसाठी अनुभवी जेन्टस् व लेडीज कामगार पाहिजेत. चौकशी–वैशाली कापड केंद्र, मेन रोड, हॉटेल कुबेर शेजारी, इचलकरंजी. मो. ९८२२२५६६६६

माने फॉंड्री इचलकरंजीसाठी असिस्टंट अकाऊंटंट पाहिजे. जागा–१, जीएसटी+इन्कम टॅक्स+टॅलीचा अनुभवी. ५ ते ६ वर्षे. मो. ७२१९२८६२८४

Senior Accountant- Experience Minimum-5 year. Proficiency in Tally and Ms. Excel & Required. Miracle Industries. Contact- 9175492404

मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण योजने अंतर्गत ५० बेंचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख कोर्सेस Graphic Design, Tally with GST, Advance Excel, Ms-Office, कोर्सेसना दर्जेदार व सखोल प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर– पत्ता– इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बॅंक ऑफ महाराष्ट्रसमोर. – संपर्क– ९२८४२६४९८०

पॉकिंग कामासाठी कर्मचारी हवे आहेत. पार्टटाईम जॉबची संधी. संपर्क–मिरकॅल इंडस्ट्रिज. फोन– ९१७५४९२४०४

पाहिजेत. हाऊस किपींगसाठी महिला व वॉशरूम/बाथरूम ॲसिड वॉशसाठी जेंटस पाहिजे. संपर्क– ८२२८२५७७९०

पाहिजेत. डिलेव्हरी कंपनीमध्ये डिलेव्हरी बॉय पाहिजेत. आकर्षक पगार– २५००० ते ३००००. संपर्क–८७८८३५१६९१, ९०९६१०४४४२

सीएनसी एसपीएम बनविण्यासाठी फिटर, टर्नर, ड्रिलर, हेल्पर पाहिजेत. भेटा– अनिकेत मेकॅट्रॉनिक्स. ९९२३०२९०९०, ९४२३०२९०९०

पाहिजे. शेतीकामातील अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. बी.एस.सी., ॲग्री किंवा डिप्लोमा यांना प्राधान्य. संपर्क– ९८८१४९१५८२

नामांकित पिझ्झा आऊटलेटमध्ये कामासाठी फक्त मुले पाहिजेत. शिफ्ट–फुलटाईम. पत्ता– सुंदर बागेजवळ व सांगली रोड, इचलकरंजी. संपर्क– ८५३०३९५९६०, ९८२२५८०५६६

ड्रायव्हर पाहिजे. बोलेरो पिंक टेम्पो आणि दोस्त टेम्पोसाठी (TR) लायसन्स असलेले प्रामाणिक ड्रायव्हर पाहिजेत. संपर्क– ९५११२७९९४१

Co_2 वेल्डर, शिटमेटल, हेल्पर कामगार पाहिजेत. शिकाऊ/ अनुभवी. संपर्क–८६०५६८१५६३, ८००७५९५०९९

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी वेल्डर पाहिजे. संपर्क– पडियार वेल्डींग वर्कशॉप, इचलकरंजी. ९९२१०३६३७९

Required- Backend Developer in Node Is and Telecalling Executive for Software Company. Office- Jawahar Nagar, Near National High School, Ichalkaranji.Contact- 9067505705.

कामगार पाहिजे. बांधकाम साईटवरील वरकाम/ इतर कामासाठी कामगार/शिकाऊ गवंडी/शिकाऊ पेंटर पाहिजे. संपर्क–८९८००४६०६० मेसेज करावा.

सेल्समन पाहिजे. मार्केटिंगसाठी इचलकरंजी येथे हुशार व अनुभवी टू व्हीलर आवश्यक. पगार– १६०००/– संपर्क–९७९२७२७१७१

सुवर्णसंधी–कॅफे ब्रिओ करीता पूर्ववेळ हेल्पर (मदतनीस) (१८+ ते ३०) हवे आहेत. संपर्क– ९५०३८७०४७९

CA ऑफिसमध्ये जेंटस असिस्टंट पाहिजेत. संपर्क–व्हॉटसॲप. ९४२०७७६२७३. इचलकरंजी. (कॉलेज स्टूडंट चालतील)

ऑफिस कामासाठी अनुभवी कामगार पाहिजे. पत्ता– विक्रमनगर, इचलकरंजी. फोन– ८०१०९४८८४४

ऑफिस साफसफाई जेंटस/ लेडीज पाहिजे. पूर्णवेळ. संपर्क– महालक्ष्मी ट्रेडर्स, कागवाडे मळा, इचलकरंजी. फोन– ९२७१९३१९४४, ९७६५४३६१३५

मिलींग मशिन ऑपरेटर व आयटीआय किंवा डिप्लोमा झालेली गरजू मुले पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्क– ९९२२४०४७९५

पाहिजेत. पार्वती इंडस्ट्रीमधील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी ऑफिसबॉय पाहिजे व लेडीज/ जेंटस कामगार पाहिजेत. संपर्क– ७७२००१८४०६

नव्याने सुरू झालेल्या गायत्री लॉज येथे साफसफाईसाठी कामगार पाहिजे. पत्ता– शाहू कॉर्नर ते साखरपे हॉस्पिटल रोड, इचलकरंजी. मो. ९८५०५५५९८०

लेडीज कामगार पाहिजे. संपर्क– ९९२२१९९४०९, इचलकरंजी.

ड्रायव्हर पाहिजे. छोटा हत्ती मालवाहतुक गाडीवर लायसनधारक (LMV-TR) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ९८९०२२०९४३, ७४१७४५०६६८२

प्लेटरमॅन आणि कांजीवाला त्वरीत पाहिजे. सावंत प्रोसेसर्स. मो. ९६५७२८८९२३, ८९२८७११९१९

कापड पेढीवर कामगार पाहिजे. ईएसआयसी/पीएफ मिळेल. गरूधर टेक्स्टाईल योगभ्रमाद्या मागे, बालाजी कार्यालयासमोर, शहापूर, इचलकरंजी. मो. ६३६६५६२३१३

पाहिजे. ड्रायव्हर+हेल्पर, टीआर लायसन आवश्यक. संपर्क–वेद एजन्सीज. ७०२०१७८७५६

बजाज फायनान्स नामांकित कंपनीत भरती सुरू. लोकेशन– इचलकरंजी, हातकणंगले. शैक्षणिक पात्रता–ग्रॅज्युएशन. संपर्क– ९२७२५७४९३२, ९०४९६४७५७०

सेवासदन निरामय हॉस्पिटल, इचलकरंजी. येथे खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. १) Optometrist / ऑप्टोमेट्रिस्ट– १ जागा. जबाबदाऱ्या १) डोळ्याची तपासणी व व्हीजन टेस्ट करणे. २) चष्माचे प्रिस्क्रिप्शन देणे. पात्रता– ऑप्ट्रोमेट्रिक मध्ये डिप्लोमा/पदवी. २) मार्केटिंग ऑफिसर– २ जागा. जबाबदाऱ्या– १) हॉस्पीटलच्या सेवांचे प्रमोशन करणे. २) डॉक्टर, ग्राहकांशी संबंध निर्माण करणे. पात्रता– कोणत्याही शाखेतील पदवी. संपर्क–८२७४९६६०५५

झेरॉक्स सेंटरमध्ये लेडिज पाहिजेत. मो. ७७९६०२९०९०.

कॉम्प्युटर सेल्स सर्व्हिस ऑफिसमध्ये सेल्ससाठी मुली पाहिजेत. कोणताही पदवीधर चालेल. प्रमोद इन्फोटेक, मेन रोड, इचलकरंजी. मो. ९७६७४९६९२२.

अर्जंट पाहिजेत फॉर्च्युन प्लाझा (मॉल) येथे हाऊस किपींगसाठी २ मुले, अनुभवी ड्रायव्हर–२ (जयसिंगपूर प्राधान्य), मेंटेनन्स असिस्टंट–१ (आयटीआय इलेक्ट्रीकल), ऑफीस बॉय–१ आकर्षक पगार. पीएफ+ईएसआयसी सुविधा. संपर्क– ८४८३८८७४२९.

जेन्टस् कामगार पाहिजेत. टु व्हिलर आवश्यक. १२००० पगार. संपर्क– ९१६८८७७८५५.

पेपर कारखान्यात लेडीज कामगार पाहिजेत. संपर्क – ८०८७३६७४१८, देवम पेपर, जुना एसटी स्टँड समोर, इचलकरंजी.

लेडीज टेलीफोन ऑपरेटर पाहिजे. मो. ९१६८८७७८५५.

नामवंत कंपनीमध्ये सेल्ससाठी महिला व हेल्पर पाहिजेत. स्टेशन रोड, इचलकरंजी. ९७७१७३७९५५.

गारमेंटसाठी शर्ट ऑपरेटर अनुभवी महिला पाहिजेत. संपर्क– नवीन महानगरपालिकेजवळ, जनता बॅंकेच्या मागे, इचलकरंजी. फोन– ८००७०२८१५०, ९०२९९४८६४१

टर्नर वेल्डर पाहिजेत. मानाचा रिपेअरी कामाचा अनुभव असणारा कुबेर वेल्डींग वर्क्स, गणेशनगर गल्ली नं.८, इचलकरंजी. फोन– ८४८५८१५४२४

चेकर पाहिजे प्रोसेसमध्ये धोती चेकींगसाठी चेकर पाहिजे. मो. ९४२२०९४७८८.

सिक्युरिटी गार्ड ८ तास ड्युटी, पगार १५०००/– पीएफ/ ईएसआयसी सोय, शिरोली, कागल एमआयडीसी व अंबपसाठी. मो. ७४४७४०५८७०, ७४४७४०५८६२.

तारदाळ व यद्रावमधील नामवंत कंपनीसाठी कामगार भरती चालू आहे. आयटीआय डिप्लोमा किंवा १० वी, १२ वी अनुभवी. सीएनसी, व्हीएमसी ऑपरेटर– ३५ जागा, हेल्पर– २० जागा, जॉब इन्स्पेक्टर– ६ जागा, हाऊसकिंपिंग (लेडीज)– ६ जागा. वरील सर्व जागा त्वरीत भरणे आहेत. पीएफ/ ईएसआयसी, कॅन्टीन व बोनस फॅसिलीटीजसह आकर्षक पगार मिळेल. मो. ९१३०३९१९०७, ८७८८३२८२२८.

२४ तास मेडिकलमध्ये शिकाऊ/ अनुभवी जेन्टस्/लेडीज फार्मासिस्ट पाहिजे. मो. ८२७५५६००११.

कोरोची इचलकरंजी येथे हॉटेल कामासाठी किचन हेल्पर व वेटर पाहिजे .मो. ९७३०५९७३१०, ७०२६८८२३३३.

लक्ष्मी ऑटोगिअर वसाहत हातकणंगले १) ॲल्युमिनियम फॉंड्रीमध्ये. अनुभवी/शिकाऊ कामगार पाहिजे ४. २)ड्रिलिंग/ टॅपिंगसाठी लेडीज पाहिजे १. उदय इंडस्ट्रीज.९८२३८१२००९, ८६२२०१८५८८.

❋ आरोग्य विषयक ❋

मानसिक आजार– व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राचळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, माव, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क– ८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

❋ कर्ज विषयक ❋

असेसमेंट उतारा व घरफाळा पावतीवर होमलोन किंवा तारण कर्ज मिळेल. पत्ता– रजिस्टर ऑफिससमोर, गाळा नं.८, इचल. मो. ९१४५७५३८१०

विनातारण पर्सनल लोन व बिझनेस लोन करून मिळेल. मो. ९७६५३८०८७६.

❋ व्यवसाय विषयक ❋

चव अशी की नवीन व्यवसायाला मिळेल. नवनवे संधी आमच्याकडे चिवन ६५ चे वेगवेगळ्या प्रकारचे प्रिमिक्स मिळतील. हॉटेलसाठी कांदा भजी, बटाटा भजी, मिरची भजी, बटाटा वडा प्रिमिक्स होलसेल रेटमध्ये मिळतील. ८१४९८०८०००, ९९२२१९११७२७

❋ भाड्याने देणे/घेणे ❋

श्री स्वामी समर्थ निवास– २ बीएचके फ्लॉट भाडयाने किंवा महाणवट देणे आहे. २४ तास बोअर व नदीचे पाणी सोय. शिवाजी चौक, विठ्ठलमंदिर, तारदाळ. ९६३७००८७३१५, ९९२२१५८६३२८

१ बीएचके सर्वसोयीनियुक्त शाकाहारीसाठी भाडयाने देणे आहे. महेंद्र ज्वेलर्सजवळ, इचलकरंजी. संपर्क–९८६०८०८२११

फ्लॅट भाडयाने देणे. इचलकरंजी सुरज गॅस ऑफिसशेजारी २ बीएचके व ३ बीएचके स्वतंत्र गेट, फर्निचरसह भाडयाने देणे. (फक्त शाकाहारीसाठी) संपर्क–राजेश झंवर. ९८२३६२३६८७

विद्यार्थी/विद्यार्थीनीसाठी कॉट बेसिसवर रूम भाडयाने देणे. फॉर्च्युन प्लाझासमोर, बालाजी कॉलनी, गल्ली नं.२, इचलकरंजी. ९६०४४७३६२३

कॉट बेसिसवर विद्यार्थीनींसाठी रूम भाडयाने मिळतील. संपर्क– ९६०४००२६८५

रम्य ठिकाणी २ बीएचके बंगला वर्धमान सोसायटीमध्ये शाकाहारींसाठी भाडयाने देणे. भेटा–९९२३०२९०९०, ९४२३०२९०९०

१ बीएचके, २ बीएचके ग्राऊंड फ्लोअर सर्वसोयीनियुक्त बोअरसह भाडयाने देणे. गुरू कन्नरनगर, लिंबू चौकजवळ, इचलकरंजी. फोन– ९४२०७७६२६८

आरसीसी शेड भाडयाने देणे. २०००+२००० स्क्वे. फूट २ बीएचके सर्व सोयीनियुक्त. जुना बस स्टँड चौक, इचलकरंजी. संपर्क– ९६६५०३८६७७

भाडयाने/विकत देणे. शोरूमकरिता १००० चौ. फूट गाळा भाडयाने/विकत देणे आहे. पत्ता– जमदाडे हाईटस, फुले पुतळ्याजवळ, नारायण पेठ, इचलकरंजी. संपर्क– ८८०५२३३२१४

जनता बॅंकेपासून जवळच नारायण पेठमध्ये सर्वसोयीनियुक्त आरसीसी गाळे भाडयाने देणे. संपर्क– ९३७२०६६८८३, ९७६४७११३५०

सर्व सोयीनियुक्त २ बीएचके १ ला मजला भाडयाने देणे. शाकाहारींसाठी यशोलक्ष्मी मंगल कार्यालयाजवळ, इचलकरंजी. फोन–९८२२८६०२३४, ७८४१८८०००९

घर भाडयाने देणे. २ बीएचके सर्वसोयीनियुक्त एसआयटी कॉलेजजवळ, सांगली रोड, इचलकरंजी. फोन–८६६९०९१४८२

१ बीएचके भाडयाने देणे आहे. सांगली नाका, टिव्हीएस शोरूममागे, इचलकरंजी. फोन– ७४४७६५७६७६, ९६०४६१७७८४

शेड भाडयाने देणे आहे. ४५ बाय ५० १० एचपी थ्री फेज लाईट, उपवन हॉटेलजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. मो. ९४२३५९५९०३

व्हेज–नॉनव्हेज हॉटेलसाठी गाळा/शेड अथवा हॉटेल पूर्ण तयार सेटअप भाडयाने पाहिजे रोडटच. संपर्क– ७६२०१६२८६२, ८६२४०३९५३९

फ्लॅट भाडयाने देणे. १ बीएचके सर्व सोयीनियुक्त स्टार नगर मराठी शाळेजवळ, यद्रावं फाट्याजवळ, इचलकरंजी. फोन–८६६९११२४७३

नरेंद्र सोसायटी, तांबे माळ, इचलकरंजी. सर्व सोईनीयुक्त दोन खोल्या भाडयाने देणे आहेत. संपर्क–९४२२५११५६२, ९४२३०४०२४७

२ बीएचके सर्व सोयीनियुक्त फ्लॅट भाडयाने देणे आहे. नारायण मळा, वठारे इलाईट, सांगली रोड, इचलकरंजी. फोन–९०११३७४७७२

भाडयाने देणे. ३ बीएचके प्रायव्हेट बंगलो सर्व सोयीनियुक्त हाय–फाय आणि १ बीएचके फ्लॅट सर्व सोयीनियुक्त, कोरोची. संपर्क– ७०३८९८४९८७, ८४८३८१४९८३

आरसीसी शेड १२०० स्क्वे. फूट भाडयाने देणे. गारमेंट किंवा इतर उद्योगासाठी सर्व सोयीनियुक्त यद्राव फाटा. ७७४५०५१२००

भाडयाने देणे– १ आरके सर्व सोयीनियुक्त गरम व गार पाण्याची सोय, चिंतामणी कॉलनी, गल्ली नं. ८, कोरोची. संपर्क– ८८५६०५४००५, ९०४०७१९६१६.

सर्व सोयीनियुक्त २ बीएचके दुसरा मजला भाडयाने देणे. मथुरानगर, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९०९६०४११४१.

दुकानगाळा ३९० स्क्वे.फूट व गोडावून ६५० स्क्वे.फूट भाडयाने देणे आहे. जवाहर नगर, इचलकरंजी. मो. ८७९३८७८७९७,९९२२४९९३११.

दुकानगाळे भाडयाने देणे ४०० स्क्वेअर फुटाचे दोन दुकानगाळे. चंद्रेश्वरी प्लॅनेट, साखरपे दवाखान्याजवळ, इचलकरंजी. मो. ९४२११००८१४.

शाहू कॉर्नर मुसळे बिल्डींगमधील दुकान गाळे, पतसंस्था, ऑफीस, दुकानाकरीता भाडयाने देणे. ९४२२०४४९१४, ९१७४८३३९३९.

चारचाकीच्या धडकेत मुलाचा मृत्यु

हेबेवाडी,ता.१६(प्रतिनिधी)

हेबेवाडी कडून सळव्याकडे जात असणारी दूचाकी व समोरुन हेबेवाडी कडे येणारे चार चाकी यांची बनपुरी नजीक समोरासमोर धडक झाली .या धडकेत दुचाकीस्वार सोळा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला.ही घटना मंगळवारी सायंकाळी ४ च्या दरम्यान घडली

या घटनेची माहीती कळताच हेबेवाडी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण दाईंगडे यानी घटनास्थळी जाऊन अपघाताची माहिती घेतली.

पालक शिक्षक संघातर्फे इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन

इचलकरंजी,ता.१६

एमएचटी –सीईटी च्या निकालानंतर इंजिनिअरिंगची प्रवेश प्रक्रिया सुरू होते. या प्रवेश प्रक्रियेची विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना सखोल माहिती व्हावी याकरिता पालक शिक्षक संघ, इचलकरंजी ''मिशन इ ऍडमिशन'' या उपक्रमाचे बुधवार दि. १७ जून रोजी दु. २:०० वा. मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, इचलकरंजी येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमा वेळी प्रवेश प्रक्रियाबाबत प्रा. डॉ. अनिलकुमार गुप्ता प्रा. डॉ. अजित पाटील हे माहिती देतील.या उपक्रमाचा फायदा इंजिनियरिंग प्रवेश इच्छुक सर्व विद्यार्थी व त्यांच्या सुज्ञ पालकांनी घ्यावा असे आवाहन संयोजक प्रा. एच.ए. पाटील व राजेंद्र निंबाळकर यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

अधिकमासात श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरास ९ कोटी ४६ लाखांचे उत्पन्न

पंढरपूर,ता.१६(प्रतिनिधी)

तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या पांडुरंगाची माहिती आता साता समुद्र पार गेली असून गरीबाचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पांडुरंगाच्या श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिराला एकाच महिन्यात वारकरी भाविकांनी सुमारे साडेनऊ कोटीचे दान दिले आहे.

पुरुषोत्तम अधिकमास कालावधीत राज्यासह परराज्यातून लाखो भाविकांनी श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात हजेरी लावत मोठ्या श्रद्धेने रोख देणगी तसेच सोने–चांदीचे दागिने अर्पण केले. विविध माध्यमांतून श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समितीस एकूण रु. ९ कोटी ४६ लाख २८ हजार २३३ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या उत्पन्नातून श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांना अधिक चांगल्या आणि पुरेशा सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर समिती सातत्याने प्रयत्नशील राहील असे मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले आहे.

भरधाव टेम्पोच्या धडकेत मोटारसायकलस्वार जागीच ठार

हेरले,ता.१६(प्रतिनिधी)

शिये फाटा येथे पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर भरधाव टेम्पो च्या धडकेत मोटारसायकलस्वार जागीच ठार झाला.

रूद्रगौडा चनाप्पागौडा होसमनी रा.कनेनायक्कणकोप्पा, ता.कलघटगी,जि. धारवाड हा माल वाहतूक टेम्पो धारवाड वरून पुणे येथे जात होता. मंगळवारी सकाळी ८ वाजता शिये फाटा येथे टेम्पो आला असता मोटारसायकल ला टेम्पो ने मागून जोराची धडक दिली. या धडकेत सौरभ सुरेंद्र फडतरे, वय– २८ मूळ रा.हरळी,ता.गडहिंग्लज, सद्या रा.गजानन महाराज नगर,संभाजीनगर,कोल्हापूर हा युवक जागीच ठार झाला. अपघातानंतर पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले व पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सीपीआर येथे पाठविला.या घटनेची नोंद शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली आहे.

आमदार सत्यजित देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे उपसा बंदी शिथिल

शिराळा,ता.१६(प्रतिनिधी)

पाटबंधारे मंडळाने उपसा बंदी शिथिल करण्याचा आदेश जारी केला असून, आमदार सत्यजित देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शिराळा तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

इरिगेशन फेडरेशन व लाभार्थी शेतकऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांनी सिंचनासाठी एक आवर्तन देण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत पाटबंधारे विभागाने हा निर्णय घेतला आहे.चांदोली धरण वगळता मोरणा धरण,वाकूर्डे योजना इतर धरणांमध्ये उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन नदीवरील सर्व उपसा बंदी दि. १७ जून २०२६ ते १९ जून २०२६ अखेर या तीन दिवसांसाठी शिथिल करण्यात आली आहे. त्यानंतर दि. २० जून २०२६ रोजी धरणांतील उपलब्ध पाणीसाठ्याचा पुन्हा आढावा घेऊन पुढील आदेश निर्गमित करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.या निर्णयामुळे खरीप ह

यमगर्णी: ग्रामविकास अधिकाऱ्यांना निवेदन देताना यमगर्णी ग्रामस्थ.

यमगर्णीत त्या राखीव जागेवर निपाणी पालिकेच्या फिल्टर बांधकामास विरोध

यमगर्णी ग्रामस्थांचे ग्रामपंचायत प्रशासनास निवेदन

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

यमगर्णी येथील सर्वे क्र.५४ मधील एकूण २३ एकर १९ गुंठे जमीन आहे.ही जमीन येथील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.मात्र सदर जमिनीपैकी पाच एकर जमिनीवर निपाणी नगरपालिका फिल्टर हाऊस व इतर बांधकाम करीत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले.त्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे सदर बांधकामास परवानगी देऊ नये अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहें.

याबाबत ग्रामस्थानी विचारणा केली असता त्यांनी निपाणी पालिकेस आपणाकडून कोणताही ठराव दिलेला नसल्याचे सांगितले. तसेच तहसीलदार व जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे सदर जमिनीवर निपाणी नगरपालिकेकडून होत असलेल्या फिल्टर हाऊस व इतर बांधकामासाठी ग्रामस्थांचा विरोध असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले.ग्रामविकास अधिकारी अशपाक शेख यांनी निवेदन स्विकारून ग्रामस्थांच्या भावना विचारात घेऊन याचा वरिष्ठांकडे पाठपुरावा करू असे आश्वासन दिले. यावेळी माजी ग्रामपंचायत अध्यक्ष नासिरखान इनामदार, विजय कुंभार, विजय यादव, राजू सुतार, राजू मोरे, किरण मोरे, प्रशांत पोकले, शरद पाटील, संतोष पाटील, अमर देशपांडे, शैलेश पाटील, धनाजी यादव, जिगर पाटील, काकासो कांबळे, सुरज शिंदे, दादू मोरे, सातापप्पा पिसोत्रे, पंडित असादी, नितीन आंबी, जुबेर न्याजी, फिरोज नाईक यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

वेदांत बंडगर हत्या प्रकरण...

संशयित चौगुलेचा आत्महत्येचा प्रयत्न

सांगली, ता. १६ (प्रतिनिधी)

वेदांत बंडगर खून प्रकरणातील पसार संशयित सागर उर्फ नानासो माणिक चौगुले (रा. अग्रण धुळगाव, ता. कवठेमहांकाळ) याने मंगळवारी विषारी द्रव्य प्रशान करून आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला तातडीने कवठेमहांकाळ रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी मिरज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती ती पुढे आली असून त्याची प्रकृती स्थिर आहे. दरम्यान, आत्महत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी कवठेमहांकाळ पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आल्याची माहिती निरीक्षक प्रविणकुमार कांबळे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वेदांत बंडगर यांचा गोळी घालून निर्घृण खून करण्यात आला. यानंतर जिल्ह्यात संतापाची लाट उसलळी होती.

याप्रकरणी मुख्य सुत्रधार नीलेश विठोबा गडदे, किरण लोखंडे, विशाल चौगुले, सागर चौगुले आणि अतुल वायदंडे यांच्यावर संजयनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलिसांनी अतुल वायदंडे याला यापुर्वीच अटक केली होती. त्यानंतर मुख्य सुत्रधार नीलेश गडदे याला काल अटक केली.

दोघेही सध्या पोलिस कोठडीत आहेत. यातील संशयित किरण, विशाल आणि सागर हे तिघेही पसार होते. त्यांच्या शोधासाठी एलसीबीची पथके रवाना करण्यात आली आहे.दरम्यान, सागर चौगुले याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती कवठेमहांकाळ पोलिस ठाण्यास मिळाली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. कवठेमहांकाळमध्ये त्याच्यावर प्रथमिक उपचार झाले.

त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी मिरजेतील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती स्थिर आहे. त्याने आत्महत्येचा प्रयत्न का केला? याचा पोलिस शोध घेत आहेत.पसार असणाऱ्या संशयितांच्या या कृत्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

ईश्वरपूर, ता.१६ (प्रतिनिधी)

ईश्वरपूर येथील विठ्ठलवाडी परिसरात राहणाऱ्या ३५ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी (दि. १६ जून) सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विकास कुमार सहाणे (वय ३५), मूळ रा. बलाह, (बिहार), सध्या विठ्ठलवाडी, नायरा पेट्रोलपंपाजवळ, ईश्वरपूर येथे राहत होते. मंगळवारी सकाळी सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे आढळून आले. त्यानंतर रणजित पाटील यांनी त्याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, ईश्वरपूर येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. घटनेची माहिती उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ईश्वरपूर पोलिसांना दिली.

आत्महत्ये मागील नेमके कारण अद्याप समजू शकले नसून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

निपाणी बसस्थानकात अज्ञात वृद्धाचा मृतदेह

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–



निपाणी बस स्टँड परिसरात मंगळवारी दुपारी सर्वसाधारणपणे ७५ ते ८० वयोगटातील अज्ञात वृद्धाचा मृतदेह आढळून आला आहे.सदर वृद्धाच्या अंगावर पाढरा शर्ट असून वर्ण सावळा आहे.

सदर वृद्धाचा मृतदेह महात्मा गांधी रूग्णालयात ठेवण्यात आला आहे. वृद्धाची ओळख पटलेली नसून वृद्ध आपल्या परिवयाचे असल्यास बसवेश्वर चौक पोलीस ठाणे निपाणी यांच्याशी संपर्क साधण्याचे अवाहन माजी नगरसेवक जुबेर बागवान यांनी केले आहे.

लैंगिक छळ केल्याच्या संशयातून पालकाकडून शिक्षकाला मारहाण

चिक्कोडी,ता.१६(प्रतिनिधी)–

दहावीच्या विद्यार्थ्यांचा लैंगिक छळ केल्याच्या आरोपावरून एका शिक्षकाला संतप्त पालकांनी मारहाण केल्याची घटना मंगळवारी (ता.१६) रोजी चिक्कोडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

मिळालेल्या माहिती अशी की, उर्दू सरकारी माध्यमिक शाळेत कन्नड विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या श्रीशैल कुंभार यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.कन्नड विषयात उत्तीर्ण करून देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांना शाळेतील वर्गखोली तसेच स्वच्छतागृहात नेऊन लैंगिक छळ केल्याचा आरोप आहे.

पाचहून अधिक विद्यार्थ्यांना अशाच प्रकारचा त्रास दिल्याची माहिती समोर आल्यानंतर पालकांमध्ये संतापाची लाट उसळली.संतप्त पालकांनी शाळेत घुसून संबंधित शिक्षकाला जाब विचारला व त्याला मारहाण केली.या घटनेमुळे शाळा परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच चिक्कोडी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत संबंधित शिक्षकाला ताब्यात घेतले.

तलावाजवळील १.२० एकर जागेचे बालविकास खात्यास हस्तांतरण नको

विलास गाडीवडुर यांच्यासह मान्यवरांचे निवेदन

निपाणी,ता.१६(प्रतिनिधी)–

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जवाहरलाल नेहरू प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला, नगरपालिकेच्या हद्दीत येणारी १ एकर २० गुंठे पडीक जमीन सार्वजनिक कामांसाठी मुलांची इमारत बांधण्याकरिता महिला व बाल विकास विभागाला हस्तांतरित करण्याकरिता जनतेतून विरोध असून या कामाकरीता अन्य जमीन उपलब्ध करून द्यावी असे निवेदन माजी नगराध्यक्ष विलास गाडीवडुर यांनी आयुक्तांना दिले.

सदर निवेदनातील आशय असा की, उपरोक्त प्रकरणी, मा. प्रशासकीय अधिकारी, निपाणी महानगरपालिका यांनी, दि.१५-०५-२०२६ रोजीच्या ठराव क्र.१८५ अन्वये, नगरपालिकेच्या अखत्यारीत येणारी आणि जवाहरलाल तलावाच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूची १ एकर २० गुंठे मोकळी जमीन, सार्वजनिक उद्देशांसाठी मुलांची इमारत बांधण्याकरिता महिला व बाल विकास विभागाकडे सुपूर्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार, सदर जमिनीच्या हस्तांतरणाबाबत जनतेकडून अभिप्राय/सूचना/आक्षेप मागवण्यासाठी दिनांक ०७/०६/२०२६ रोजी वर्तमान पत्रानू सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.तथापि, जवाहर तलावाजवळील जमीन महिला व बाल विकास विभागाला सुपूर्द केल्यानंतर, त्या जमिनीवरील सार्वजनिकांची वर्दळ वाढेल, ज्यामुळे जवाहर तलावाच्या सुरक्षिततेबद्दल प्रश्न निर्माण होतील. याव्यतिरिक्त, त्या जमिनीवर अनेक झाडे आहेत आणि ती झाडे देखील काढावी लागतील, ज्यामुळे तेथील उद्यानाचेही नुकसान होईल आणि एकदाही जमीन दुसऱ्या विभागाला सुपूर्द केली की, येत्या काळात त्या जमिनीवर तलावाशी संबंधित कोणतेही काम करणे कठीण होईल. त्यामुळे, उपरोक्त जमीन महिला व बाल विकास विभागाला सुपूर्द करण्याबाबत आमचा आक्षेप आहे. आणि मी याद्वारे विनंती करतो की, आपण त्या जमिनीच्या जागी दुसरी जमीन द्यावी.

सदर निवेदनावर माजी नगराध्यक्ष चंद्रकांत जासूद, माजी सभापती डॉ. जसराज गिरे, एस.व्ही. देसाई, पिंटू मोरे, नियाज खानापुरे, दिनेश गिरवनेकर, रियाज शेख, नदीम बागवान, अल्लाफ हाजूखान, साहिल हाजूखान, साहिल बागवान, अल्लाफ कोल्हापुरे, कुतुबुद्दीन हदाले, अतुल शिंदे, सत्यजित भाट, तोशिप हजरत भाई, मोहम्मद कोल्हापुरी, अभिजीत रणदिवे, तबरेज मुल्ला, अथवर कोटगी, विनोद चोरगे, राजेंद्र शेटके, एस.एम. नलवडे, अनिल यादव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जाहीर नोटीस

मौजे शहापुर येथील गट नंबर ८१ / २ पैकी प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र ८६ - २६ चौरस मिटर ची मिळकत. यासि चतु: सिमा पुर्वेस - १० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - श्री. कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस - इनामुल हसन मदरसा, उत्तरेस - श्री. सोनवणे यांची मिळकत. सदरची मिळकत सौ संजिवनी धनपाल कांबळे तर्फे वटमुखत्यार सौ.वंदना धनराज डोंबाळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंटइत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १५/०६/२०२६

ॲड. आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

जाहीर नोटीस

मौजे शहापुर येथील गट नंबर ८१ / २ पैकी प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र ८६ - २६ चौरस मिटर ची मिळकत. यासि चतु: सिमा पुर्वेस - १० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - श्री. कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस - इनामुल हसन मदरसा, उत्तरेस - श्री. सोनवणे यांची मिळकत. सदरची मिळकत सौ संजिवनी धनपाल कांबळे तर्फे वटमुखत्यार सौ.वंदना धनराज डोंबाळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंटइत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस दि.१६/०६/२०२६

ॲड.बाबासो एम.पाटील
वॉर्ड नं.१७/७७,स्वामी विवेकानंद कॉलनी शाहू पुतळ्या जवळ इचलकरंजी, मो.९२२६८८७००१.

जाहीर नोटीस

मौजे शहापुर येथील गट नंबर ८१ / २ पैकी प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र ८६ - २६ चौरस मिटर ची मिळकत. यासि चतु: सिमा पुर्वेस - १० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - श्री. कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस - इनामुल हसन मदरसा, उत्तरेस - श्री. सोनवणे यांची मिळकत. सदरची मिळकत सौ संजिवनी धनपाल कांबळे तर्फे वटमुखत्यार सौ.वंदना धनराज डोंबाळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंटइत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १६/०६/२०२६

ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,
पत्ता - गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.
मो. ७८२०९०९७०५

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७४९/१ पैकी प्लॉट नं. २९ चे क्षेत्र - ९३-० चौ. मी . खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ३० ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. २८ ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं. ६८ ची मिळकत, उत्तरेस-२० फुट रस्ता - येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही शहनाज अल्लाउद्दीन मदरखान रा. चंदूर यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस . सही ता. १५/०६/२०२६

ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,
पत्ता - गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.
मो. ७८२०९०९७०५

जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील गट नं. ६२५ मधील प्लॉट नं. ०८ पैकी दक्षिणबाजुचे क्षेत्र - ६१ - ३३ ची. मी. खुली व घर मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - भोजणे व भमणगे यांची मिळकत, पश्चिमेस - ३० फुट रस्ता दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ०८ ची शिल्लक मिळकत. येणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत ही महेश शंकर कोपद रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस . सही ता. १६/०६/२०२६

ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,
पत्ता - गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.
मो. ७८२०९०९७०५

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गं.नं. ४७९ पैकी प्लॉट नंबर ६ व ७ चे क्षेत्र २००० चौ.फूटची खुली बिगर शेती जागा मिळकत यासी चतु: सिमा - पुर्वेस - २० फूट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ५ ची उत्तरेस - प्लॉट नं. ८ ची मिळकत, येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही विलास दत्तात्रय बोंगाडें, रा. शहापूर यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी आमचे अशिलांचे लाभात संचकारदाखल रक्कम स्विकारुन सदर मिळकतीचे संचकारपत्र करुन दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा, कोणताही हक्क, करार, दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसाच्या मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली जाहीर नोटीस. ता. १६/६/२०२६.

ॲड. दिपक मारुती कदम
वेतालपेठ, तारदाळ, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
मो. ९९२२५८५२८८.

जाहीर नोटीस

इचलकरंजी म. न. हद्दीतील रि.स.नंबर २७ हिस्सा क्र. १ पैकी प्लॉट नंबर १ चे क्षेत्र १५७० - ९६ चौरस फुट ची खुली जागा सर्व. यासी चतु:सिमा पुर्वेस - सुनिल शामराव पोवार यांची मिळकत, पश्चिमेस - ९ मिटर रूंदीचा रस्ता, दक्षिणेस - अजित पोवार यांची मिळकत, उत्तरेस - ९ मिटर रूंदीचा रस्ता. सदरची मिळकत नीता संजय पोवार वगैरे २ यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी सदर मिळकतीचा करार स्वाती अनुप सिदनाळे व त्यांनी सदर मिळकतीचा करार भुषण उदयकुमार मूरगुंडे रा. इचलकरंजी यांना व त्यांनी आमचे अशिलांचेकडुन संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता. १६/०६/२०२६

ॲड.शिवकुमार सुखदेव लकडे
रा.३/१५३,देवमोरे वाडा, राणा प्रताप चौक, टाकवडे वेस, इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर
मो.नं. ९८८१०१४७२५

जाहीर इशारा

आमचे अशील १) श्री. अमोल रामकृष्ण काकडे, २) श्री. आयुष छाजुराम अग्रवाल व ३) श्री. महादेव विरूपाक्ष हाळीजोळ, सर्व रा. इचलकरंजी, यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रांवरून तमाम जनतेस या जाहीर इशाऱ्याद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :

जिल्हा कोल्हापूर, ता. हातकणंगले, मौजे कोरोची येथील गट नं. ३९७ ब पैकी प्लॉट नं. ३२ क्षेत्र २००० चौ. फूट, प्लॉट नं. ३३ क्षेत्र २००० चौ. फूट व प्लॉट नं. ३४ क्षेत्र २००० चौ. फूट अशी एकूण मिळकत असून तिच्या एकत्रित चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत :

पूर्वेस : प्लॉट नं. ३५ ची मिळकत,
पश्चिमेस : प्लॉट नं. ३१ ची मिळकत,
दक्षिणेस : २० फुटी रस्ता,
उत्तरेस : गट नं. ३९७ अ ची मिळकत

वर नमूद मिळकत ही आमच्या अशिलांची वैयक्तिक मालकीची मिळकत असून त्यावर त्यांचा कायदेशीर मालकी हक्क, कब्जा व वहिवाट आहे. सदर मिळकतीचा उपभोग आमचे अशील व त्यांचे पूर्वहक्कदार अनेक वर्षांपासून घेत आलेले आहेत.

असे असताना गट नं. ३९७ -अ मधील तथाकथित धारक श्री. रामावतार चंपालाल खंडेलवाल हे वरील मिळकत स्वतःची असल्याचे भासवून आमच्या अशिलांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करण्याचा व संभाव्य खरेदीदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न करीत आहेत.

प्रत्यक्षात आमच्या अशिलांची वर नमूद मिळकत ही गट नं. ३९७ - ब मधील त्यांची स्वतंत्र व वैयक्तिक मालकीची मिळकत आहे. सदर मिळकतीशी श्री. रामावतार चंपालाल खंडेलवाल यांचा अगर अन्य कोणाचाही कधीही कोणताही संबंध नव्हता व नाही. त्यामुळे सदर मिळकतीच्या अनुषंगाने श्री. रामावतार चंपालाल खंडेलवाल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीशी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री, गहाण, करार अथवा अन्य कोणताही व्यवहार करू नये.

आमच्या अशिलांचे असे स्पष्ट म्हणणे आहे की, श्री. रामावतार चंपालाल खंडेलवाल हे मौजे कोरोची येथील त्यांच्या कथित गट नं. ३९७ अ मधील जमीन विक्रीस काढल्याचे सांगून प्रत्यक्षात आमच्या अशिलांच्या गट नं. ३९७ - ब मधील मिळकत संभाव्य खरेदीदारांना दाखवत आहेत व त्यांची दिशाभूल करीत आहेत.

त्यामुळे तमाम जनतेस व संभाव्य खरेदीदारांना सावध करण्यात येते की,वरील मिळकतीबाबत श्री. रामावतार चंपालाल खंडेलवाल यांच्याशी अथवा त्यांच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार करू नये. कोणी व्यवहार केल्यास तो स्वतःच्या जोखमीवर व जबाबदारीवर करावा. त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही दिवाणी, फौजदारी अथवा इतर न्यायालयीन कार्यवाहीस संबंधित व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

सबब हा जाहीर इशारा देण्यात येत आहे.

ॲड. दिपक मारुती कदम
रा. वेताळ पेठ, तारदाळ, जि. कोल्हापूर
मो.नं. ९९२२५८५२८८

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७४९/१ पैकी प्लॉट नं. २९ चे क्षेत्र - ९३-० चौ. मी . खुली मिळकत यासी चतु:सिमा पुर्वेस - प्लॉट नं. ३० ची मिळकत, पश्चिमेस - प्लॉट नं. २८ ची मिळकत, दक्षिणेस - प्लॉट नं. ६८ ची मिळकत, उत्तरेस-२० फुट रस्ता - येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही शहनाज अल्लाउद्दीन मदरखान रा. चंदूर यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे करारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस दि.१६/०६/२०२६

ॲड. विश्वास पां.चुडमुंगे
४/२००, कोर्ट बिल्डींग मागे, इचलकरंजी मो.नं. ९४२२०४३६५७

जाहीर नोटीस

मौजे शहापुर येथील गट नंबर ८१ / २ पैकी प्लॉट नंबर ६ चे क्षेत्र ८६ - २६ चौरस मिटर ची मिळकत. यासि चतु: सिमा पुर्वेस - १० फुट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - श्री. कांबळे यांची मिळकत, दक्षिणेस - इनामुल हसन मदरसा, उत्तरेस - श्री. सोनवणे यांची मिळकत. सदरची मिळकत सौ संजिवनी धनपाल कांबळे तर्फे वटमुखत्यार सौ.वंदना धनराज डोंबाळे रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन यांनी सदर मिळकतीचे करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, इजमेंटइत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस दि.१५/०६/२०२६

ॲड. आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी.
मो. ९४२०७७६४८६

जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६४० पैकी प्लॉट नं. २२ चे एकत्रीत क्षेत्र - २३२.३४ चौ. मी . खुली जागा मिळकत वासी एकत्रीत चतु: सिमा पुर्वेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - मट्टीकली यांची मिळकत, दक्षिणेस - कलाजे यांची मिळकत, उत्तरेस-मुळीक यांची मिळकत. वेणेप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत ही पुजा संतोष देवकते रा . तारदाळ यांचे कब्जे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. १६/०६/२०२६

ॲड. अर्जुन तात्यासाहेब माने,
पत्ता - गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफीस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी.
मो. ७८२०९०९७०५

जाहीर नोटीस

मळकतीचे वर्णन - मौजे कबनूर येथील इचलकरंजी महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट असलेल्या मिळकत याचा क.ग.नं.६८/. असा नमूद असून याचा सी.स.न.२३१८२ असा नमूद आहे. त्यापैकी माझे मालकी हक्काची असलेली मिळकत याचे चौ.फु. १०८९.०० याचे चौ.मी. १०१.२० ची घर जागा मिळकत व यावर असलेले इ प्रतीचे बांधकाम मिळकत याचा इचलकरंजी महानगरपालिका वार्ड नं. २१/१०८५ असा असून. यासी चतु:सिमा पूर्वेस - जोशी यांची मिळकत पश्चिमेस - रस्ता दक्षिणेस - रस्ता उत्तरेस- निंबाळकर यांची मिळकत येणेप्रमाणे सदरची मिळकत श्री शिवाजी दत्तात्रय मोरबाळे, रा. इचलकरंजी यांचे कब्जेमालकीची असुन त्यांनी आमचे अशिलांकडुन संचकार पत्राने त्यांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध, निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून खरेदी देणेचे ठरले आहे.सदर मिळकत संदर्भात कोणताही न्यायालयीन वाद, हक्क, प्रोटगी कोणताही खाजगी सरकारी बोजा इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटिस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस दि.१६/०६/२०२६

ॲड.बाबासो एम.पाटील
वॉर्ड नं.१७/७७,स्वामी विवेकानंद कॉलनी शाहू पुतळ्या जवळ इचलकरंजी, मो.९२२६८८७००१.

जाहीर नोटीस

जि. कोल्हापुर ता. हातकणंगले पैकी मौजे तारदाळ येथील क. गट नंबर ३३६ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर ६३ क्षेत्र चौ. फुट ५७१.९४ याचे चौरस मीटर ५३.१५ ची बिगरशेती जागा व यावरील आर. सी. सी. बांधकामाची बंदिस्त इमारत मिळकत. यांसी चतु: सिमा- पुर्वेस - २० फुट रूंदीचा रस्ता, पश्चिमेस - सरकारी ओघळ, दक्षिणेस - प्लॉट नंबर ६४ ची मिळकत, उत्तरेस - २० फुट रूंदीचा रस्ता वेणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत ही श्री. सागर पारस दोडमणी रा. इचलकरंजी यांच्या मालकीची असुन ती त्यांनी आमचे मित्र यांना खरेदी देणेबाबत वाटाघाटी करुन संचकार रक्कम स्विकारलेली आहे व सदर मिळकतीवर श्री आर्य चाणक्य पतसंस्थेच्या बोजा व्यतिरिक्त सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा दोडमणी यांनी निर्वाळा दिलेला आहे. तथापी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही करार, कर्ज, बोजा, गहाण,दान, वाटणी, हिस्सा वगैरे अधिकार असलेस आजपासुन सात (७) दिवसाचे आत खाली दिले पत्त्यावर पुराव्याचे कागदोपत्रानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी. मुदतीत तक्रार न आल्यास मुदतीनंतर कसलीही तक्रार अगर हरकत आमचे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १६/०६ / २०२६ इ.

श्री.संजय मारूती घोरपडे
(स्टॅम्प रायटर) राजाराम स्टेडीयम, रजिस्टर ऑफिसजवळ, इचलकरंजी. मो नं. ९६२०८७९६९६

संच मान्यते विरोधात तीव्र आंदोलन करणार

आम.जयंत आसगावकर यांचा इशारा;संच मान्यता न स्विकारण्याची मागणी

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

महाराष्ट्राच्या शिक्षण आयुक्तांनी लागू केलेल्या नव्या संचमान्यता निकषांमुळे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची अनेक पदे अतिरिक्त ठरण्याची शक्यता असून, त्याविरोधात कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठ व मुख्याध्यापक संघाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याची घोषणा शिक्षक आम.जयंत आसगावकर यांनी केली.

कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या सभेत बोलताना आम.जयंत आसगावकर, व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या सभेत ते बोलत होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी व्यासपीठाचे अध्यक्ष एस.डी.लाड हे होते. आसगावकर म्हणाले, शारीरिक शिक्षण व पर्यावरण विषयांचा कार्यभार वाटून दिल्याने अनेक पूर्णवेळ व अर्धवेळ शिक्षकांची पदे कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. प्रात्यक्षिकांच्या (प्रॅक्टिकल) बॅचची संख्या ३० विद्यार्थ्यांपर्यंत निश्चित केल्यानेही शिक्षकांची पदे कमी होणार आहेत. अनेक सीएचबी (कॉन्ट्रिब्युटरी) शिक्षकांचा कार्यभार शून्यावर येण्याची शक्यता आहे. तसेच महाविद्यालयांना जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांच्या तासिका ४० मिनिटांच्या केल्यानेही शिक्षकांवर प्रतिकूल परिणाम होणार आहेत. दोन विषयांचा एकत्रित कार्यभार विचारात न घेतल्यामुळेही अनेक अडचणी निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक संघाच्या विद्याभवन येथे झालेल्या सभेत प्रा. बी. एस. पाटील, प्रा.एस.व्ही.मोरे, प्राचार्य डॉ.व्ही. एम.पाटील, प्रा. रत्नाकर माळी, भैय्या माने, प्रा.दिलीप शितोळे, प्रा.सी.एम. गायकवाड, आर.वाय.पाटील आदींनी मनोगते व्यक्त केली.अध्यक्ष एस.डी.लाड यांनी कनिष्ठ महाविद्यालयांनी अन्यायी संचमान्यता स्वीकारू नये, असे आवाहन केले.या संचमान्यता धोरणाविरोधात विधानमंडळात लक्षवेधी सूचना मांडणार असल्याचेही आम.आसगावकर यांनी यावेळी जाहीर केले.

सभेस दादासाहेब लाड,बी.जी. बोराडे, बाबा पाटील, उदय पाटील, सुधाकर निर्मळे,एन.आर.भोसले,आर. डी.पाटील, बसवराज वस्त्रद, प्रा.आण्णासाहेब बागडी, प्रा.अभिजात दुर्गी,जगदीश शिर्के, डॉ.उर्मिला सूर्यवंशी, माधवी माळी, डॉ.स्मिता वणिरे,अजित रणदिवे, प्रा.एस.व्ही.गुरबे आणि प्रा.आर.पी.पाटील आदी उपस्थित होते.

विकास विद्यामंदिर येथे नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना मान्यवर.

विकास विद्यामंदिर व चौगुले बालवाडीमध्ये नवागतांचे उत्साहात स्वागत

कोरोची,ता.१६(वार्ताहर)-

गणेश नगर येथील विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विकास विद्यामंदिर व चौगुले बालवाडी मध्ये प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष विकास चौगुले यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमापूजनाने नवागतांच्या स्वागताला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांचे औक्षण करून व खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांना शाळेमध्ये प्रवेश दिला जात होता. शाळेमध्ये फोटो पॉईंट,आकर्षक अशी फुग्यांची सजावट करण्यात आली होती तसेच विद्यार्थ्यांच्या हाताचे ठसे देखील घेण्यात आले.यावेळी शाळेच्या महाव्यवस्थापिका स्मिता चौगुले, मार्गदर्शक दत्तात्रय देसाई, शिवानंदरावळ,संचालक यश चौगुले, मुख्याध्यापिका सपना मेळवंकी, सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती.

विनायक हायस्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

इचलकरंजी,ता.१६-

विनायक हायस्कूलमध्ये शाळा प्रवेशोत्सव संस्थेचे संचालक विनायक चव्हाण साहब यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला .

यावेळी नवगतांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात, औक्षण व पुष्पवृष्टी करून करण्यात आले. उपस्थित पालकांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व शालेय पाठ्यपुस्तक देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. पालकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. नशामुक्ती शपथ संतोष सावंत यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक हुबळे यांनी केले.आभार शाम कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन सौ मिनाज पटेल यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

समर्थ विद्यामंदिरमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना शिक्षिका.

समर्थ विद्यामंदिरमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

इचलकरंजी,ता.१६-

इचलकरंजी एज्युकेशन सोसायटीच्या, समर्थ बाल व विद्या मंदिरमध्ये शिशुगट, लहानगट व इ.१ लीच्या नवागतांच्या स्वागताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शाळेच्या प्रवेशद्वारावर फुगे, रांगोळी व फुलांच्या पायघड्या घालून मुलांचे स्वागत केले.मोठ्या गटातील मुलांनी विविध प्राण्यांचे मुखवटे घालून मुलांच्यावर पुष्पवर्षाव केला.पारंपारिक वेशभूषेत नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. सर्व नवागत विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन श्री.राशिनकर, कार्यकारणी सदस्य श्री.पाटील, व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या हस्ते खाऊ, अंकलिपी यांचे वाटप करण्यात आले तसेच इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका चौगुले, सौ.पाटील व सर्व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

टाकवडेतील कल्लेश्वर हायस्कूलला देणगी

टाकवडे,ता.१६(प्रतिनिधी)

टाकवडे (ता.शिरोळ) येथील स्वत शिक्षण संस्थेचे श्री कल्लेश्वर हायस्कूल टाकवडे या शाळेला इचलकरंजी येथील डॉ. पद्मानभन वामन कुलकर्णी यांनी ५१ हजाराची देणगी दिली.



यावेळी माजी शिक्षकांसह श्री.मगदूम, श्री.डोईजड, श्री. अणुसे, जे.बी.पाटील, एस.जी. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित शिक्षकांच्यावतीने डॉ.कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

टागोर विद्यानिकेतनमध्ये सायकल रॅलीने प्रवेशोत्सव साजरा

इचलकरंजी,ता.१६-

इचलकरंजी महानगरपालिका संचालित रवींद्रनाथ टागोर विद्यानिकेतन क्रमांक २७ मध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

टागोर विद्यानिकेतनमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे सायकलवरून स्वागत करताना उपस्थित प्रमुख मान्यवर.

सासनाच्या इंधन बचतीच्या धोरणाला अनुसरून, शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी नवीन दाखल झालेल्या १९८ चिमुकल्यांना आपल्या सायकलवर बसवून, वाजत-गाजत सन्मानाने शाळेत आणले. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या सायकल रॅलीने आणि स्वागताने संपूर्ण परिसराचे लक्ष वेधून घेतले.

या सोहळ्याला इचलकरंजी महानगरपालिकेचे उपमहापौर अनिल डाळ्या,नगरसेविका सुरेखा जाधव, नगरसेवक नितेश पोवार, नगरसेविका स्नेहल रावळ, शिक्षणाधिकारी बी.एम.कासार, दीपक रावळ आणि शाळेच्या मुख्याध्यापिका अलका शेलार आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.प्रास्ताविक राजेंद्र घोडके यांनी केले. आभार अधिक शेट्टी यांनी मानले. सूत्रसंचालन वंदना गतारे यांनी केले.कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांची मोठी उपस्थिती होती.

सरस्वती हायस्कूलमध्ये नवागतांना पाठ्यपुस्तकांचे वाटप

इचलकरंजी,ता.१६

सरस्वती हायस्कूलमध्ये नवागतांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण करण्यात आले. ढोलच्या गजरात व पुष्पवृष्टीच्या वर्षावात नवागतांचे आनंददायी पद्धतीने स्वागत करण्यात आले.

सरस्वती हायस्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करताना अमरसिंह माने, सिराज भोरे आदी मान्यवर.

कार्यक्रमाची सुरुवात माजी विद्यार्थिनी स्नेहा संकपाळ हिच्या सुरेल स्वरात राष्ट्रगीताने करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ.आर. एन. जाधव यांनी नवागतांचे स्वागत केले. सिराज भोरे व अतुल आंबी यांनी शाळेच्या प्रथम दिनी नवागतांना शुभेच्छा दिल्या. अमरसिंह माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सदिच्छा दिल्या. हायस्कूलच्यावतीने नवागत विद्यार्थ्यांना पेन देऊन स्वागत केले.संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह माने व सिराज भोरे यांच्या हस्ते इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वितरण करण्यात आले. अतुल आंबी यांनी विद्यार्थ्यांना सदिच्छा दिल्या. एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत माजी विद्यार्थी व प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सूत्रसंचालन अनुराधा काळे व सौ. सीमा पाटील यांनी केले. आभार जिमखाना विभाग प्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमास पर्यवेक्षक अरुण मोरे, महावीर कांबळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. स्वाती भाटे, शिक्षक, बंधू भगिनी, पालक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कन्यागत महापर्वासाठी शेडशाळ ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार

सरपंच संकपाळ यांची माहिती;शासनाकडे विशेष निधीची मागणी

बुबनाळ,ता.१६(वार्ताहर)-

आगामी कन्यागत महापर्वाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शेडशाळ (ता.शिरोळ) ग्रामपंचायतीने तब्बल ३५ कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार केला असून,त्यासाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याची माहिती ग्रामपंचायतीचे प्रशासक तथा सरपंच सुनील संकपाळ यांनी दिली.

पश्चिम वाहिनी कृष्णा नदीच्या पवित्र तीरावर बसलेले शेडशाळ हे धार्मिक दृष्ट्या महत्वाचे गाव असून कन्यागत महापर्व काळात येथे हजारो भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच गावाचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने ग्रामपंचायतीने विविध विकासकामांचा आराखडा तयार केला आहे.

या आराखड्यात शेडशाळ कमान फाटा ते नदी घाटापर्यंत तीन किलोमीटर रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रिटीकरण, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना फुटपाथ, सौर पथदिवे व बाकड्यांची उभारणी, विविध ठिकाणी आरसीसी गटर्स, बंदिस्त गटर्स व अंतर्गत रस्त्यांची कामे यांचा समावेश आहे. तसेच गावातील तलावाचे स्वच्छता व सुशोभीकरण, प्रवासी व भाविकांसाठी निवारा शेड, भक्त सेवा हॉल, महाप्रसादासाठी सभागृहे, भक्त निवास, पार्किंग व्यवस्था आणि स्वागत कमानी उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

याशिवाय जुन्या नदी घाटाच्या दोन्ही बाजूंना घाट बांधकाम, नळपाणी पुरवठ्यासाठी नवीन इंटक उभारणी, शाळा व पाणीपुरवठा योजनेसाठी सौरऊर्जा प्रणाली, मंदिर परिसरातील विविध विकासकामे तसेच पालखी मार्गावरील विद्युत तारा बदलून एअर बंच वायर टाकण्याचाही प्रस्ताव आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे.

श्री संत बाळूमामा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, शेतकरी सोसायटी ते नळपाणी पुरवठा योजनेपर्यंत रस्ता, मुख्य रस्ता ते सुनील सूर्यवंशी शेतापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण, तसेच गावातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण या कामांनाही प्राधान्य देण्यात आले आहे. सरपंच तथा प्रशासक सुनील संकपाळ यांनी सांगितले की, कन्यागत महापर्वाच्या काळात शेडशाळ येथे मोठ्या प्रमाणावर भाविक येत असल्याने त्यांना मुलभूत व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे विशेष निधीची मागणी करण्यात येणार आहे. या विकास आराखड्यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच गावाच्या विकासालाही गती मिळेल.

यावेळी उपसरपंच सौ.रोहिणी कोल्हापूरे, गजानन चौगुले,किरण संकपाळ,मिनाक्षी गडदे,सुनिता नाईक, प्रियांका कल्याणी, फैय्याज अहमद सोलापूरे,भारती लाड,हैदर पाथरवट, पुष्पा शिरढोणे,करिश्मा पाथरवट यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी सुनील वाघमोडे उपस्थित होते.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १२/०६/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
किरायेदार
सायं. ७ वा.
A मिलने का मजा प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १२ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
पोर्न स्टार
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी
★ या शुक्रवारपासून दर्शकांच्या भेटीला ★
रोज २ खेळ
तुंबाड्ची मंजुळा
दोन्ही चित्रपट गावलेले आणि परिवारासह पाहण्यालायेक!
शुक्रवार, १२ जून २०२६ पासून
रोज २ खेळ
• दुपारी १२:०० वाजता
• दुपारी ३:०० वाजता
शुक्रवारपासून सुरू
रोज २ खेळ
• सायंकाळी ६:०० वाजता
• रात्री ९:०० वाजता
DOLBY 7.1 SURROUND SOUND
मनोरंजन, महाकॉमेडी आणि सौंदर्यिक अनुभवाचा द्वयत्र संगमच!
बुकिंग साठी संपर्क 9623150103
ऑनलाइन पेमेंट स्वीकारले जातील G Pay PhonePe
ऑनलाइन बुकिंग साठी bookmyshow
★ आपल्या आवडत्या चित्रपटांचा आनंद घ्या फक्त पंचवटी चित्रमंदिरात! ★

५७ वर्षे दिनेश सिनेमांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गर्दीचा ४ था आठवडा
रोज ४ खेळ ११.४५-३-६-९ वा.
मूर्तीत अडकण्या पेक्षा माणसातील देव ओळखायला शिकवणारा अप्रतीम सिनेमा....
देवळात गर्दी करण्यापेक्षा माणसाला माणुसकी दाखवा देव स्वतः तुमच्याकडे येईल...
देऊळ बंद-२ आता परीक्षा देवाची...

कल्पना
DOLBY DIGITAL QUBE CINEMA NETWORK
शुक्रवार ता.१२ पासून लेजर प्रोजेक्टरसहीत
रोज २ खेळ १२*३.१५
रोज २ खेळ ६.३०*९.३०
(मराठी चित्र) जनता दर 50/-
देऊळ बंद २
आता परीक्षा देवाची...
होरर कॉमेडी चित्र
पैसा वसूल तुंबाड्ची मंजुळा
(मराठी चित्र)
सिध्दाशी मराठी कवेचे पुनरागमन | विश्वास • भावना • ज्ञान
आई तुळजाभवानी, क्रिएट जोशी, मल्हार अमृतसुरे

गुरु शुक्रवार ता.१२ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज २ खेळ सकाळी १२ व ३.१५
रोज २ खेळ सकाळी ६.३० व ९.२०
(मराठी चित्र) देऊळ बंद २
आता परीक्षा देवाची...
पैसा वसूल तुंबाड्ची मंजुळा
(मराठी चित्र)
सिध्दाशी मराठी कवेचे पुनरागमन | विश्वास • भावना • ज्ञान
आई तुळजाभवानी, क्रिएट जोशी, मल्हार अमृतसुरे

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow
"देऊळ बंद 2" - मराठी (U/A 16+)
12:30 PM, 03:00 PM, 07:00 PM, 09:30 PM
"तुंबाड्ची मंजुळा" - मराठी (U/A 16+)
04:00 PM, 06:30 PM, 10:30 PM
"पेड्डी" - हिंदी (U/A 16+)
12:30 PM
बुधवार फूड कॉम्बोचा लाभ घ्या आणि कोणताही शो फक्त ₹100* पासून पहा.

फोर्च्युन सिनेप्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11
देऊळ बंद 2 (MAR) (U/A) 12.00, 03.30, 07.00, 10.15pm
तुंबाड्ची मंजुळा (MAR) (U/A) 01.15, 04.15, 07.15, 10.30pm
हॉन्टेड (द्रॅकुला ऑफ द पास्ट) (3D) (HIN) (A) 11.00am, 10.30pm
पेड्डी (HIN) (U/A) 01.30pm
गव्हर्नर (HIN) (U/A) 11.00am
है जवानी तो इश्क होना है (HIN) (U/A) 05.00pm
भारत भाग्य विधाता (HIN) (U/A) 08.00pm
बुधवार धमाका कोणताही शो पहा फक्त 100 रु.

कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून शेतकरी समृद्ध बनविणार

-आ.अतुल भोसले : काले येथे सहकार पॅनेलची प्रचार सभा

कराड,ता.१६(प्रतिनिधी)-

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या १७ पाणीपुरवठा योजनांना नवसंजीवनी देण्याचा निर्धार करण्यात आला आहे. सोलर फिडरच्या माध्यमातून वीजबिलमुक्ती, कमी पाणीपट्टी, ठिबक सिंचनाचा व्यापक वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एकरी १५० ते २०० टनांपर्यंत ऊस उत्पादन घेण्याचे उद्दिष्ट असून शेतकरी समृध्द बनविण्याचे ध्येय असल्याची माहिती आ. डॉ. अतुल भोसले यांनी दिली.

काले: येथील सभेत बोलताना आ.डॉ.अतुल भोसले, समोर उपस्थित जनसमुदाय.

कृष्णा कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काले (ता.कराड) येथे आयोजित जयवंतराव भोसले सहकार पॅनेलच्या प्रचारसभेत ते बोलत होते. यावेळी माजी चेअरमन मदनराव मोहिते,व्हाईस चेअरमन दयानंद पाटील,ज्येष्ठ नेते पै.जगन्नाथ मोहिते, गीतांजली पाटील,उमेदवार नयन पाटील आदी उपस्थित होते.

डॉ. भोसले यांनी विरोधकांवर जोरदार टीका करताना सांगितले की, २०१५ मध्ये सहकार पॅनेलकडे कारखान्याची सत्ता आली तेव्हा आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. कामगारांचे वेतन देण्यासाठीही निधी उपलब्ध नव्हता आणि तब्बल ५८ कोटी रुपयांची थकबाकी होती. मात्र पुढील ११ वर्षांच्या कालावधीत कारखान्याची आर्थिक घडी सावरण्यात यश आले. सभासदांना ७८ कोटी रुपयांची साखर मोफत देण्यात आली, तर थकबाकी शून्यावर आणण्यात यश मिळाले. विरोधकांकडे आजही विकासाचा कोणताही अजेंडा नसून, त्यांच्या मानगुटीवर बसलेले १०० कोटींचे भूत उतरवण्यासाठीच त्यांना सत्ता हवी असल्याचा आरोप केला. कारखान्याच्या भविष्यातील योजनांचा उहापोह करताना त्यांनी वाकुर्डे योजनेवर ४५ मेगावॅट क्षमतेचा सोलर फिडर उभारण्याचा मानस व्यक्त केला. माजी चेअरमन मदनराव मोहिते यांनी कारखान्याच्या स्थापनेपासून्या वाटचालीचा आढावा घेताला. ज्येष्ठ नेते पै. जगन्नाथ मोहिते यांनी, डॉ. सुरेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याने स्थैर्य आणि प्रगती साधल्याचा दावा केला. संस्थापक पॅनेल आणि कारखान्याच्या प्रत्यक्ष व्यवस्थापनातील दृष्टिकोनात मोठा फरक असल्याचे सांगत त्यांनी सहकार पॅनेलला मिळालेल्या रयत संघटनेच्या पाठिंब्याचे स्वागत केले. व्हाईस चेअरमन दयानंद पाटील, गीतांजली पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

सभेस सुनीता शेवाळे, गोविंद गावडे, अँड. आत्माराम पाटील,प्रमोद पाटील, वैभव थोरात, बाळासाहेब गलांडे, शंकरराव थोरात, मारुती पाटील,प्रकाश पाटील, सुनील यादव आदींसह परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते,शेतकरी सभासद उपस्थित होते. आभार अशोक माळी यांनी मानले.

प्रचारसभेत बोलताना आ.डॉ. अतुल भोसले यांनी विरोधी पॅनेलवर गंभीर आरोपांची सरबत्ती केली. विरोधकांनी कारखान्याच्या विकासापेक्षा विविध घोटाळ्यांमुळेच अधिक प्रसिद्धी मिळविल्याचा दावा करत त्यांनी पाला-पाचोळा घोटाळा, खाजगी साखर विक्री व्यवहार, तोडणी-वाहतूक घोटाळा, इमारतींवरील कर्जे,बोगस कामगार मानधन, वाहन खर्च, विश्रामगृह खर्च आणि इंधन वापरातील अनियमितता यांसारख्या मुद्यांचा उल्लेख केला.कारखान्याच्या हितापेक्षा वैयक्तिक स्वार्थ जपणाऱ्या नेतृत्वापासून सभासदांनी सावध राहावे,असे आवाहन केले.

कोल्हापूर-सातारा गॅझेटमुळे ४२ लाख मराठ्यांना आरक्षणाचा लाभ

मनोज जरांगे

कराड,ता.१६(प्रतिनिधी)-

कोल्हापूर व सातारा संस्थानच्या गॅझेटच्या अंमलबजावणीसंदर्भात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून, या गॅझेटबाबतचा अहवाल तयार करण्यासाठी आयुक्तांकडून आवश्यक कागदपत्रे मागविण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याची माहिती मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

कराड :दत्त चौकातील छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मनोज जरांगे-पाटील यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन केले.

दरम्यान, या गॅझेटची अंमलबजावणी झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे ४२ लाख मराठा समाजबांधवांना आरक्षणाचा लाभ मिळेल आणि या भागातील मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक उन्नतीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मराठा आरक्षणाच्या जनजागृतीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी दौऱ्यादरम्यान मनोज जरांगे-पाटील यांनी कराडला अल्पकाळ भेट दिली. यावेळी त्यांनी दत्त चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कराड शहरात आगमन होताच मराठा समाजाच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, नगरसेवक जयवंतराव पाटील, रणजीत पाटील यांच्यासह मराठा समाजातील युवक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे-पाटील म्हणाले, मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेला लढा निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. कोल्हापूर आणि सातारा संस्थानांशी संबंधित ऐतिहासिक गॅझेटची अंमलबजावणी ही पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजासाठी महत्त्वाची ठरणार आहे. याबाबत आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाखो मराठा बांधवांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळू शकतो.

ईश्वरपूर: विनीत नांगरे याचा सत्कार करताना आम. जयंत पाटील,प्रा.अरुणादेवी पाटील,समवेत अन्य मान्यवर.

ईश्वरपूर येथे गुणवंतांचा सत्कार

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे खासदार एस.डी.पाटील विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज ईश्वरपूरच्या विद्यामंदिर आयआयटी अँड मेडिकल अकेडमीच्या गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला.

वाळवा आय.आय.आय.टी.च्या प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षा प्रा.सौ.अरुणादेवी पाटील, मानद सचिव अँड.बी.एस.पाटील, संस्थेचे सहसचिव अँड.धैर्यशील पाटील व विश्वस्त मंडळाच्या सदस्या सौ.हर्षाली पाटील व मान्यवर उपस्थित होते. इ.१२वीच्या विनीत तानाजी नांगरे, विभावरी गणेश कांबळे या विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स परिक्षेत उत्तुंग यश मिळवले व ते आयआयटी प्रवेशास पात्र झाले तसेच जेईई परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी पार्थ शिंदे,आर्यन वडार,प्रथमेश लोहार,साहिल सुतार, अवधूत लोंढे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस.एल. पाटील तसेच खा.एस.डी.पाटील विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या एस.डी.खोत,विन अकेंडमीचे प्रा.संग्राम पाटील,प्रा.चंद्रकांत जगदाळे,जगन्नाथ पाटील, शंतनू पाटील तसेच सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते.

प्रतापसिंह हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

सातारा,ता.१६(प्रतिनिधी)-

शाळा या जीवन शिक्षण देणारी मंदिर असल्यामुळे शाळेतील भौतिक सुविधांपेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले.

येथील प्रतापसिंह हायस्कूल येथे विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रवेशोत्सव २०२६ कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरसेविका भारती शिंदे, किरण पाटील, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री.पाटील म्हणाले, प्रतापसिंह हायस्कूलला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. शाळेचे नाव उज्ज्वल करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे तसेच शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्यावे आणि देश पातळीवर शाळेचे नाव उंचवावे.यावेळी दोन विद्यार्थिनी आपण एका विद्यार्थ्याने उत्स्फूर्त भाषण केले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

आष्टा येथील प्राथमिक शाळेत वृक्षारोपण करताना नगराध्यक्ष विशाल शिंदे, विश्वराज शिंदे व इतर मान्यवर.

आष्टा येथील शाळा क्र.९ व आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

आष्टा,ता.१६(प्रतिनिधी)-

आष्टा येथील जिल्हा परिषद शाळा क्र. ९ येथे वर्ष २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त नगराध्यक्ष विशाल शिंदे, युवा नेते विश्वराज शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत व वृक्षारोपणही झाले.

यावेळी राजाराम देसावळे, सादिक इनामदार, सरोजिनी शिंदे, विश्वराज शिंदे, मुख्याध्यापक फरीदा मकानदार, ऋतुराज पाटील, उत्कर्ष माने शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच आष्टा येथील प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा व अण्णासाहेब डांगे कनिष्ठ महाविद्यालयात बालवाडी,पहिली,पाचवी ते नववी विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत झाले. प्रारंभी मुख्याध्यापक रघुनाथ बोते, विकास बेंद्रे व डॉ.आनंद मेटकरी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बालवाडी ते अकरावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाजत गाजत शाळेमध्ये प्रवेश दिला. कार्यक्रमाचे संयोजन गौतम धनवडे, संतोष गावडे, कैलास कारंडे, बजरंग हाके, अनिल सुतार, संदीप कांबळे, सुनिता पाटील, सविता पाटील,मीनाक्षी जाधव,ज्योती माने,उद्धव पाटील,आशाराणी माळी, अधिक कुटे,उज्वला गावडे आदींनी केले.स्वागत एस.आर.पाटील यांनी केले.सूत्रसंचालन ए.के.पाटील यांनी तर आभार अरुणा देसाई यांनी मानले.

मनपातील भ्रष्टाचार रोखला तर घरपट्टी वाढीची गरज नाही

खास.विशाल पाटील यांचा टोला

सांगली,ता.१६(प्रतिनिधी)-

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महापालिका निवडणुकीपूर्वी घरपट्टीवाढ रद्द केली होती. सत्ता आल्यानंतर पुन्हा घरपट्टीवाढ केली आहे. आयुक्तांकडूनही लोकप्रतिनिधींची सहमती असल्याचे खोटे सांगितले जात आहे. पण घरपट्टी वाढ चुकीची आहे. सर्वसामान्यांना परवडणारी नाही. महापालिकेने भ्रष्टाचार कमी केला तर घरपट्टी वाढविण्याची गरज भासणार नाही, असा टोला खासदार विशाल पाटील यांनी पत्रकार बैठकीत लगाविला.



खास.पाटील म्हणाले,महापालिकेच्या निवडणुकीपूर्वी तत्कालीन आयुक्तांनी घरपट्टीवाढ केली होती. त्यावेळी पालकमंत्री पाटील यांनी घरपट्टीवाढीला स्थगिती दिली होती. महापालिकेच्या निवडणुकीतही घरपट्टीवाढ करणार नसल्याचे स्पष्ट केले. अनेक खोटी आश्वासने दिली आणि सत्ता मिळवली. पण सत्ता आल्यानंतर लगेच घरपट्टीवाढ केली गेली. नूतन आयुक्तांनीही भांडवली मुल्यावर आधारित घरपट्टीवाढीला लोकप्रतिनिधींची सहमती असल्याचे सांगितले, मात्र याला माझी सहमती नव्हती. तशी विचारणा मला प्रशासनाकडून झालेली नाही. मनपातील भ्रष्टाचार रोखला तर घरपट्टीवाढीची गरज पण लागणार नाही.

महापालिका क्षेत्रातील रस्त्यांचे रोड रजिस्टर ठेवले जात नाही. अनेक रस्ते दुबार करून पैसे हडपले जातात. पूर नियंत्रणासाठी सहाशे कोटींचा प्रकल्प राबविला जात आहे. पण पूर नियंत्रण आणि याचा काही संबंधच नाही. या प्रकल्पामुळे पूर थांबणार नाही.केवळ शामरावनगरमधील पाण्याचा प्रश्न निकालात निघेल. शिवाय याची निविदा कमी दराने आली नाही. यामध्ये टक्केवारीचा बाजार झाला असल्याचा संशय खा. विशाल पाटील यांनी व्यक्त केला.

पाणीप्रश्न गंभीर बनत आहे. पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यात लक्ष घालत नाहीत. साताऱ्याला सांगलीपेक्षा जास्त पाणी मिळाले आहे. आता उपसाबंदी लागू झाली आहे. पाऊस कमी होता मग याचे नियोजन होणे आवश्यक होते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सत्ता आहे तरी देखील नियोजन केले गेले नाही. शेतकऱ्यांना वीज पंपासाठी दोन तास देखील वीज मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांची पिके वाया जात असल्याचा आरोप खा. विशाल पाटील यांनी केला. शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत. महामार्गाला विरोध नाही. पण शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या तरच घ्याव्यात. रात्रीच्यावेळी पोलीस बंदोबस्त घेऊन मोजणीचा प्रकार कशासाठी केला जातोय? असा सवाल खा. पाटील यांनी केला.

कॉलेज कॉर्नर ते कुमठे रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार...

सांगली कॉलेज कॉर्नर ते कुमठे फाट्यापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. या कामात काही नेत्यांनी 'टक्केवारी' घेतल्याचा संशय आहे. दोन आमदारांच्या मतदारसंघातून हा रस्ता जात आहे. त्यांनी किती बैठका घेतल्या? ठेकेदाराने कर्मचाऱ्यांचे पगार देखील दिले नाहीत.त्यामुळे आता काम रखडले आहेत. झालेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप खा. विशाल पाटील यांनी केला.

आदर्श शाळेमध्ये नवागतांचे स्वागत

शिराळा,ता.१६(प्रतिनिधी)-

येथील आदर्श बालक मंदिर शाळेमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी पहिली ते चौथी इयत्तेतील विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आले. यानिमित्ताने शाळेच्या परिसरात आनंदी आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना शाळेची ओळख करून दिली.यावेळी मुख्याध्यापक महेश जाधव, प्रसाद इनामदार, विजय ठकार, प्रभाकर सुतार, संजय साठे, सरिता पाटील, किरण पाटील, मंजिरी देशपांडे, जान्हवी पाटील, पूजा कुंभार उपस्थित होते.

डॉक्टरांनी स्वत:च्या मानसिक आरोग्याची काळजी घ्यावी

डॉ.चंद्रशेखर हाळिंगळे

मिरज,ता.१६-

रुग्णांची सेवा करताना डॉक्टर स्वत:च्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करतात. तणावाचे व्यवस्थापन ही केवळ वैयक्तिक गरज नसून उत्तम आरोग्य सेवेसाठीची पूर्वअट आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर हाळिंगळे यांनी केले.

अथणी येथे झालेल्या कार्यशाळेवेळी डॉ.चंद्रशेखर हाळिंगळे यांचा सत्कार करताना डॉ.सतीश मुगन्नावर, डॉ.मुरारी बनज व इतर.

आयुष फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. सतीश मुगन्नावर यांनी केले. पुढे बोलताना डॉ. हाळिंगळे यांनी सांगितले की,वैद्यकीय व्यवसाय हा अत्यंत जबाबदारीचा असून रुग्णांच्या अपेक्षा, सततचे कामाचे तास, आपत्कालीन परिस्थिती, निर्णय घेण्याचा ताण आणि वाढत्या व्यावसायिक जबाबदाऱ्यांमुळे डॉक्टरांमध्ये तणावाचे प्रमाण वाढताना दिसत आहे .तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी नियमित व्यायाम, योग, ध्यानधारणा, सकारात्मक विचारसरणी, वेळेचे योग्य नियोजन, पुरेशी झोप आणि संतुलित जीवनशैली यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी आयुष फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. सतीश मुगन्नावर, उपाध्यक्ष डॉ.मुरारी बनज, डॉ. मुरारी बनज, सचिव डॉ. संजय पुजार तसेच निर्मल हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते.

मराठवाडी परिसरात बिबट्याची दहशत

ढेबेवाडी,ता.१६(प्रतिनिधी)-

ढेबेवाडीसह मराठवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. बिबट्याच्या या वाढत्या उपद्रवामुळे परिसरातील नागरिक दहशतीच्या छायेत जगत असून, त्यांना रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणेही धोकादायक बनले आहे.

सध्या उन्हाळ्याच्या दिवसात डोंगरगांगांना लागलेल्या आगीमुळे वणव्यांनी डोंगर जळून खाक झाले आहेत. अन्न आणि पाण्याच्या शोधात असलेले वन्यप्राणी आता सुरक्षित निवारा नसल्यामुळे थेट मानवी वस्तीकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसत आहे. मराठवाडी येथील मंगेश शिंदे यांच्या घरामागे रात्री ९ च्या सुमारास बिबट्याने आपला तळ ठोकला होता. शिंदे यांच्या पाळीव कुत्र्याला बिबट्याची चाहूल लागताच तो मोठ्याने भुंकू लागला. मंगेश शिंदे यांनी परिस्थितीचा अंदाज घेण्यासाठी बॅटरीच्या टॉर्चचा प्रकाश टाकला असता, त्यांना समोर भला मोठा बिबट्या दिसला. बिबट्याला पाहून शिंदे यांचा थरकाप उडाला, तरीही त्यांनी प्रसंगावधान राखत आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात त्या बिबट्याचे छायाचित्र टिपले.या भागातील अनेक श्वान आणि शेळ्यांवर बिबट्याने यापूर्वीही हल्ले केले आहेत. आता बिबट्या थेट मानवी वस्तीत घुसल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. "जर बिबट्याने मानवावर हल्ला केला, तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.बिबट्याची वाढती दहशत लक्षात घेता, वनविभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावणे किंवा इतर सुरक्षा उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी मराठवाडी व परिसरातील नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

वाढत्या उपद्रवामुळे नागरिक हैराण



मराठवाडी येथे भक्ष्याच्या शोधात घराच्या पाठीमागे आलेला बिबट्या.

बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी

कृष्णा नदीमध्ये प्रदूषण नसल्याचा खुलासा

कराड,ता.१६(प्रतिनिधी)-

कृष्णा नदीमध्ये प्रदूषण नसल्याचा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने पत्रकाद्वारे करण्यात आला आहे.

या पत्रकात म्हटले आहे की, कृष्णा नदीच्या पात्रात पसरलेल्या गडद हिरव्या रंगाच्या तवंगामुळे नदीचे पाणी खराब झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी धामणेर व पेरले या परिसरातील कृष्णा नदीच्या पाण्याचे नमुने संकलित केले होते. सदर पाण्याचे नमूने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते.या अहवालावरून असे निदर्शनास आले आहे की, नदीच्या पात्रामध्ये नीलरहित शेवाळाची वाढ झाली आहे. त्यामुळे नदीच्या पाण्याला हिरवा रंग आलेला असून नदीपात्रात कोणत्याही प्रकारचे रासायनिक प्रदूषण झाल्याचे आढळून आले नाही.

एआय व ऑटोमेशन आधारित शेतीसाठी प्रयत्न करणार

डॉ. सुरेश भोसले;पेठनाका येथे सभासद संवाद मेळावा संपन्न

ईश्वरपूर,ता.१६(प्रतिनिधी)-

'भविष्यातील शेती ही कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ड्रिप सिंचन आणि ऑटोमेशन तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे. बदलत्या काळानुसार शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे गरजेचे असून, येणाऱ्या काळात एआय-आधारित व ऑटोमेशन शेतीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील,' असे प्रतिपादन यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी केले.

पेठनाका येथील सभासद संवाद मेळाव्यात डॉ. सुरेश भोसले यांचे स्वागत करताना सम्राट महाडिक, राहुल महाडिक व अन्य मान्यवर.

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि., रेठरे बुद्रुकच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पेठनाका येथील वनश्री नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुलात आयोजित भव्य सभासद संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी भाजप सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक राहुल महाडिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भोसले म्हणाले, "सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे चालविण्यासाठी अनुभवी आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व आवश्यक असते. कारखाना चुकीच्या हातात गेल्यास संस्थेचे मोठे नुकसान होऊ शकते. यापूर्वी विरोधकांच्या कारकिर्दीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहारांमुळे कारखान्याला मोठी हानी सहन करावी लागली होती. त्यामुळे सभासदांनी विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेवून सहकार पॅनलच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे."

यावेळी बोलताना सम्राट महाडिक म्हणाले, "कृष्णा कारखाना सक्षमपणे चालविण्याची क्षमता डॉ. सुरेश भोसले यांच्या नेतृत्वात आहे. कारखान्याची प्रगती आणि सभासदांचे हित जपण्यासाठी महाडिक गट पूर्ण ताकदीने मैदानात उतरला असून प्रत्येक सभासदापर्यंत पोहोचून सहकार पॅनेलच्या विजयासाठी काम केले जाईल."राहुल महाडिक म्हणाले, "मागील निवडणुकीत सभासदांनी सहकार पॅनेलवर मोठा विश्वास दाखवत ११ हजार मतांची आघाडी दिली होती. यावेळी हा विश्वास अधिक दृढ होईल आणि आघाडी २० हजार मतांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास आहे. कार्यकर्ते गावोगावी जाऊन सभासदांशी थेट संवाद साधतील.या सभासद संवाद मेळाव्यास वाळवा तालुक्यातील कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षकांचा ऑनलाईन कामांचा बोजा कमी होणार

प्रशासकीय व न्यायालयीन कारणांमुळे रखडलेल्या केंद्रप्रमुख भरती प्रक्रियेला गती

आजरा,ता.१६(सचिन कळेकर)

राज्यातील केंद्रप्रमुख भरती प्रक्रियेला अखेर गती मिळाली असून,२०२३ पासून विविध प्रशासकीय आणि न्यायालयीन कारणांमुळे रखडलेली ही प्रक्रिया आता अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत आहे.शासनाने घाईघाईने नियुक्त्या देण्याचा मार्ग न स्वीकारता संपूर्ण प्रक्रियेची कायदेशीर, प्रशासकीय आणि शैक्षणिक पातळीवर सखोल छाननी करून पुढे नेल्याने दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेल्या हजारो शिक्षकांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात अनेक वर्षांपासून केंद्रप्रमुख पदे रिक्त होती. पण आता शाळांसाठी ८५ नवे केंद्रप्रमुख मिळणार आहेत. गुणवत्ता यादीनुसार पात्र उमेदवारांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेने एकत्र केले असून त्यांची छाननी सुरू आहे. या आठवड्यात ही प्रक्रिया पूर्णत्वास जाण्याची शक्यता आहे. नुकताच पीजीआय मानांकनामध्ये कोल्हापूर जिल्हा देशात प्रथम आला आहे. त्यातच नवे केंद्रप्रमुख मिळाल्याने प्रशासन अधिक सुगम होणार आहे.राज्यातील ४८२० केंद्रप्रमुख पदांपैकी २४१० पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा (एडीसीई) द्वारे तर उर्वरित २४१० पदे सेवाज्येष्ठता व अनुभवाच्या आधारे भरण्यात येणार आहेत. त्यामुळे गुणवत्ता, स्पर्धात्मकता आणि अनुभव यांचा समतोल साधणारी भरती राबविण्यात येत असल्याचे शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे.

या भरती प्रक्रियेसंदर्भात विविध याचिका दाखल झाल्यानंतर प्रकरणाची सखोल न्यायालयीन छाननी झाली. मुंबई उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयात विविध मुद्द्यांवर सुनावण्या झाल्या असून, या प्रक्रियेतील अनेक बाबी

कायदेशीर तपासणीच्या कसोटीवर तपासल्या गेल्या आहेत. त्यामुळे ही भरती प्रक्रिया केवळ प्रशासकीय निर्णय न राहता न्यायालयीन परीक्षणातून तावून-सुलाखून पुढे आलेली प्रक्रिया म्हणून पाहिली जात आहे. गेल्या २६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने सर्व बाजूंचा युक्तीवाद ऐकून भरती प्रक्रियेवरील जैसे थे(स्टेटस को) आदेश उठवल्यामुळे भरतीचा मार्ग सुकर झाला.

शिक्षण विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर शाळा व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी ही पावले उचलली जात आहेत. गेल्या काही वर्षांत शिक्षकांवर विविध ऑनलाइन नोंदी, अहवाल, माहिती संकलन आणि प्रशासकीय कामांचा मोठा भार वाढला होता. सक्षम केंद्रप्रमुख उपलब्ध झाल्यास या कामांचे अधिक परिणामकारक समन्वयन होऊन शिक्षकांचा वेळ अध्यापनासाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, शिक्षक प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण, गुणवत्ता विकास कार्यक्रम आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी केंद्रप्रमुखांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे रिक्त पदे भरण्याचा निर्णय हा केवळ भरतीपुरता मर्यादित नसून संपूर्ण शालेय शिक्षण व्यवस्थेला बळकटी देणारा निर्णय मानला जात आहे.

जिल्ह्याला मिळणार ८५ नवे केंद्रप्रमुख

दरम्यान, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण विभागाने या दीर्घकाळ प्रलंबित प्रस्तावर सकारात्मक भूमिका घेतल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त होत आहे. विविध प्रशासकीय अडचणी, मतभेद आणि न्यायालयीन प्रक्रियांमधून मार्ग काढत रखडलेल्या भरतीला गती देण्यात आली असून, यामुळे राज्यातील शाळांना आवश्यक शैक्षणिक नेतृत्व मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शाळा स्तरावरील प्रशासन अधिक सक्षम होण्याबरोबरच शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा ताण कमी होईल आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेले नेतृत्व उपलब्ध होईल. अशा प्रकारे, २०२३ पासून रखडलेल्या केंद्रप्रमुख भरती प्रक्रियेला न्याय देत शासनाने नव्या शैक्षणिक वर्षासाठी महत्त्वाचे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.

काळम्मावाडी धरण क्षेत्रातील पाईपलाईन योजनेच्या जॅकवेल परिसरातील गाळ काढण्याचे सुरु असलेले काम.

काळम्मावाडीतील गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

अल निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबल्याने काळम्मावाडी धरणातील पाणीपातळी लक्षणीयरीत्या घटली असून काळम्मावाडी धरणातून थेट पाइपलाईन योजनेचा पाणी उपसा बंद करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर महानगरपालिकेकडून काळम्मावाडी धरणक्षेत्रातील इन्टेकवेल व जॅकवेल परिसरात साचलेला गाळ काढण्याचे काम दोन एक्स्कॅव्हेटर मशिनद्वारे युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

काळम्मावाडी योजनेतून पाणी उपसा बंद झाल्यामुळे शहराला पर्यायी शिंगणापूर पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र पंचगंगा नदीची पाणीपातळीही कमी झाल्याने शिंगणापूर येथून मर्यादित स्वरूपातच पाणी उपसा करता येत आहे. जलसंपदा विभागाशी महानगरपालिकेने समन्वय साधून राधानगरी धरणातून पंचगंगा नदीमध्ये पाणी सोडण्याचे नियोजन केलेले आहे. शिंगणापूर बंधारा पूर्ण क्षमतेने भरून घेण्याचे नियोजन करण्यात आले असून त्यानंतर शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. नागरिकांनी पाण्याचा अत्यंत जपून व काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

व्यंकटेश्वरा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

कबनूर,ता.१६-

कबनूर येथील व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूलच्या नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात झाली.

शैक्षणिक वर्षाची सुरुवात बालचमूंच्या स्वागताने झाली. टाळ्यांच्या गजरात व औक्षण करून नवागतांचे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. स्मिता बेडक्याळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.शाळेतील उत्साही वातावरण व परिपाठ पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

भंगारातील गाडीचे अतिक्रमण निर्मुलन ट्रकमध्ये रुपांतर

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

टाकाऊतून टिकाऊ या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवत कोल्हापूर महानगरपालिकेच्या कार्यशाळा विभागाने एक आगळावेगळा आदर्श घालून दिला आहे.

घनकचरा व्यवस्थापनासाठी २०१६ साली घेतलेल्या आणि सध्या भंगारात निघालेल्या आरसी गाड्यांना वर्कशॉप मधील कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या कौशल्याने नवसंजीवनी दिली. या गाड्यांचे रूपांतर आता महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागासाठी उपयुक्त अशा ट्रकमध्ये करण्यात आले असून, सहा दिवसांच्या विक्रमी वेळेत त्या रस्त्यावर कार्यरत झाल्या आहेत.विशेष म्हणजे या संकल्पनेचे जनक स्वतः आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड हेच आहेत. आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांनी कार्यशाळा विभागास भेट दिली त्यावेळी या गाड्या भंगारात न घालता याचा अतिक्रमण निर्मुलन विभागासाठी वापर करता येईल का याची कल्पना मांडली. त्यानुसार सहा.आयुक्त डॉ.विजय पाटील व कार्यशाळा विभागाचे प्रमुख संजय भोसले यांच्या नेतृत्वाखाली कार्यशाळा विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी गेले आठवडाभर अहोरात्र आणि सुट्टीच्या दिवशीही काम करून या गाड्या दुरुस्त केल्या. भंगारात निघालेल्या गाड्यांचं इंजिन, बॉडी, हायड्रोलिक सिस्टीम अशा सर्व बाबी वर्कशॉपमध्येच दुरुस्त करून अतिक्रमण हटाव कारवाईसाठी आवश्यक त्या रचनेत बदल करण्यात आले.या नूतनीकरण करण्यात आलेल्या गाड्यांचे उद्घाटन महापौर सौ.रुपाराणी निकम व महापालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भारूड यांच्या हस्ते करण्यात आले.

कोल्हापुरात अन्न तपासणी प्रयोगशाळा उभारावी-पुजारी

गारगोटी,ता.१६(प्रतिनिधी)-

राज्यामध्ये अन्नपदार्थांमधील भेसळ ही अत्यंत गंभीर व चिंताजनक समस्या बनली आहे. दूध, खाद्यतेल, मसाले, मिठाई, किराणा माल तसेच दैनंदिन वापरातील विविध अन्नपदार्थांमध्ये भेसळीच्या घटना सातत्याने आढळून येत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत.

त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात तपासणी करणारी अन्न तपासणी प्रयोगशाळा (एन ए बी एल)स्थापन करावी अशी मागणी ग्राहक पंचायतचे प्रशांत पुजारी यांनी केली आहे.यासंदर्भात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य प्रशांत पुजारी यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना सविस्तर निवेदन देवून मागणी केली आहे.

मुरगूडमधील ग्रामीण रुग्णालयास ५० बेडसाठी निधी द्या

मुरगूड ता.१६ (प्रतिनिधी)-

मुरगूड ग्रामीण रुग्णालयास ३० बेड वरून ५० बेडला मंजुरी मिळून दोन वर्षे होत आली तरी सुद्धा ५० बेड रूग्णालय होण्यास निधीचा मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे ५० बेडच्या मुरगूड ग्रामीण रुग्णालयासाठी तातडीने निधी द्यावा, अन्यथा मुरगूड व परिसरातील लोक आंदोलन करतील असा इशारा निवेदनाद्वारे मुरगूडचे नगरसेवक दत्ता मंडलिक व अन्य नागरिकांनी दिला आहे.

तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी ५० बेड च्या रुग्णालयास मंजुरी दिली होती.पण दोन वर्ष उलटले तरी त्याच्यासाठी निधीच मिळाला नाही. या रुग्णालयास निधी मिळावा यासाठी वारंवार पत्र

मुरगूड ग्रामीण रुग्णालयास आवश्यक निधी मिळावा यासाठीचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन देताना मुरगूडचे नगरसेवक दत्ता मंडलिक व अन्य कार्यकर्ते.

व्यवहार करुन तसेच प्रत्यक्षात भेटून वेळोवेळी निधी देण्याची विनंती केली आहे.पण अद्यापपर्यंत निधी उपलब्ध होत नसल्याने मंजुरी मिळून देखील ३० बेड चे ५० बेड रुग्णालय होऊ शकले नाही.याचा त्रास गोरगरीब जनतेला होत आहे.

कागल तालुक्यातील मुरगूड शहर अत्यंत महत्त्वाचे शहर असून त्या शहरास लागून ५५ गावांचा ग्रामीण रुग्णालयाशी थेट संपर्क येतो.त्याचप्रमाणे भुदरगड व राधानगरी तालुक्यातील पेशंट हे देखील मुरगूड ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचार करण्याकरिता येतात. तसेच मुगुड ग्रामीण रुग्णालय मध्ये उपलब्ध असऱ्याऱ्या सोयी सुविधा अपुऱ्या पडत आहेत. तालुक्यातील व शेजारील तालुक्यातील विद्यमान मंत्री महोदयांकडे वैद्यकीय शिक्षण,आरोग्य खाते अशी महाराष्ट्रातील वजनदार खाती असूनही वारंवार मुगुड्मधील ग्रामीण रुग्णालयाकडे दोन्ही मंत्र्यांचे दुर्लक्ष होत आहे,याबाबत नाराजी आहे. या रुग्णालयामध्ये आर्थोपेडिक डॉक्टर, स्त्री-रोग तज्ञ, प्रसुती वेळी लागणारे इतर सहाय्यक व तसेच रुग्णालयामध्ये लागणाऱ्या औषधांचा तुटवडा, सोनोग्राफी मशीन बरेच दिवस बंद अवस्थेत आहे.

तरी त्या मशीनसाठी डॉक्टर उपलब्ध नाही अशा अनेक उणीवा सध्या मुरगूड ग्रामीण रुग्णालयामध्ये आहेत.त्या दूर करून ३० वरून ५० बेड च्या रुग्णालयासाठी आवश्यक तो सर्व निधी मिळावा अन्यथा आम्ही तमाम मुरगूडवासीय साखळी उपोषण व आंदोलन करू, असा इशारा देण्यात आला आहे.

..अन्यथा नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

जाखलेत ४०० सागवानाची झाडे पेटली

शेतकऱ्याचे ५० लाखाचे नुकसान;दोषींवर कारवाईची मागणी

वारणानगर,ता.१६(प्रतिनिधी)-

जाखले (ता.पन्हाळा) येथील हनुमंत खडी परिसरात एका शेतकऱ्याची तब्बल ४०० सागवानाची झाडे पेटवून दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेजारच्याच एका हिस्सेदाराने हे कृत्य केले असून, यात शेतकरी जयसिंग बाबुराव पाटील यांचे सुमारे ५० लाख रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे. या प्रकरणी महसूल विभागाने घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे.

जयसिंग पाटील यांनी आपल्या चार एकर पडीक क्षेत्रात अत्यंत कष्टाने ही सागवानाची झाडे लावली

जाखले (ता.)पन्हाळा येथे आग लावल्याने पेटलेली सागवान झाडे

होती. गेल्या १३ वर्षांत शेजाऱ्यांकडून पाणी विकत घेऊन त्यांनी ही झाडे मोठी केली. मात्र, दोन दिवसांपूर्वी शेजारच्या हिस्सेदाराने ही झाडे पेटवून दिली. शेतातील सुकलेल्या गवतामुळे आग वेगाने पसरली आणि सर्वच्या सर्व झाडे जळून खाक झाली. झाडे पेटवून दिल्याचा प्रकार लक्षात येताच जयसिंग पाटील यांनी महसूल विभागाकडे तक्रार केली. महसूल अधिकारी प्रसाद मोहिते यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून नुकसानीचा पंचनामा केला आहे.

१३ वर्षे मुलासारखी वाढवलेली झाडे राख केल्याने माझे अतोनात नुकसान झाले आहे. प्रशासनाने दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी पीडित शेतकरी जयसिंग पाटील यांनी केली आहे.शेजारील हिस्सेदाराने आग लागल्याचे किंवा झाडे पेटत असताना देखील कळवलेले नाही त्यामुळे हि आग जाणीवपूर्वक लावल्याचे जयसिंग पाटील यांनी सांगितले.

सर्वच लोकप्रतिनिधींवर टक्केवारीचे आरोप करणे अयोग्य

मंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)-

शासकीय कामांच्या ठेक्यांसाठी आमदार आणि अधिकाऱ्यांना टक्केवारी द्यावी लागते, या कंत्राटदारांच्या अधिवेशनात झालेल्या वक्तव्यावर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत कोणत्याही कामात कधीही टक्केवारी घेतली नसल्याचे स्पष्ट करत, त्यांनी अशी सरसकट आणि सर्वसाधारण विधाने करणे योग्य नसल्याचे सांगितले.

सर्वच लोकप्रतिनिधींवर टक्केवारीचे आरोप करणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. शक्तीपीठ महामार्गाच्या मुद्द्यावर बोलताना मंत्री मुश्रीफ यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या हिताची भूमिका पुन्हा मांडली. ते म्हणाले, 'शक्तीपीठ महामार्गातून कोल्हापूर जिल्हा पूर्णपणे वगळावा असा माझा प्रयत्न होता, पण आता पुन्हा तोच विषय चर्चेत आला आहे. माझ्या मतदारसंघातील बोरीवडे आणि इतर गावे हे माझे हृदय आहे मात्र हा भाग आता अडचणीत आला आहे.' या प्रकल्पाला स्थानिक जनतेचा विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सरपंच मानधनातून नवागत विद्यार्थ्यांची घरफाळा,पाणीपट्टी भरणार

शिरगाव,ता.१६(प्रतिनिधी)-

राधानगरी तालुक्यातील कुडुत्री गावचे सरपंच शिवाजी बळवंत चौगले यांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची घरफाळा व पाणीपट्टी सरपंच मानधनातून भरण्याचा निर्णय पूऱ्हा घेतला आहे.तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना स्वखर्चातून मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले आहे . दरम्यान यावेळी शाळेत नवागतांचे उत्साही स्वागत करण्यात आले.

जि.प.च्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्येत वाढ व्हावी , शाळेचे अस्तित्व टिकून राहावे, यासाठी पहिलीत प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या घराचा घरफाळा व पाणीपट्टी सरपंचांनी स्वतःच्या मानधनातून भरण्याचा संकल्प याही वर्षी केला आहे. मागील वर्षी ज्या

सरपंच शिवाजी चौगले यांचा स्तुत्य उपक्रम

कुडुत्री येथे विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करताना सरपंच शिवाजी चौगले,दिलीप जोहार,सुरेश गुरव आदी मान्यवर

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. तो पुर्ण करून त्याच्या पावत्या संबंधीत पालकांना देण्यात आल्या. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास सरपंच शिवाजी चौगले, उपसरपंच दिलीप जोहिर सदस्य कविता चौगले, काशीनाथ कांबळे, शालेय कमिटी अध्यक्ष किरण चौगले ,गावातील पदाधिकारी, अध्यापक उपस्थित होते. सुत्रसंचलन संभाजी निकम यांनी तर आभार संगीता पाटील यांनी मानले.

वेदगंगा नदीची पाणी पातळी खालावली

पावसाच्या ओढीने गारगोटीत एक दिवस आड पाणी पुरवठा होणार

गारगोटी,ता.१६(प्रतिनिधी)-

मान्सूनातील मृग नक्षत्र सुरु होऊन आठ दिवस झाले, पण पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे भुदरगड तालुक्यातून वाहणाऱ्या वेदगंगा नदीची पाणी पातळी वेगाने खालावली आहे. परिणामी पाण्याचे दुर्भीक्ष जाणवत आहे. त्यामुळे गारगोटी शहरात एक दिवस आड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन

नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा

मान्सून लांबला आहे. पावसाने ओढ धरली आहे.त्यामुळे वेदगंगा नदी पात्रात पाणी कमी प्रमाणात आहे. गारगोटी येथे नदी पात्र काही ठिकाणी कोरडे पडले आहे, त्यामुळे शहरातील पाणीपुरवठा एक दिवस आड होणार आहे. नागरिकांनी सहकार्य करावे व पाण्याचा वापर जपून करावा.

-प्रकाश वास्कर,सरपंच गारगोटी

गारगोटी येथे वेदगंगा नदीच्या पाणी पातळीत मोठी घट झाली आहे.

ग्रामपंचायतीने केले आहे.

गेल्या वर्षी पावसाळ्यापूर्वी म्हणजे १० मे पासून पावसाने सुरुवात केली होती. त्यामुळे गेल्या वर्षी या दिवसांत भुदरगड तालुक्याची वरदायिनी असणाऱ्या वेदगंगा नदीला महापूर आला होता. नदी दुथडी भरून वाहत होती. पण यावर्षी मान्सून सुरु झाला तरी पावसाचा पत्ता नाही. मृग नक्षत्र हे हमखास पावसाचे नक्षत्र म्हणून ओळखले जाते, हे नक्षत्र सुरु होऊन आठ-दहा दिवस झाले, तरी पावसाचा पत्ता नाही. शेत शिवार मशागत करून तयार आहेत, पण पाऊस नसल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत. त्यामुळे बळीराजा आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

पाऊसच नसल्याने वेदगंगा नदी कोरडी

मान्सून सुरु झाला तरी पाऊस नसल्याने वेदगंगा नदीची पाणी पातळी खालावली आहे. काही ठिकाणी या नदीने तळ गाठला आहे. शिवाय काही ठिकाणी नदी कोरडी झाली आहे. गारगोटी येथे पण पाण्याचा तळ गाठला असल्याने पाणी टंचाई भासत आहे.त्यामुळे गारगोटी शहराला दरोरज पाणीपुरवठा होण्याऐवजी एक दिवस आड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन ग्रामपंचायतीने केले आहे.शिवाय नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे.

केंद्रीयमंत्री ना.अमित शहा यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांकडून दौरा मार्गाची पाहणी

इचलकरंजी,ता.१६

केंद्रीय गृहमंत्री ना.अमित शाह यांच्या प्रस्तावित इचलकरंजी दौऱ्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या आयुक्त पल्लवी पाटील यांनी उपायुक्त नंदु परळकर, उपायुक्त राहूल मर्डेकर, उपायुक्त विद्या कदम, मुख्य लेखा अधिकारी विकास खोळपे, मुख्य लेखा परीक्षक आरती खोत, शहर अभियंता महेंद्र क्षीरसागर तसेच संबंधित विभाग प्रमुखांसमवेत शहरातील प्रभाग समिती कार्यालय ,कोल्हापूर रोड, ए.एस.सी.कॉलेज, छत्रपती शाहू महाराज पुतळा, इंडस्ट्रीयल इस्टेट, जुने एस.टी. स्टँड परिसर, के.ए.टी.पी. ग्राउंड या दौरा मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी आयुक्तांनी दौरा मार्गावरील रस्त्यांची स्थिती, स्वच्छता

व्यवस्था, पथदिवे, वाहतूक व्यवस्थापन, सुशोभीकरण तसेच नागरिकांच्या सोयी-सुविधांचा आढावा घेतला.

मार्गावरील आवश्यक दुरूस्तीची कामे, स्वच्छता मोहीम व अन्य नागरी सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.तसेच दौऱ्यादरम्यान कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश आयुक्त पल्लवी पाटील यांनी दिले. दौरा मार्गावरील विविध चौक, प्रमुख रस्ते तसेच कार्यक्रमस्थळ परिसराची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजनां बाबत सूचना करण्यात आल्या.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाकडून सर्व आवश्यक तयारी युद्धपातळीवर सुरू असून, शहर स्वच्छ, सुशोभित व व्यवस्थित ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी सहा.आयुक्त नितिन बनगे, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख धनंजय पळसुले, सहा. आरोग्य अधिकारी मंगेश दुरुगकर, मुख्य स्वच्छता निरीक्षक संग्राम भोरे, अतिक्रमण विभाग प्रमुख सुभाष आवळे, स्वच्छता निरीक्षक सचिन भुते, उमेश कांबळे सुरज पांगरे आदि उपस्थित होते.

इचलकरंजी येथील छ. शाहू पुतळा ते नाईट कॉलेजकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर गटारीच्या दुरुस्तीबाबत वारंवार तक्रार करुन ही महानगरपालिकेच्या दुर्लक्षपणामुळे अपघात घडत आहेत. तेव्हा एखादाचा जीव गेल्यानंतर महानगरपालिका प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

कौटुंबिक वादातून युवकाचा खून

ईश्वरपूर,ता.१६ (प्रतिनिधी)

वाळवा तालुक्यातील जूनेखेड येथे कौटुंबिक वादातून झालेल्या भांडणाचे पर्यवसान थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी रात्री घडली. या घटनेत कपिल झाझाम्या पवार (वय ३५, रा. जूनेखेड) यांचा विळा व कोयत्याने वार करून निर्घृण खून करण्यात आला. याप्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १५ जून रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास जूनेखेड येथील सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे असलेल्या घरात मुलीला शाळेत न पाठविणे तसेच मुलाने खेळण्याचा लाकडी गाडा आणल्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

यावेळी आरोपी झाझाम्या कस्ताण्या पवार (वय ६०) यांनी कपिल पवार यांच्या कानाजवळ कोयत्याने वार केल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर अजय ऊर्फ अझरुद्दीन झाझाम्या पवार (वय २३) याने हातातील विळ्याने कपिल पवार यांच्या मान, डोके, हात व पाठीवर सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या कपिल पवार यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.या प्रकरणी मयताची पत्नी प्रिती कपिल पवार (वय २४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ईश्वरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण पाटील, पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून आरोपींना ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती पोलीसांनी दिली.

कोरोचीत ढोल ताशा वाजवत घरफाळा व पाणीपट्टी वसुली

कोरोची,ता.१६(वार्ताहर)

कोरोची ग्रामपंचायतीच्यावतीने थकीत घर फाळा व पाणीपट्टी वसुलीसाठी थकितदारांच्या घरासमोर जाऊन ढोल ताशा व हलगी वाजवत वसुलीसाठी धडक मोहीम जोरात सुरू केले आहे.

कोरोची ग्रामपंचायतच्यावतीने ग्रामविकास अधिकारी रांझा पाटील व सरपंच डॉ. संतोष भोरे आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या आदेशाने गावांमधील थकीत घरफाळा व पाणीपट्टीसाठी धडक मोहीम चालू केली असून थकीतदार ग्रामस्थांच्या घरासमोर जाऊन ढोल ताशा वाजवत घरफाळा व पाणीपट्टी वसुली करणे जोरात सुरू केले आहे. तरी जे थकीतदार आहेत त्यांनी घर फाळा व पाणीपट्टी लवकरात लवकर भरावा अन्यथा वाजत गाजत घरासमोर येऊन घर घरफाळा वसूल करून घेतला जाईल असे आवाहन ग्रामपंचायत च्या वतीने करण्यात आले आहे. या मोहिमेवेळी हेड क्लार्क दीपक माने,राजकुमार मिरजकर,अमर कारवेकर, चंद्रकांत कारले, रेखा जाधव, सुनीता चौगुले, शिल्पा हवळ, विक्रम कोष्टी,आकाश थोरवे, अक्षय गलांडे,संदीप बिरंबोळे, ओंकार कापसे, सागर पवार, राजवर्धन ठाणेकर,सुज पाटील सह वाजंत्री ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

छत्रपती शासन महिला आघाडीच्यावतीने प्रांतकार्यालयावर मोर्चा

इचलकरंजी, दि. १६

सावकारीतून महिलेला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याच्या गुन्हातील फरार मुख्य संशयीतास त्वरीत अटक करावी, अवैध सावकारीच्या विळख्यात अडकलेल्या कुटुंबांना न्याय द्या, महिलांवरील अत्याचारांना आळा घालावा आणि या मुद्द्यांबाबत चर्चेसाठी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांची भेट घडवून आणावी या प्रमुख मागण्यांसाठी छत्रपती शासन महिला आघाडीच्यावतीने येथील प्रांतकार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी आंदोलक महिलांनी लोकप्रतिनिधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणुन सोडला.

शहर परिसरात अवैध सावकारीचे जाळे फोफावत आहे. यापैकी काहीजण आठवड्याला १० ते ३० टक्क्यांपर्यंत व्याजाने कर्ज देत असल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि मानसिक शोषण होत आहे. अवैध सावकारीतून महिलांचा अनैतिक व्यापार, त्यातून आर्थिक वसुलीचा गंभीर आरोपही होत आहे. अवैध सावकारीतून अडचणीतील महिलेला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हाही दाखल झाला आहे. या गुन्हातील मुख्य संशयीतास त्वरीत अटक करावी, त्याला सहकार्य करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अवैध सावकारीच्या विळख्यात अडकलेल्या कुटुंबांना न्याय द्यावा, महिलांवरील अत्याचारांना आळा घालावा आणि या मागण्यांसंदर्भात चर्चेसाठी २० जून रोजी इचलकरंजी दौऱ्यावर येत असलेले केंद्रीय गृहमंत्री किंवा राज्याचे गृहमंत्री यांची भेट घडवून आणावी अशी मागणी छत्रपती शासन महिला आघाडीने केली आहे.

छत्रपती शासन महिला आघाडीच्यावतीने येथील प्रांतकार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, त्याप्रसंगीचे छायाचित्र.

या मागण्यांसाठी आज मुख्यमार्गावरुन घोषणाबाजी करत महिलांनी प्रांतकार्यालयावर मोर्चा काढला. पोलिसांनी प्रवेशद्वारातच हा मोर्चा अडवल्याने आंदोलक महिलांनी आरोपीला शिक्षा द्या-पिडीतेला न्याय द्या, महिलांना न्याय मिळालाच पाहिजे, एक रुपयाचा कढीपत्ता-लोकप्रतिनिधी झाले बेपत्ता यांसह लोकप्रतिनिधींच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणुन सोडला. त्यानंतर शिष्टमंडळाने प्रांताधिकारी दिपक शिंदे यांची भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा केली. यावेळी प्रांताधिकारी शिंदे यांनी मागण्यांचे गांभीर्य ओळखुन पोलिसांनी योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले. या आंदोलनात दिव्या मगदूम, शितल मस्के, कांचन कांबळे, शबाना शेख, पूजा पळसे, रेश्मा खान, अनिसा जमादार यांच्यासह महिला सहभागी झाल्या होत्या.

खंडणी, मारहाण प्रकरणातील हद्दपार गुंड जेरबंद

जत,ता.१६ (प्रतिनिधी)

जत परिसरात दहशत निर्माण करणारा तसेच खंडणी, अपहरण, मारहाण आणि अन्य गंभीर गुन्हांमध्ये सहभागी असलेला हद्दपार कुख्यात गुंड मधुकर ऊर्फ मध्या दादासो वाघमोडे (वय ४०, रा. गुळवंची, ता. जत) यास जत पोलिसांनी सोमवारी (दि. १५) सायंकाळी अटक केली. गुळवंची येथे क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनासाठी तो येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक बिरप्पा लातुरे यांनी नियोजनबद्ध सापळा रचून ही धाडसी कारवाई यशस्वी केली.

मधुकर ऊर्फ मध्या वाघमोडे हा जत परिसरातील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध शरीराविरुद्धचे, मालमत्तेबाबतचे, खंडणी, अपहरण यासह विविध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. काही दिवसांपूर्वी तो मोका कायद्यातील गुन्हात जामिनावर बाहेर आला होता. तसेच जत पोलिस ठाण्यातील गुन्हामध्ये शस्त्र बाळगल्याप्रकरणी तो पाहिजे आरोपी होता.

पोलीस अधीक्षक तुषार दोषी, अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन थोरबोले यांच्या मार्गदर्शनाखाली फरार व परागंदा आरोपींचा शोध घेण्याची मोहीम सुरू होती.

याच मोहिमेदरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक बिरप्पा लातुरे यांना गुप्त बातमीदारामार्फत मधुकर ऊर्फ मध्या वाघमोडे हा गुळवंची येथे क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक जीवन कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश ओलेकर, योगेश पाटोळे आणि कॉंडीबा बंडगर यांचे विशेष पथक तयार करून खाजगी वाहनातून घटनास्थळी धाव घेतली. अत्यंत गोपनीय पद्धतीने सापळा रचत पथकाने मध्या वाघमोडे यास ताब्यात घेतले.

पाकीट मारणाऱ्या संशयितास पकडले

कोल्हापूर,ता.१६(प्रतिनिधी)

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या कोल्हापूर दौऱ्या दरम्यान न्यू पॅलेस परिसरात एका कार्यकर्त्याचे पाकीट चोरण्याचा प्रयत्न करणारा युवक रंगेहाथ पकडला गेला. शाहूपुरी पोलिसांनी त्याला अटक करून चोरीतील सहा हजार रुपयांची रक्कम जप्त केली आहे.

स्वप्निल मारुती घुले (वय २५, रा. भिलेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.

तपासादरम्यान संशयिताकडून चोरीतील सहा हजार रुपये हस्तगत करण्यात आले असून पुढील तपास शाहूपुरी पोलिसांकडून सुरू आहे.

घर कामगार संघटनेचे आयुक्त कार्यालयासमोर निदर्शने

इचलकरंजी, दि. १६

घरेलू कामगारांना किमान वेतन आणि आठवड्याची सुटी देण्याचे आदेश द्यावेत, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजात सुधारणा करावी यासह विविध मागण्यांसाठी मंगळवारी कोल्हापुर जिल्हा घर कामगार संघटनेने आंतरराष्ट्रीय घरेलू कामगार दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी आंदोलकांनी कार्यालयसमोर जोरदार घोषणाबाजी करुन प्रशासनाचे लक्ष वेधले.

जिल्हा घर कामगार संघटनेने आंतरराष्ट्रीय घरेलू कामगार दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला.

घरेलू कामगार महिलांना वाढत्या महागाईमुळे तुटपुंज्या पगारावर संसार चालवणे अवघड झाले आहे. त्यामुळे या महिलांना किमान वेतन मिळावे, आठवड्याची सुटी मिळावी, संसारोपयोगी भांडी संचाचे वाटप करावे, सन्मानधन योजनेजी अंमलबजावणी करावी, घरेलु कामगार कल्याणकारी मंडळासाठी १०० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतुद करावी, नवीन कल्याणकारी योजना सुरु कराव्यात, मंडळात नोंदणी आणि नुतणीकरणाची वयोमर्यादा ७० वर्षेपर्यंत वाढवावी, तसेच कल्याणकारी मंडळावर कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची नेमणुक करण्याच्या मागण्या कोल्हापुर जिल्हा घर कामगार संघटनेने केल्या आहेत. या मागण्यांसाठी आंतरराष्ट्रीय घरेलु कामगार दिनाचे औचित्य साधून या संघटनेने मलाबादे चौकातून मुख्यमार्गावरून सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढला. कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करुन प्रशासनाचे लक्ष वेधले आणि शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. या आंदोलनात कामगार नेते दत्ता माने, पार्वती जाधव, प्रमिला जाधव, शोभा गेजगे यांच्यासह घरेलु कामगार महिला सहभागी झाल्या होत्या.

कंपनीमध्ये नोकरीची संधी प्राप्त झालेले डीकेटीईचे ३१ विद्यार्थी.

डीकेटीईच्या ३१ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

इचलकरंजी, ता. १६

येथील डीकेटीईच्या कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग, अर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड मशिन लर्निंग तसेच अर्टिफिशियल इंटेलिजन्स डाटा सायन्स विभागातील तब्बल ३१ विद्यार्थ्यांची मॅक्सीमस इन्फोवेअर या तंत्रज्ञान क्षेत्रातील नामांकित कंपनीत कॅम्पस इंटरव्हुद्वारे उत्तम पॅकेजवरती निवड झाली आहे.

या कॅम्पस इंटरव्हयूवमधून डीकेटीईच्या कॉम्प्युटर विभागातून २२, एआयएमएल विभागातून ६ तर एआयडीएस इंजिनिअरींग विभागातून ३ अशा एकूण ३१ विद्यार्थ्यांना मॅक्सीमस इन्फोवेअर या कंपनीमध्ये नोकरीची सुवर्ण संधी प्राप्त झाली आहे.

या यशाबद्दल डीकेटीईचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे व सर्व ट्रस्टींनी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना संस्थेच्या संचालिका प्रा. डॉ. एल.एस.आडमुठे, विभागप्रमुख प्रा.डॉ.एस.के.शिरगावे, डॉ डी.व्ही. कोदवडे, डॉ टी.आय बागबान टीपीओ जी.एस. जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

पंचगंगा प्रदूषणमुक्ती विषयी जिल्हाधिकारी कार्यालयात २५ रोजी बैठक

आंदोलन अंकुशचे आंदोलन स्थगित

कुरुंदवाड, ता.१६(प्रतिनिधी)

पंचगंगा नदी प्रदूषणमुक्ती विषयी येत्या २५ जूनला जिल्हाधिकारी कोल्हापूर कार्यालयात जिल्हाधिकारी यांनी विशेष बैठक आयोजित केलेली आहे अशी माहिती इचलकरंजी विभागाचे प्रांताधिकारी यांनी उपोषणकर्त्यांना दिल्याने कुरुंदवाड येथे आंदोलन अंकुश व सर्व पक्ष कृती समितीच्या वतीने सुरू असलेले उपोषण मंगळवारी सायंकाळी तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. दरम्यान उपोषण करणाऱ्यांना प्रांताधिकारी यांच्या हस्ते सरबत पाणी देऊन उपोषणाची तात्पुरती स्थगिती करण्यात आली. उपोषणकर्त्यांची आरोग्य तपासणी शिरोळ तालुका वैद्यकीय अधिकारी पथकाच्या वतीने कुरुंदवाड येथील डॉ अंकिता यादव व त्यांच्या पथकाने केली.

सकाळपासून आंदोलन स्थळी शिरोळ तालुक्यातील सर्व पक्षी कृती समितीचे नेते कार्यकर्ते मोठ्या संख्येने येऊन आंदोलनास पाठिंबा दिला होता. सायंकाळी आठ वाजताच्या सुमारास इचलकरंजी विभागाचे प्रांताधिकारी आणि शिरोळ तालुक्याचे तहसील अनिल कुमार हेळकर, कुरुंदवाड चे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने आदींनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन माहिती समजून घेतली सूचनेनुसार दिनांक २५ रोजी विशेष बैठक बोलावण्यात येत आहे. या बैठकीत योग्य तो तोडगा निघेल असे आश्वासन प्रांताधिकारी यांनी दिल्याने आंदोलनकर्त्यांनी हे आंदोलन तात्पुरते स्थगित करून २५ जून रोजी मोठ्या संख्येने कोल्हापूर येथे सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले.

CHANGE OF NAME
My old Name
DHANALAXMI AVADHUT KULKARNI
Do Hereby Solemnly Declare My New Name as
DHANLAXMI AVADHUT KULKARNI
For Passport Issuance

घागर नेल्याचा जाब विचारल्याने वृद्धास मारहाण

कोल्हापूर ,ता.१६(प्रतिनिधी)

शेतात जनावरांसाठी ठेवलेली पाण्याची घागर नेल्याचा जाब विचारल्याचा रागातून दोघांनी गणपती लक्ष्मण चव्हाण (वय ७७, रा. सांगरुळ, ता. करवीर) यांना काठीने बेदम मारहाण केली.

ही घटना सोमवारी (दि. १५) सकाळी पावणेअकराच्या सुमारास सांगरुळ गावच्या हद्दीतील पट्टीचे परडे नावाच्या शेतात घडली. याबाबत पोलीस सुत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, जखमी चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार करवीर पोलिसांनी अमर दिनकर घुंगुरकर (३०) आणि राजाराम तोरस्कर (४५, दोघे रा. सांगरुळ) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

महाद्वार व जोतिबा रोडवरील अतिक्रमणावर कारवाई

कोल्हापूर, ता. १६ (प्रतिनिधी)

महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय क्र.२ छ.शिवाजी मार्केट व अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत बिनखांबी गणेश मंदीर ते महाद्वार चौक व जोतिबा रोड या परिसरात धडक कारवाई करत अनधिकृत फेरीवाले व मंदिराभोवती असलेल्या फुलवाले यांच्या अतिक्रमणावर मंगळवारी कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये ८ लोखंडी पाईप, १ लोखंडी टेबल, १ बुके टेबल, १ मोठी छत्री, २ लोखंडी जाळी, १ स्टँण्ड बोर्ड, १ काऊंटर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच जोतिबा रोडवरील मंदिराच्या भोवती उभारण्यात आलेले १३ फुलवाले स्टॉल, ३ बेन्टेक्स स्टॉल व ५ ओटी स्टॉल काढून टाकण्यात आले. या कारवाईमध्ये विभागीय कार्यालय क्र.२ छ.शिवाजी मार्केट व अतिक्रमण निर्मूलन पथकामार्फत कारवाई करुन ती निष्काषीत करण्यात आली.

ही कारवाई आयुक्त डॉ.राजेंद्र भाडवांच्या आदेशानुसार करण्यात आली. मोहिम उपआयुक्त किरणकुमार धनवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या कारवाईमध्ये सहा.आयुक्त स्वाती दुधाणे, उपशहर अभियंता सुरेश पाटील, कनिष्ठ अभियंता सागर शिंदे, संजय नागरगोजे, अतिक्रमण प्रमुख प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपीक सजन नागलोत तसेच अतिक्रमण, अग्निशमन दल, विभागीय कार्यालय क्र. २ कडील कर्मचारी व जुना राजवाडच्याकडील पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दीड तोळ्याची चेन लंपास

मिरज ,ता.१६(प्रतिनिधी)

मिरज तालुक्यातील डोंगरवाडी येथे बैलगाडी शर्यतीसाठी आलेल्या कर्नाटकातील एकाची दीड तोळे वजनाची सोन्याची चैन चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. याबाबत पोलिसात फिर्याद देण्यात आली असून मिरज ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास डोंगरवाडी येथील बैलगाडा शर्यतीच्या मैदानावर ही चोरीची घटना घडल्याची नोंद मिरज ग्रामीण पोलिसात झाली आहे.

रामेश्वर रावसाहेब इरकर (वय २४, रा. अनंतपुर, ता. अथणी) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. इथून बैलगाडी शर्यतीच्या मैदानावेळी त्यांची सुमारे १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन चोरीस गेली आहे. ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन चोरीस गेल्याची नोंद मिरज ग्रामीण पोलिसात झाली आहे.

कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना लि.,
हुपरी-यळगूड ४१६ २०३, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)
- जाहीर निवेदन -
कारखान्याच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, गाळप हंगाम सन २०२६-२७ करीता ऊसाच्या नोंदी व करारनामा करुन घेण्याचे काम चालू आहे. पण कारखान्यास ऊसाचा पुरवठा करणाऱ्या कांही सभासदांनी येत्या सन २०२६-२७ हंगामाकरीता पिकविलेल्या संपुर्ण ऊसाची नोंद व करारानामा अद्याप करुन दिलेला नसल्याचे आढळून येते. कारखान्याच्या पोटनियमातील तरतूदीनुसार बंधनकारक नियमाप्रमाणे सभासदांनी पिकविलेल्या संपुर्ण ऊसाची नोंद आणि करारानामा करुन देणे आवश्यक आहे. याबाबत शेती खात्याकडील कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी समक्ष भेटून ऊसाची नोंद व करारानामा करुन देण्याविषयी आपणास विनंती केलेली आहे.
तेंव्हा येत्या हंगामासाठी ऊस तोडणीचे क्रमपाळीपत्रक आणि वाहतूक यंत्रणेचे नियोजन करणे सुलभ होण्यासाठी अद्यापही ऊसाची नोंद व करारानामा करुन न दिलेल्या सभासदांनी आवश्यक त्या कागदपत्रासह आपल्या संपुर्ण ऊसाची नोंद व करारानामा दि. ३० जून २०२६ पर्यंत कारखान्याच्या विभागीय शेती ऑफीसकडे देवून सहकार्य करावे. अन्यथा बिगर नोंदीचा ऊस गाळपविना शिल्लक राहिल्यास त्याचे नुकसानीची जबाबदारी कारखान्यावर अथवा शासनावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
हुपरी- यळगूड.
दि. १३/०६/२०२६
(म.गो. जोशी)
कार्यकारी संचालक

आशियाई खेळांसाठी भारताचा टेनिस संघ जाहीर

सुमित आणि सहजाकडे नेतृत्व

नवी दिल्ली,ता.१६–

अखिल भारतीय टेनिस संघटनेने जपानमध्ये होणाऱ्या २०व्या आशियाई खेळांसाठी भारतीय टेनिस संघाची घोषणा केली आहे. पुरुष गटातील भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागल आणि महिला गटातील अव्वल टेनिसपटू सहजा यमलपल्ली भारतीय संघाचे नेतृत्व करतील.

अध्यक्ष नंदन बल यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने पुरुष आणि महिला गटांसाठी प्रत्येकी सहा टेनिसपटूंचा संघ निवडला आहे. आशियाई खेळांमध्ये भारताची दमदार कामगिरी सुनिश्चित करण्यासाठी या संघात अनुभवी खेळाडूंसोबतच युवा प्रतिभावान टेनिसपटूंचाही समावेश आहे.

भारतीय पुरुष संघात एकेरी गटासाठी सुमित नागल (जागतिक क्रमवारी २७७), मानस धामणे (३७८) आणि दक्षिणेश्वर सुरेश (४७८) यांची निवड झाली आहे. दुहेरीतील विशेषज्ञ युकी भांब्री (जागतिक क्रमवारी २४), एन. श्रीराम बालाजी (६१) आणि अनिरुद्ध चंद्रशेखर (९०) यांची संघात निवड झाली आहे. राखीव टेनिसपटूंमध्ये करण सिंग, ऋत्विक बोलिपल्ली आणि निकी कालियांडा पूनाचा यांचा समावेश आहे.महिलांच्या गटात, सहजा यमलापल्ली (जागतिक क्रमवारी ३३२), तसेच वैष्णवी अडणकर (३९६) आणि वैदेही चौधरी (४१७) यांची एकेरीसाठी निवड झाली आहे. दुहेरीच्या संघात ऋतुजा भोसले (१२५), प्रार्थना ठोंबरे (१८१) आणि अंकिता रैना (१८५) यांचा समावेश आहे.

भारत-अफगाणमध्ये रंगणार दुसरा एकदिवसीय सामना

लखनऊ,ता.१६–

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना बुधवारी खेळला जाणार आहे. धरमशाला येथे पावसामुळे बाधित झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने अफगाणिस्तानला सात गडी राखून पराभूत करून मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. आता, लखनऊच्या एकाना स्टेडियमवर होणाऱ्या दुसऱ्या सामन्यातील विजय भारताला विजयी आघाडी मिळवून देऊ शकतो.

पहिल्या एकदिवसीय सामन्यात, फलंदाजी करताना मनगटावर चेंडू लागल्यानंतर रोहित शर्मा अस्वस्थ दिसला. त्याने फलंदाजी सुरू ठेवली असली तरी, त्याच्या तंदुरुस्तीबद्दल काही प्रश्न कायम आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून संघ व्यवस्थापनाने रोहितला विश्रांती देण्याचा निर्णय घेतल्यास, यशस्वी जयस्वालला संधी मिळू शकते. पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने कुलदीप यादवला विश्रांती दिली आणि डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबेला पदार्पणाची संधी दिली. दुबेने तीन बळी घेऊन प्रभावित केले होते. पण अनुभवी कुलदीप यादवच्या पुनरागमनाची शक्यता कायम आहे. कुलदीपचा फॉर्म अलीकडे अस्थिर आहे. त्याला आयपीएल आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात संघर्ष करावा लागला. असे असूनही, एकदिवसीय क्रिकेटमधील त्याचा अनुभव आणि मधल्या षटकांमध्ये बळी घेण्याची क्षमता संघासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते.

पहिल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय पदार्पण करणाऱ्या गुरनूर ब्रारने तीन बळी घेऊन दमदार सुरुवात केली. त्यामुळे, त्याला आणखी एक संधी मिळण्याची दाट शक्यता आहे. आयपीएलमध्ये छाप पाडणाऱ्या प्रिन्स यादवला कदाचित प्रतीक्षा करावी लागेल. भारताच्या वेगवान गोलंदाजांनी पहिल्या सामन्यात शिस्तबद्ध कामगिरी केली आणि संघ व्यवस्थापनाला तेच संयोजन कायम ठेवायचे असेल.

रहमानुल्ला गुरबाजने पहिल्या एकदिवसीय सामन्यात अफगाणिस्तानसाठी शानदार शतक झळकावले होते. पण त्याला इतर फलंदाजांकडून पुरेशी साथ मिळाली नाही. दुसऱ्या सामन्यात संघ चांगल्या सांघिक फलंदाजीची अपेक्षा करत असेल. रशीद खान, ए. एम. गझनफर आणि मोहम्मद नबी या फिरकी गोलंदाजांच्या त्रिकुटाला धरमशाला येथे प्रभाव पाडण्यात अपयश आले, परंतु लखनौची खेळपट्टी फिरकी गोलंदाजांसाठी अधिक अनुकूल ठरू शकते. पण, भारताकडे मालिका जिंकण्याची नामी संधी आहे. तर अफगाणिस्तानसाठी हा सामना मालिकेत पुनरागमन करण्यासाठी निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे, लखनऊमध्ये आणखी एका रोमांचक सामन्याची अपेक्षा आहे.

रोहित शर्माला इतिहास रचण्याची संधी!

रोहितने दुसऱ्या वनडेमध्ये १०९ धावा केल्या, तर तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा सलामीवीर फलंदाज ठरेल. सध्या हा विक्रम वीरेंद्र सेहवागच्या नावावर आहे. सेहवागने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत तिन्ही फॉरमॅटमध्ये सलामीवीर म्हणून १६,११९ धावा केल्या आहेत. दुसरीकडे रोहितने नुकतेच भारतीय सलामीवीर म्हणून १६,००० धावांचा टप्पा गाठला आहे. सध्या रोहितच्या नावावर भारतीय सलामीवीर म्हणून १६,०१० धावा आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतीय सलामीवीर म्हणून सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो आता दुसऱ्या स्थानावर आहे. भारतासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या पहिल्या ५ सलामीवीरांमध्ये दिग्गज सचिन तेंडुलकरचाही समावेश आहे. त्याने १५,३३५ धावा केल्या असून तो तिसऱ्या स्थानावर आहे. सुनील गावस्कर चौथ्या तर शिखर धवन पाचव्या स्थानी आहे. या यादीत भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली सहाव्या स्थानी आहे.

टाईम मॅगझिनमध्ये स्मृती मानधनाला स्थान

प्रभावशाली खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवणारी एकमेव भारतीय

नवी दिल्ली,ता.१६–

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज आणि उपकर्णधार स्मृती मानधनाला आणखी एक मोठा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला आहे. टाईम मॅगझिनने २०२६ मधील १०० सर्वात प्रभावशाली क्रीडा व्यक्तिमत्त्वांच्या यादीत तिचा समावेश केला आहे.

या यादीत स्थान मिळवणारी ती एकमेव भारतीय असून, तिचा ४१ वा क्रमांक आहे. टाईमने क्रीडा व्यक्तिमत्त्वांची यादी आयकॉन्स, टायटन्स, इनोव्हेटर्स आणि लीडर्स अशा चार श्रेणींमध्ये विभागली आहे. मानधनाचा समावेश टायटन्सच्या यादीत आहे आणि वेबसाइटवर सुरुवातीपासून मोजल्यास ती ४१ व्या क्रमांकावर दिसते.

टाईम मॅगझिनची ही यादी आज खेळाची दिशा घडवणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक, गुंतवणूकदार आणि प्रभावशाली क्रीडा व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करते. या वेळी, या यादीत अमेरिकन बास्केटबॉल दिग्गज लेब्रॉन जेम्स, फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो, टेनिसपटू कार्लोस अल्काराज, गोल्फर रॉरी मॅकइलरॉय आणि फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांसारख्या प्रमुख नावांचाही समावेश आहे.

टाईम मॅगझिनने आपल्या प्रोफाइलमध्ये स्मृती मानधनाच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. मासिकाने लिहिले आहे की, ही डावखुरी सलामीवीर फलंदाज भारतीय महिला क्रिकेटमधील सर्वात यशस्वी क्रिकेटपटूंपैकी एक आहे आणि ती नवनवीन विक्रम प्रस्थापित करत आहे.

मानधना देशांतर्गत एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमध्ये म्हणजेच कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० – शतके झळकावणारी ती पहिली भारतीय महिला आहे. महिलांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे सर्वाधिक १७ शतके करण्याचा संयुक्त विक्रम तिच्या नावावर आहे.

रोमांचक सामन्यात इराणने न्यूझीलंडविरुद्ध २-२ ने साधली बरोबरी

लॉस एंजेलिस,ता.१६–

फिफा विश्वचषक २०२६ च्या गट जी मधील इराण आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला सामना २–२ ने बरोबरीत राहिला. दोन्ही संघांनी संपूर्ण सामन्यात वेगवान आणि आक्रमक खेळ केला आणि शेवटच्या क्षणापर्यंत विजयासाठी झुंज दिली.

न्यूझीलंडने सामन्याची जोरदार सुरुवात केली आणि सातव्या मिनिटाला ए. जस्टच्या गोलने आघाडी घेतली.सुरुवातीच्या या धक्क्यानंतर, इराणने सामन्यात पुनरागमन केले आणि ३२व्या मिनिटाला आर. रझायानने गोल करून १–१ अशी बरोबरी साधली. पहिल्या सत्रात दोन्ही संघांना गोल करण्याच्या अनेक संधी मिळाल्या, परंतु कोणताही संघ आघाडी घेऊ शकला नाही.

दुसऱ्या सत्रात न्यूझीलंडने पुन्हा दबाव आणला आणि ५४व्या मिनिटाला ए. जस्टने आपला दुसरा गोल करून संघाला २–१ अशी आघाडी मिळवून दिली.मात्र, इराणने हार मानली नाही आणि ६४व्या मिनिटाला एम. मोहाबीने गोल करून सामना बरोबरीत आणला.त्यानंतर दोन्ही संघांनी निर्णायक गोल करण्यासाठी वारंवार प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही आणि सामना २–२ असा बरोबरीत संपला. या निकालानंतर गट जी पूर्णपणे खुला झाला आहे. प्राथमिक फेरीनंतर इराण, न्यूझीलंड, बेल्जियम आणि इजिप्त हे सर्व संघ समान गुणांसह पुढील फेरीत गेले आहेत.

नेदरलँडविरुद्धच्या सामन्यात टीम इंडियात मोठा बदल

७ वर्षांनी कमबॅक केलेल्या खेळाडूचा पत्ता कट? हरमनप्रीतच्या निर्णयाकडे लक्ष

मुंबई,ता.१६–

सध्या महिला टी–२० वर्ल्डकप स्पर्धेचा थरार सरु आहे. २०२६ च्या स्पर्धेचा पहिला सामना भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्या झाला. या सामन्यामध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध मोठा विजय प्राप्त केला. ६४ धावांना भारत जिंकला. आता स्पर्धेतील भारताचा पुढील सामना हा नेदरलँडविरुद्ध असणार आहे. हा सामना उद्या म्हणजे १७ जून २०२६ रोजी इंग्लंडमधील लीड्स या शहरातील हेडिंग्ले मैदानावर होणार आहे. भारतीय वेळेनुसार हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल. दरम्यान, भारताने स्पर्धेची सुरुवात चांगली केली आहे. पाकिस्तानला पहिल्या मॅचमध्ये नमवत भारताने दमदार सुरुवात केली, हीच दमदार खेळी भारत नेदरलँडविरुद्धच्या सामन्यातही अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करताना दिसणार आहे.

तर दुसरीकडे नेदरलँडही त्याच प्रयत्नात असणार आहे. नेदरलँडला त्यांच्या पहिल्या सामन्यात बांगलादेशविरुद्ध पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे या स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर भारताबरोबरचा सामना हा त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

दरम्यान, भारताची फिरकी गोलंदाज दीप्ती शर्मा आणि श्रीचरणी यांच्यावर जास्त जबाबदारी असणार आहे. फलंदाजांबद्दल बोलायचे झाले तर स्मृती मानधना कर्णधार हरमनप्रीत यांच्याकडूनही मोठ्या खेळाची मोठी अपेक्षा आहे. त्याशिवाय पाकिस्तानविरुद्धच्या विजयानंतर नेदरलँड्सोबतच्या सामन्यात भारतीय संघात काही बदल होतील का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. ज्या खेळाडूंनी पाकिस्तानविरुद्ध निराशाजनक कामगिरी केली त्यांच्याकडून या सामन्यात चांगल्या योगदानाची अपेक्षा आहे. भारती फुलमाळी ही मधल्या फळीत महत्त्वाची भूमिका बजावणारी खेळाडू आहे, परंतू तिची पाकिस्तानविरुद्धची पहिलीच कामगिरी खूपच निराशाजनक ठरली. ती या सामन्यात फक्त एकच धाव काढू शकली, मुनिबा अलीच्या चेंडूवर ती स्टंप आऊट झाली.

भारती ही राष्ट्रीय संघातून अनेक वर्षे बाहेर राहिली आहे. तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पदार्पण केल्यानंतर जवळपास सात वर्षांनंतर आणि संघापासून अनेक वर्ष दूर राहिल्यानंतर तिची या स्पर्धेत निवड झाली आहे. त्यामुळे या निवडीनंतर भारती फुलमाळीला चांगले कमबॅक करण्याची मोठी संधी आहे. स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर सर्व खेळाडूंकडून चांगल्या खेळाची अपेक्षा आहे.

वेगवान गोलंदाज अरुंधती आणि क्रांती याही काही जास्त प्रभावी खेळ करु शकल्या नाही, त्यामुळे या दोघीही उद्याच्या सामन्यात सुरुवातीलाच यश मिळवण्याच्या प्रयत्नात दिसतील, अशी अपेक्षा आहे. भारताचे सध्याचा संघात काही बदल होतो का नाही हे उद्या सामन्यापूर्वी कळेल.

भारताकडून झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानला मोठा झटका

मुंबई,ता.१६–

भारत आणि पाकिस्तान यांच्यात आयसीसी महिला टी–२० विश्वचषक २०२६ चा सामना १४ जून म्हणजेच रविवारी खेळवला गेला. या सामन्यात पाकिस्तानी संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. आता या पराभवानंतर आयसीसीने आणखी एक शिक्षा सुनावली आहे, ज्यामुळे पाकिस्तानी संघाचे धावे दणाणले आहेत.सामन्यादरम्यान केलेल्या हलगर्जीपणाचा फटका आता त्यांना सहन करावा लागत आहे.

दरम्यान, सामना सुरू असताना पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना एक चूक करून बसली. पाकिस्तानी संघाने आपले षटक पूर्ण करण्यासाठी खूप जास्त वेळ घेतला.

आयसीसीने संघाला स्लो ओव्हर रेट (संतुलित गतीने षटके न टाकणे) प्रकरणी दोषी मानले आहे. म्हणूनच संघाला मॅच फीच्या ५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

निर्धारित वेळेत जेव्हा २० षटके पूर्ण व्हायला हवी होती, तेव्हा संघाने एक षटक कमी टाकले होते, त्यामुळेच ही कारवाई करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या कर्णधाराने आपली चूक मान्य केली आहे, ज्यामुळे या प्रकरणात आता पुढे कोणत्याही सुनावणीची गरज उरलेली नाही.

विल्यम्स भगिनी विम्बल्डनमध्ये पुन्हा एकत्र

लंडन, ता.१६–

टेनिसमधील दिग्गज सेरेना विल्यम्स आणि व्हीनस विल्यम्स पुन्हा एकदा विम्बल्डनच्या कोर्टवर एकत्र दिसणार आहेत. ऑल इंग्लंड क्लबने मंगळवारी त्यांना महिला दुहेरी स्पर्धेसाठी वाईल्ड कार्ड दिले.

ग्रँडस्लॅम सुरू होण्याच्या जवळपास दोन आठवडे आधी हा निर्णय घेण्यात आला असून, यासोबतच सेरेनाचे जवळपास चार वर्षांनंतर व्यावसायिक टेनिसमध्ये पुनरागमन होत आहे. ४४ वर्षीय सेरेनाने गेल्या आठवड्यात लंडनमधील क्वीन्स क्लब चॅम्पियनशिपमध्ये पुनरागमन केले, तर व्हीनस मर्यादित वेळापत्रकानुसार सातत्याने खेळत असून बुधवारी ती ४६ वर्षांची होणार आहे.

विल्यम्स भगिनींना टेनिसच्या इतिहासातील सर्वात यशस्वी महिला दुहेरी जोड्यांपैकी एक मानले जाते. त्यांनी मिळून एकूण १४ ग्रँड स्लॅम दुहेरी विजेतेपदे जिंकली आहेत, ज्यात विम्बल्डनमधील सहा विजेतेपदांचा समावेश आहे. तिने २००० साली तिचे पहिले विम्बल्डन विजेतेपद पटकावले, तर ऑल इंग्लंड क्लबमधील तिचा शेवटचा विजय २०१६ मध्ये झाला.

सेरेनाने कॅनडाच्या व्हिक्टोरिया म्बोकोसोबत क्वीन्स क्लबमध्ये आपला पहिला दुहेरीचा सामना जिंकून पुनरागमनाची जोरदार सुरुवात केली. तथापि, नंतर म्बोकोला गुडघ्याची दुखापत झाल्याने त्या दोघींना स्पर्धेतून माघार घ्यावी लागली. विल्यम्स भगिनी शेवटच्या वेळी २०२२ च्या अमेरिकन ओपनमध्ये एकत्र खेळल्या होत्या, जिथे त्या पहिल्याच फेरीत पराभूत झाल्या. त्याआधी, त्या चार वर्षांहून अधिक काळ एकत्र दुहेरी खेळल्या नव्हत्या.

श्रीलंकेसोबत बदला फिक्स! बीसीसीआयने पाठवला विध्वंसक खेळाडू

मुंबई,ता.१६–

श्रीलंकेमध्ये सुरू असलेल्या तिरंगी मालिकेमध्ये भारताला सलग दोन पराभवांचा सामना करावा लागला आहे. मंगळवारी पार पडलेल्या सामन्यामध्ये श्रीलंका संघाने भारताला सुपर ओव्हरमध्ये पराभूत केले. या सामन्यात मोठा वाद पाहायला मिळाला, अंधा स्डेडियममध्ये क्रिकेटचा सामना पार पडला. या सामन्यामध्ये झालेला पराभव भारताच्या जिव्हारी लागला. याचा बदला घेण्यासाठी उद्या होणाऱ्या अफगाणिस्तानविरूद्धच्या सामन्यात भारताला विजय मिळवावाच लागणार आहे. जो संघ जिंकेल तो थेट फायनलमध्ये प्रवेश करेल. त्यामुळे दोन्ही संघांसाठी हा करो या मरो असा सामना असणार आहे. यादरम्यान बीसीसीआयने आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून एक महत्त्वाची अपडेट दिली आहे. उर्वरित सामन्यांसाठी एका खेळाडूला श्रीलंकेला पाठवण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

तिरंगी मालिकेमध्ये खेळत असलेल्या युद्धवीर सिंह याला दुखापत झाली आहे. त्यामुळे हा खेळाडू उर्वरित मालिकेतून बाहेर पडला आहे, त्यामुळे त्याच्या जागी अशोक शर्मा याला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशोक शर्मा हा वेगवान गोलंदाज असून मूळ राजस्थानचा आहे. मात्र, आता गुजरातकडून खेळण्याचा निर्णय घेतला होता.आयपीएलमध्ये पठ्ठ्याने सहा सामन्यात १० विकेट नावावर केल्या होत्या. अशोक हा १५० किलोमीटर प्रतितास आहे पण त्यासोबतच त्याचे कौशल्य म्हणजे तो ११५ किलोमीटर प्रतितासाने स्लो बॉलही टाकून फलंदाजांना चकवतोही.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये अशोकने आपल्या प्रदर्शनाच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. ११ वर्षांचा जुना रेकॉर्ड मोडत त्याने सर्वाधिक २२ विकेट नावावर केल्या होत्या. त्यासोबतच विजय हजारे ट्रॉफीमध्येही त्याने ७ सामन्यात १३ विकेट घेण्याची दमदार कामगिरी केली होती. दुखापती झालेल्या युद्धवीर सिंग याला उजव्या खांद्याच्या दुखापतीतून सावरण्यासाठी बंगळुरूला रिहॅबिलिटेशन प्रोग्रामध्ये सहभागी होण्याचा सल्ला बीसीसीआयच्या मेडिकल टीमने दिला आहे. अशोक शर्मा याची उद्याच्या सामन्यात निवड होते की नाही हे पाहणे महत्त्वाचं ठरणार आहे.

भारत अ संघ

तिलक वर्मा, ऋतुराज गायकवाड, प्रियांश आर्य, वैभव सूर्यवंशी, आयुष बदोनी, निशांत सिंधू, सूर्यांश शेडगे, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक), कुमार कुशाग्र , विपराज निगम, यशुल ठाकूर, अनिल कम्बोज, अरविंद खान, अनिल खान, एन. अशोक शर्मा.